**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. – तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# गोंधळ

'अर्थबोधपत्रिके'च्या या अंकाच्या 'पुरवणी' विभागात प्रा. वि. म. दांडेकर यांनी लिहिलेल्या तीन लेखांचे पुनर्मुद्रण केलेले आहे. तर, अंकाच्या पहिल्या विभागात जे चार लेख आहेत त्यांमध्ये, विषय साहजिकच वेगवेगळे असले तरी, एक समान सूत्र जाणवते. हे ठरवून झालेले नाही. कदाचित कोणी त्याला योगायोगही म्हणेल. कारण, विषयांची विविधता आणि वाचनीयता हे दोन मुख्य निकष अंकांतर्गत मजकुराची जुळवाजुळव करताना नजरेसमोर स्वाभाविकपणेच असतात. कधी तरी मग अवचितच, संकलन झालेल्या मजकुरातून एक सुसंगत सूत्र उभरून येते. तसेच काहीसे या अंकातील मजकुराबाबत झालेले दिसते. आपल्या रोजच्या जगण्यातील गोंधळ अधिकाधिक गडद होत जातो आहे किंवा कसे, अशी भावना बळकट बनविणाऱ्या अनेक घटना आसमंतात घडत आहेत. 'चॅट-जीपीटी'सारख्या एका नव्या संकल्पनेने अवघ्या ज्ञानव्यवहारामध्ये अंतर्बाह्य घुसळण घडवून आणण्याचा जणू विडाच उचललेला दिसतो. ही प्रणाली आपला अध्ययन-अध्यापनाचा व्यवहार अधिक सुलभ बनविण्यास हातभार लावणार की, मानवी मेंदूची विचारक्षमता आणि विश्लेषकबुद्धी पार पांगळी ठरविणारा अभिशाप शाबीत होणार, याचा निदान आज तरी कोणालाही पत्ता नाही. या प्रणालीचे तसे म्हणले तर चकवेदेखील बरेच संभवतात. आपल्याला कोणत्या विषयासंदर्भात लेख अथवा प्रबंध लिहून हवा आहे त्याचे दिशादर्शक सूचन घडविणारा तपशील पुरवला की 'चॅट-जीपीटी'ही प्रणाली संबंधित दस्तऐवज संचित अशा कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे पुढ्यात साकारणार, असा हवाला दिला जातो. म्हणजे, इथे गंमत आहे. संचित अशा कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे निर्माण झालेल्या मजकुराच्या यथार्थतेची जबाबदारी सजीव अभ्यासकावर येऊन पडणार आहे. आता, 'चॅट-जीपीटी' या प्रणालीने हजर केलेल्या शब्दधनाची यथार्थता, अचूकता, विश्वसनीयता कोण आणि कशी तपासणार, हा प्रश्नच आहे. हा गोंधळ कसा उलगडावा, हादेखील एक कळीचा मुद्दाच ठरतो. एकंदरीने आपल्या आजच्या

जगण्याच्या जवळपास सगळ्यांच क्षेत्रांत सरासरीने पूर्वीपार नांदत आलेला गोंधळ एक तर वाढतो तरी आहे किंवा नवीन गोंधळ उद्भवतो तरी आहे.

अगदी वेगळ्या संदर्भात आज असेच काहीसे घडताना दिसते आहे हिमालयाच्या पर्वतीय विभागांमध्ये. सीमारेषेसंदर्भातील वाद भारत आणि चीन या दोन शेजारी देशांमध्ये गेली सुमारे पाऊण शतक धुमसतो आहे. त्याच संदर्भात, दोन्ही देशांनी हिमालयाच्या पर्वतीय भागांतील सीमाप्रांतात, कदाचित लष्करी व्यूहरचनेचा एक भाग म्हणून, जोरदार प्रमाणात पायाभूत सेवासुविधांचे जाळे उभारण्याचा धडाका लावलेला आहे. या पर्यावरणीय चढाईपायी हिमालयाच्या परिसरात अनादी काळापासून नांदत-विकसत आलेल्या अमूल्य अशा परिसंस्थांचा कमालीच्या वेगाने ऱ्हास आणि नाश घडून येतो आहे. याचे अतिशय गंभीर व दूरगामी परिणाम उभय देशांना भविष्यात भोगावे लागतील याची चिन्हे आजच दिसत आहेत. तरीदेखील, बेलगाम व बेगुमान सत्तास्पर्धेद्वारे निपजणारा संभाव्य नाश टाळण्यासंदर्भातील सुज्ञता कोठेच अंकुरताना दिसत नाही. एकंदर सगळा गोंधळच आहे! ■■

## वाचकांना विनंती

अर्थबोधपत्रिकेचा अंक दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी– 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. संकेतस्थळाला वाचकांनी अवश्य भेट द्यावी. www.ispepune.org.in**

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

# तंत्रज्ञान

## ChatGPT च्या नव्या विश्वात!

तंत्रज्ञानाचे क्षेत्र सध्या एका खूप मोठा स्थित्यंतराच्या उंबरठावर उभे आहे. ChatGPT या नव्या प्रणालीने सारे संदर्भच बदलून टाकले आहेत. दिवसागणिक तंत्रज्ञान बदलत चाललेल्या आजच्या युगामध्ये ChatGPT ही नवीन प्रणाली क्रांतिकारी बदल घडवेल असा जाणकारांचा अंदाज आहे. जणू काही एखाद्या व्यक्तीनेच लिहिलेला असावा असा सुसंगत मजकूर लिखित स्वरूपात निर्माण करण्याची क्षमता या नव्या प्रणालीमध्ये आहे. आजमितीला या नव्या प्रणालीमध्ये अनेक नव्या त्रुटी आणि उणीवा असल्या तरीदेखील या प्रणालीने जगभरात कुतूहलमिश्रीत उत्सुकता निर्माण केलेली आहे. त्याचबरोबर, ही नवी प्रणाली अनेक गोष्टींवर गंडांतर आणू शकते याची जाणीव झाल्याने तिच्या विषयी खूप भीतीदेखील आहे. त्यामुळे अनेकांच्या दृष्टीने ChatGPT प्रणाली हा एक मोठा धोकाच आहे. शिक्षण, सर्जनशील क्षेत्रे, अंकीय सुरक्षा अशा विविध क्षेत्रांमध्ये ChatGPTच्या रूपाने एक नवे आव्हान उभे ठाकणार असल्याने भविष्यात लोकशाही व्यवस्थेसाठीसुद्धा ते धोकादायक ठरू शकते, अशीही धास्ती अनेकांना आहे. एकंदरच, उत्कंठा आणि साशंकता यांच्या संधिप्रकाशातून हा सगळाच प्रांत सध्या वाटचाल करतो आहे.

ChatGPT म्हणजे मुळात एक 'व्हर्च्युअल रोबॉट' (चॅटबॉट) आहे. हा एक असा 'रोबॉट' तयार करण्यात आलेला आहे की जो विविध प्रश्नांची उत्तरे तर देतोच परंतु, एखाद्याने एखादी गोष्ट त्याला लिहायला सांगितली तर तो संबंधिताने व्यक्त केलेल्या अपेक्षेबरहुकूम अनुरूप मजकूर लिहूनसुद्धा देतो. हा 'रोबॉट' अस्खलितपणे संभाषण करतो आणि विचारलेल्या प्रश्नांची नेमकी उत्तरेही देतो. 'गुगल'ने अगदी अलीकडे सादर केलेले 'अ‍ॅलेक्सा' हे याच 'रोबॉट'चे लघुरूप म्हणावे लागेल. 'अ‍ॅलेक्सा'ला सूचना दिली की त्याप्रमाणे दूरचित्रवाणी संच कार्यान्वित करणे, गाणी ऐकवणे, विनोद सांगणे या गोष्टी केल्या जातात. परंतु, ChatGPT या नव्या प्रणालीमध्ये मात्र त्याही पुढचे पाऊल उचललेले आहे.

ChatGPT प्रणालीमध्ये 'रोबॉट'ला एखादी गोष्ट सांगायचा अवकाश, हा 'रोबॉट' जणू स्वत:चा मेंदू वापरतो आणि संबंधिताला हवी असणारी गोष्ट क्षणार्धात लिहून पाठवतो. एखादा निबंध, कार्यालयात पाठवायचे एखादे महत्त्वाचे पत्र, एखाद्या विषयावरचे मुद्देसूद भाषण इतकेच काय कथा आणि कवितासुद्धा! 'रोबॉट'द्वारे विषयानुरूप, संदर्भासह आणि विस्ताराने हे लेखन केले जात असल्याने आगामी काळात ChatGPT ही एक वेगळीच उपलब्धी ठरू शकते, असा विश्वास जाणकारांना आहे. नोकरी मिळवण्यासाठी अर्ज करायचा असेल, एखाद्या विषयावर छानशी कविता रचायची असेल, कार्यालयात एखाद्या महत्त्वाच्या विषयावर टिपण सादर करावयाचे असेल, महाविद्यालयात एखाद्या विषयावर संशोधन प्रबंध किंवा अभ्यासपूर्ण माहिती सादर करायची असेल किंवा अगदी संपर्कात नसलेल्या कुणा जवळच्या व्यक्तीला पत्र लिहून हवे असेल तर ChatGPT ला तसा फक्त आदेश दिला की निमिषार्धात हवी ती माहिती संगणकाच्या किंवा 'मोबाइल'च्या पडद्यावर दिसू लागते. ChatGPTमध्ये एखादा प्रश्न विचारल्यानंतर 'रोबॉट'कडून त्याचे उत्तर मिळतेच; परंतु, त्याबाबत केलेल्या प्रतिप्रश्नांनाही उत्तरे मिळतात. मजकुरात काही त्रुटी असतील तर 'रोबॉट' त्यादेखील निदर्शनास आणून देतो, चुकीचे संदर्भ हुडकून ते वगळण्याची क्षमताही आता त्या 'रोबॉट'मध्ये विकसित होते आहे. त्यामुळे, उत्तम संभाषण साधणारा 'रोबॉट' असे या प्रणालीचे स्वरूप समोर येते आहे.

या प्रणालीचे जनक आहेत Sam Altman आणि Elon Musk हे दोघे संशोधक-तंत्रज्ञ. या दोघांनी २०१५ साली स्थापन केलेल्या OpenAI या कंपनीने ChatGPT ही यंत्रणा विकसित केलेली आहे. या कंपनीतून आता Sam Altman बाहेर पडलेले असले तरीदेखील Elon Musk यांच्या नेतृत्वाखाली ही कंपनी उत्तम रीतीने काम करीत आहे. या प्रणालीचे वैशिष्ट म्हणजे ही प्रणाली जगभरात सादर झाल्यापासून अवघ्या पाच दिवसांत कोट्यवधी 'नेट'कऱ्यांनी तिचा वापर करण्यास सुरुवात केली. 'चॅटबॉट रोबॉट'मध्ये संग्रहित केलेली माहिती २०२१ सालापर्यंतची असल्याने आणि ही प्रणाली आजघडीस संशोधन व चाचणीच्या टप्प्यात असल्याने तिच्याद्वारे मिळणार निष्कर्ष चुकीचे अथवा काही प्रमाणात दिशाभूल करणारे असू शकतात, असा खुलासा कंपनीने अगोदरच केलेला आहे. तरीही या प्रणालीच्या माध्यमातून पुढात येणारी माहिती जगभरातील लोकांना ज्या प्रकारे व ज्या प्रमाणात उपयुक्त वाटते आहे ते पाहता तिचा वापर येणाया काळात वाढतच जावा, असा अंदाज आहे. आजमितीस ही प्रणाली चाचणीच्या पर्वात

असल्याने तिचा वापर विनाशुल्क करता येईल असेही कंपनीने स्पष्ट केले आहे. परंतु, येणाया काळात जसजसे या प्रणालीवर तसेच तिच्या उपयुक्ततेसंदर्भात अधिकाधिक संशोधन होत जाईल त्या प्रमाणात आगामी काळात कदाचित स:शुल्क तत्त्वावर तिचा वापर करू दिला जाईल, असेही संकेत मिळू लागलेले आहेत.

कोणत्याही प्रकारची माहिती मिळवण्यासाठी जगभरात सर्वाधिक वापरले जाणारे ‘सर्च इंजिन’ म्हणून ‘गूगल’ला लोकमान्यता आहे. परंतु, आता ChatGPT उदयामुळे ‘गूगल’च्या एकाधिकारशाहीलाही जबरदस्त शह बसतो आहे आणि बसणार आहे. कोणालाही ज्या विषयाची माहिती हवी आहे तिच्याशी संबंधित संकेतस्थळे, ‘वेबपोर्टल्स’, संबंधित चित्रफिती यांचीच काय ती माहिती आपल्याला ‘गूगल’च्याद्वारे प्राप्त होते. माहिती मिळण्याचे विविध पर्याय ‘गूगल’सारख्या ‘सर्च इंजिन’च्या माध्यमातून उपलब्ध होत असली तरीही हाती आलेला तपशील नेमका व अचूक असेलच याची शााती नसते. पुढात अवतरलेल्या माहितीची विाासार्हता काय व कितपत हादेखील एक मुख्य प्रश्न असतोच. शिवाय, ‘गुगल’द्वारा प्रसवणाया संदर्भांच्या संभारातून नेमका गरजेचा अंश धुंडाळणे म्हणजे मोठा ढिगाऱ्यातून हवी असणारी वस्तू नेमकेपणाने शोधण्यासारखेच ठरते. आता, ChatGPT या नव्या प्रणालीमध्ये हवी असणारी माहिती ‘रोबॉट’च्या माध्यमातून लिखित स्वरूपात तयार मिळणार असल्यामुळे अनेकांसाठी तो अतिशय सोयीचा पर्याय ठरू शकेल असा विश्वास जाणकारांना वाटतो.

‘इंटरनेट’वर अनेक स्रोतांद्वार उपलब्ध करून दिल्या जाणाया तपशीलावर कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने संस्करण करून असा संस्कारित मजकूर उत्तम रीतीने वाचकांसाठी सादर करण्याचा प्रयत्न केला जातो. अशी माहिती सातत्याने अद्ययावत राखण्याबरोबरच ती अचूक असावी यावर भर दिला जातो. त्यामुळे अगदी प्रारंभीच्या सत्रात मिळालेली एखादी माहिती पुढील आवर्तनांमध्ये अधिक अद्ययावत आणि अचूक स्वरू पात सादर केली जाणे शक्य बनते. सामान्य ज्ञानाशी संबंधित कोणतीही माहिती मिळवायची असेल तर आजवर ‘गूगल’ हाच एकमेव विश्वासार्ह असा पर्याय हाताशी होता. पण आता केवळ सामान्यज्ञानच नव्हे तर, निबंध, पटकथा, कथा, कविता असे विविध साहित्यप्रकार चुटकीसरशी किंबहुना एका ‘क्लिक’सरशी पुढ्यात दाखल होणार आहेत. अनेकांना विविध क्षेत्रांमध्ये पडणारे अनेक प्रकारचे प्रश्न लक्षात घेऊन त्यांची उत्तरे शोधून ती संदर्भासह सादर करणारी ChatGPT ही नवीन प्रणाली आजघडीला प्रस्थापित असलेली चौकट मोडून त्या पुढचे एक पाऊल टाकणारी ठरते आहे.

आज हे तंत्रज्ञान माणसाच्या विलक्षण बुद्धिमत्तेतून तयार झालेले असले तरी त्याचा जसजसा विकास होत जाईल, तसतसे हे विविध क्षेत्रांत आज कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनाच कमी करून त्यांची जागा तर घेणार नाही ना, अशी भीती अनेक अभ्यासकांना आता वाटू लागली आहे. ChatGPT या प्रणालीला जर सारे काही येऊ लागले आणि आपल्याला पडणाऱ्या सगळ्यांच प्रश्नांची उत्तरे जर मिळू लागली तर कर्मचाऱ्यांची गरज कमी होत जाऊन यथावकाश नोकऱ्यांवर गदा येईल, अशीही भीती अनेकांना वाटते आहे. कोणतीही माहिती ही एखाद्या मूळ संदर्भातूनच या प्रणालीमध्ये समाविष्ट केली जात असल्याने त्यासाठी ज्या संबंधिताने जी सर्जनशीलता, वेळ आणि ऊर्जा वेचलेली असते तिचे मग काय होणार, हादेखील एक गंभीर प्रश्नच आहे. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पडद्यावर सरसकटपणे मजकूर अवतरू लागला तर एकंदरच भाषिक सौंदर्य नष्ट होत जाईल का, याचीही जाणकारांना चिंता आहे. ललितलेखनापासून ते व्यावसायिक लेखनापर्यंत सर्व प्रकारचे लेखन जर ChatGPTच्या माध्यमातून 'चॅटबॉट' करू लागला तर मग सर्जनशील लेखकांचे स्थान सुरक्षित राहील का याचीही सार्थ भीती आज कित्येकांच्या मनात घर करते आहे.

ChatGPT या प्रणालीचे आजघडीला जरी लघुरूप वैश्विक समुदायाच्या पुढ्यात अवतरलेले असले तरी उद्या त्यात मोठा सुधारणा होत ती प्रचंड विस्तारित रूप धारण करून सगळ्या विद्यमान व्यवस्थेच्या पुढात जबर आव्हान उभे करील यात शंका नाही.

# पर्यावरण

## विकासाच्या चढाओढीत हिमालय धोक्यात

वेगाने आर्थिक-सामाजिक विकास घडवण्याचा ध्यास आजघडीला जगातील प्रत्येकच देशाने घेतलेला आहे. प्रामुख्याने रस्ते, पूल, धरणे आदी सुविधा त्यासाठी निर्माण कराव्या लागतात. मात्र, हे करत असताना बऱ्याचदा पर्यावरणाचा ऱ्हास मोठ्या प्रमाणावर होत जातो. असेच काहीसे चित्र सध्याच्या विकासाच्या स्पर्धेतून निर्माण होताना दिसते आहे. भारत आणि चीन या दोन्ही शेजारी राष्ट्रांमध्ये विकासाची जी चढाओढ सुरू आहे ती पाहता त्यातून पर्यावरणाचे कधीही न भरून येणारे नुकसान होते आहे. त्यामुळेच पर्यावरणतज्ज्ञांच्या दृष्टीने ती एक चिंतेची बाब ठरत असून या संदर्भात तातडीने काही पावले उचलली जाणे गरजेचे असल्याचे त्यांचे मत आहे. या संदर्भात आंतरराष्ट्रीय स्तरावर अलीकडे काही अहवालही प्रकाशित झालेले असून त्यांमध्ये या संदर्भातील धोका किती मोठा आहे ते अधोरेखित करण्यात आलेले आहे. घरांना तडे जाणे, जमिनीला भेगा पडणे ही जी गंभीर परिस्थिती जोशीमठ या विख्यात धार्मिक-आध्यात्मिक पर्यटणाच्या स्थळासंदर्भात उद्भवलेली आहे तिला पर्यावरणाकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्षच कारणीभूत असल्याचे प्रतिपादन केले जाते आहे. वेळीच उपाययोजना न केल्यास अशीच दु:सह परिस्थिती आणि असाच धोका हिमालयाच्याबाबतीतही निर्माण होऊ शकतो असा इशारा या क्षेत्रातील जाणकार देत आहेत.

जागतिक तापमानवाढीमुळे पर्यावरणाचे संतुलन वेगाने ढासळण्यास प्रारंभ झालेलाच आहे. त्या साऱ्या बदलांचा परिणाम हिमालयाच्या परिसरातील क्षेत्रांमध्ये दिसू लागला असून हिमनद्या वितळण्याबरोबरच अतिशीत प्रदेशातही बर्फ वितळण्याचे प्रमाण वाढू लागलेले आहे. पर्यावरणाच्या दृष्टीने ही धोक्याची घंटा वाजायला सुरुवात झालेली असतानाच, आर्थिक-सामाजिक विकासाच्याबाबतीत आजमितीस चालू झालेल्या चढाओढीचे विपरित परिणाम दिसू लागलेले आहेत. ही स्पर्धा

अशीच सुरू राहिली तर तिच्या अधिक गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल, असा इशारा पर्यावरणतज्ज्ञ देत आहेत.

हा धोका किती गंभीर असू शकतो याचे प्रत्यंतर देणारी काही उदाहरणे हिमालयाच्या काही भागांमध्ये दिसू लागली आहेत. उत्तराखंड या राज्यातील चमोली या गावामध्ये २०२१ साली हिमस्खलन झाले. त्यामध्ये २०० नागरिक मृत्यूमुखी पडले. साहजिकच ती घटना प्रकर्षाने चर्चाविषय बनली आणि 'विकासाच्या बेलगाम स्पर्धेचेच हे दुष्परिणाम आता उघड दिसू लागले आहेत', असे मत प्रगटपणे बोलले-मांडले जाऊ लागले. जोशीमठ आणि त्याच्या आजुबाजूच्या क्षेत्रामध्ये गंभीर स्थिती उद्‌भवू लागल्याने हा विषय आता ऐरणीवर येऊ लागलेला आहे. केवळ जोशीमठच नव्हे तर हिमालयाच्या अन्य काही भागांमध्ये हळूहळू विदारक चित्र निर्माण होऊ लागले आहे. या गंभीर वास्तवाकडे काणाडोळा करणे हे या पुढे अधिक जोखमीचे व हानिकारक शाबीत होईल, असे इशारे पर्यावरणतज्ज्ञांकडून आताशा वारंवार प्रसृत केले जात आहेत. भारत आणि चीन या दोन शेजारी देशांकडून हिमालयाच्या परिसरात ज्या अहमहमिकेने पायाभूत सेवासुविधा निर्माण करण्याचा धडाका चालू आहे, त्यांपायी नैसर्गिक आपत्तींचा धोका लक्षणीयरीत्या वाढू शकतो, असे या क्षेत्रातील जाणकारांचे अनुमान आहे.

हिमालयाच्या काही भागांत चीन आणि भारत या दोन्ही देशांकडून रस्ते बांधले जात आहेत, रेल्वेमार्ग तयार केले जात आहेत, अनेक ठिकाणी बोगदे निर्माण केले जात आहेत. हिमालयाच्या दोन्ही अंगांना विमानांसाठी धावपट्टया तसेच सिंचनासाठी धरणेही बांधली जात आहेत. Natural Hazards and Earth System Sciences या संशोधनपर नियतकालिकामध्ये या संदर्भात अलीकडेच एक अभ्यासपूर्ण अहवाल सादर करण्यात आलेला असून त्यामध्ये या धोक्याचे गांभीर्य अधोरेखित केलेले आहे. २०२२ सालच्या सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यामध्ये उत्तराखंड राज्यातील 'एनएच-७' या राष्ट्रीय महामार्गाच्या दोन्ही बाजूंना विकासकामांसाठी मोठ्या प्रमाणावर खणाखणी करण्यात आलेली आहे. या पूर्वी निर्माण करण्यात आलेल्या पायाभूत सुविधांनाही त्यांपायी धोका निर्माण झालेला आहे. अनेक ठिकाणचे रस्ते त्यामुळे उखडलेले असून ते पुन्हा नव्याने बांधण्याची गरज निर्माण झालेली आहे. ही परिस्थिती भारत आणि चीन या दोन्ही देशांच्या हद्दीत समसमानच असल्यामुळे तिच्याकडे तातडीने लक्ष देणे गरजेचे बनलेले आहे.

Communications Earth & Environment या संशोधनपर नियतकालिकामध्ये २०२२ सालच्या ऑक्टोबर महिन्यात एक अभ्यासपूर्ण लेख

प्रसिद्ध झालेला आहे. त्यामध्ये या बदलत्या परिस्थितीवर अधिक नेमकेपणाने प्रकाश टाकण्यात आला आहे. तिबेटच्या पठारावर ९ हजार ४०० किलोमीटरचे रस्ते, ५८० किलोमीटर लांबीचे रेल्वेमार्ग, २ हजार ४०० किलोमीटर लांबीच्या वीजवाहिन्या आणि हजारो इमारती उभारण्यात आलेल्या आहेत. या सगळ्या पायाभूत सुविधा उभ्या करीत असताना त्या ठिकाणी पर्यावरणाचा तोल ढासळत गेला. अनेक ठिकाणी खोदकाम करून या पायाभूत सुविधा तयार करण्यात आल्या आहेत. या सगळ्यातून पर्यावरणाचे असंतुलन निर्माण होते. अशा असंतुलनाचे कसे विपरित परिणाम होऊ शकतात याचे दाखले यापूर्वीही मिळालेले आहेत. तिबेटमध्ये २०२० साली एक मोठे भूस्खलन घडन आले होते. गेल्या दशकभरामध्ये बांधलेले पूल, रस्ते व दूरसंचार सुविधा हे सारे त्यामध्ये नष्ट होऊन गेले. त्यामध्ये काही नागरिकांचा मृत्यूदेखील झालेला होता. अशा घटना वारंवार घडत असतानादेखील त्याकडे सरसहा दुर्लक्ष करून हिमालयाच्या क्षेत्रांमध्ये सातत्याने वेगवेगळ्या प्रकारचे बांधकाम केले जात आहे. या सगळ्यांतून पर्यावरणाला मोठा धोका निर्माण होत असून भविष्यात आणखी एखादी गंभीर घटना घडण्याचीही शक्यता मोठी आहे. चीनमध्ये तर अशा अनेक भागांमध्ये पायाभूत सुविधा उभारण्याचा सपाटाच सुरू आहे. अनेक ठिकाणी नव्याने रस्ते बांधण्यासाठी बोगदेही खणले जात आहेत. भविष्याच्या दृष्टीने हे सारे धोकादायक ठरू शकते. त्यासाठी त्यावर कठोर निर्बंध गरजेचे असल्याचे पर्यावरणतज्ज्ञांचे मत आहे.

चीनने आपल्या दक्षिणेकडील भागात, तिबेटच्या जवळ अनेक नागरी वसाहती वसवण्यास सुरुवात केलेली आहे. त्यामुळे तिथे रहिवाशांचाही वावर मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. या ठिकाणी दळणवळणाची साधने वाढत चालली आहेत. नवे रस्ते तयार होत आहेत. नागरिकांमुळे वाहनांची वर्दळदेखील वाढली आहे. त्याचप्रमाणे भारताच्या अरुणाचल प्रदेश आणि सिक्कीम या भागांमध्येही जलविद्युत प्रकल्पांचे काम वेगाने सुरू आहे. आपापल्या प्रभावक्षेत्रांच्या विस्ताराचा ध्यास घेतलेल्या या स्पर्धेत दोन्ही देश मागे हटायला तयार नाहीत. परंतु, भविष्यात या सगळ्याचे किती गंभीर परिणाम होऊ शकतात याविषयी मात्र एक तर अनभिज्ञता तरी दिसून येते अथवा मुबलक बेफिकिरी. या सगळ्याचे दूरगामी परिणाम किती भयावह असू शकतात याचे दाखले पूर्वीच्या काळी दिसून आलेले आहेत. असे असतानादेखील विकासाच्या बाबतीतील ही बेलगाम स्पर्धा थांबवण्याचे मात्र नाव नाही. गेल्या दशकभरातील पर्यावरणीय बदलांकडे नजर टाकली तर असे लक्षात येते की पूर्वीच्या

तुलनेत हिमनद्या वितळण्याचे प्रमाण खूप वाढले आहे. त्यामुळे जलरुस्रोत आणि तलावांचाही मोठ्या प्रमाणावर विस्तार झालेला आहे. हिमनदीमुळे तयार झालेल्या एकूण २३ तलावांपैकी १७ तलाव हे एकटा सिक्कीम राज्यामध्ये आहेत. अशा पार्श्वभूमीवर वेगाने चालू असलेला सध्याचा विकास पर्यावरणाच्या मुळावर येऊ शकेल अशी सार्थ भीती पर्यावरण- तज्ज्ञांकडून व्यक्त होताना दिसते आहे. The Cryosphere या आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या नियतकालिकामध्ये या संदर्भातील अनेकानेक संभाव्य धोके अधोरेखित केलेले आहेत. या अभ्यासानुसार, चीनच्या बाजूला असणाऱ्या हिमालय परिसरामध्ये चीनने मोठी आर्थिक गुंतवणूक केलेली आहे. या परिसरात अत्यंत वेगवान रेल्वे चालू करण्याचीही योजना चीनने हाती घेतलेली आहे. बर्फाने झाकलेले २१ डोंगर आणि १४ नद्या ओलांडून ही प्रस्तावित रेल्वे जाणार आहे. अशा पद्धतीने या भागांत विकास झाला तर मात्र येणाऱ्या काळात अधिक मोठ्या प्रमाणावर भूस्खलन आणि भूकंपाचा धोका निर्माण होऊ शकेल, असा पर्यावरणतज्ज्ञांचा अंदाज आहे. हिमालयाच्या Nyingchi आणि Shigatse या क्षेत्रांमध्ये चीनने वसाहती निर्माण करण्यास तसेच वाढविण्यास सुरुवात केलेली आहे. त्यामुळे तिथे वीज, दूरध्वनी, रस्ते यांसारख्या नागरी सेवासुविधांचा विकास सुरू झालेला आहे. अशा परिस्थितीत हिमालयातील नैसर्गिकतेला धोका उत्पन्न व्हावा, हे स्वाभाविक शाबीत होते.

भारत-चीन यांचे शत्रुत्व, दोन्ही देशांदरम्यानचा सीमावाद, आंतरराष्ट्रीय स्तरावर सातत्याने वाढत असलेली स्पर्धा या सगळ्यांमुळे दोन्ही बाजूंकडून जी विकासाची चढाओढ सुरू आहे त्यामध्ये हिमालयाचा श्वास कोंडला जाईल की काय, अशी आशंका व्यक्त केली जाते आहे. म्हणूनच इथे आर्थिक विकासाच्या घोडदौडीपेक्षाही पर्यावरणाचे संतुलन जपले जाणे भविष्याच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचे आहे.

# आरोग्य

## संप्रेरकांच्या असंतुलनाचे दुष्टचक्र

अगदी अलीकडच्या काळापर्यंत स्त्रियांची मासिकपाळी हा विषय मोकळेपणाने बोलण्याचा नव्हता. त्या विषयी घरातसुद्धा महिलांमध्ये आपसातच चर्चा होत असे. त्यातून अनेकदा स्त्रियांचे आरोग्य, त्यात आवश्यक असणारी स्वच्छता, त्यांना गरजेची असणारी पुरेशी विश्रांती हे सारे मुद्दे अनेक काळ दुर्लक्षित होते. परंतु, आधुनिक काळामध्ये या विषयावर मोकळेपणाने बोलले जाऊ लागले आहे आणि महिलांच्या मासिक पाळीसंदर्भात 'पॅडमॅन'सारखा चित्रपटदेखील प्रदर्शित झाला. स्त्रियांच्या संदर्भातील या सगळ्या बदलत्या वास्तवाचेच आणखी एक परिमाण असलेल्या संप्रेरकरांचे असंतुलन (हार्मोनल इम्बॅलन्स) ही एक मोठी समस्या जागतिक स्तरावर वाढत असल्याचे आताशा दिसून येते आहे. भारतामध्ये प्रत्येक दहा महिलांमागे एका महिलेला संप्रेरकाच्या असंतुलनाची समस्या भेडसावत असल्याचे वास्तव ताज्या आकडेवारीतून समोर येते आहे.

वाढत्या वयानुसार व्यक्तीच्या शरीराबरोबरच मनामध्येही बरेच बदल होत जातात आणि या सगळ्याचे परिणाम आरोग्यावर होताना दिसतात. त्यातूनच आरोग्यविषयक अनेक समस्या निर्माण होत असतात. शरीरात होणाया बदलांमागे तसेच तरल मानसिक स्थितीमागे अनेकदा संप्रेरकांचे असंतुलन हेच प्रमुख कारण असते. संप्रेरके (हार्मोन्स) म्हणजे आपल्या शरीरातील अंत:स्त्रावी ग्रंथींची उत्पादिते होत. ही संप्रेरके ग्रंथींमध्ये तयार होऊन रक्तामध्ये मिसळत असतात. रक्तातून ती विविध अवयवांपर्यंत पोहोचून अवयवांचे काम नियंत्रित करतात. हे सारे काही शरीरामध्ये आपल्याही नकळत, अव्याहतपणाने सुरू असते. विविध संप्रेरके एकमेकांना आणि अवयवांना परस्परसंबंधांतून नियंत्रित करीत असतात. हे काम योग्य रीतीने होत राहाणे हे संप्रेरकांच्या संतुलनावर अवलंबून असते. हे संतुलन बिघडले की त्यातून आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण होतात आणि विशेषत: स्त्रियांमध्ये वयाचा एक

विशिष्ट टप्पा ओलांडल्यानंतर त्याचे प्रमाण वाढत असल्याचे वैद्यकीय अभ्यासातून दिसून आले आहे. बदलती जीवनशैली त्यास कारणीभूत ठरत आहे. मानसिक ताणतणाव, बाहेरील वातावरण, दीर्घकालीन आजार, आनुवंशिक बदल, विशिष्ट प्रकारची औषधे, जीवनशैलीतील स्थित्यंतरे, अनाम व अनाकलनीय अशा विविध प्रकारच्या 'ॲलर्जी', अतिरिक्त मद्यपान किंवा/तसेच धुम्रपान अशांसारख्या बाबींमुळे संप्रेरकांचे असंतुलन सक्रिय बनते.

वैद्यकीय क्षेत्रातील जाणकारांच्या मते, जेव्हा संप्रेरकांचे असंतुलन होते तेव्हा शारीरिक थकवा येणे, लक्ष केंद्रित करता न येणे, सातत्याने घाम घेणे, वजन झपाट्याने वाढणे अथवा लक्षणीयरीत्या कमी होणे, चेहऱ्यावर डाग येणे, चेहरा काळवंडणे, मानसिक ताण वाढणे व त्यातून नैराश्य उद्‌भवणे, व्यंधत्व येणे, मासिक पाळी अनियमित बनणे व पाळीदरम्यान अतिरिक्त रक्तरुस्राव होणे, मोठ्या प्रमाणावर केसगळती होणे, हृदयाच्या गतीमध्ये बदल होणे, मधुमेहाची चिन्हे दिसणे... अशी अनेकानेक लक्षणे दिसू लागतात. अशी लक्षणे दिसण्याचे प्रमाण सध्याच्या काळात वाढत असल्याचे या क्षेत्रातील जाणकारांचे निरीक्षण आहे. त्यामुळे अशा स्वरूपाची लक्षणे दिसून आल्यास डॉक्टरांच्या सल्ल्यानेच पुढील पावले उचलणे योग्य राहते. अन्यथा संप्रेरकांमधील हे असंतुलन भावी काळात नव्या गंभीर समस्या निर्माण करू शकते. याचे अचूक निदान करण्यासाठी अनेकदा काही प्रकारच्या प्रयोगशाळेतील चाचण्या आवश्यक असतात. रक्ताची तपासणी आणि इतर काही परीक्षा करून हे असंतुलन लक्षात येऊ शकते. औषधांच्या जोडीला आहारपद्धती आणि जीवनशैलीत बदल केले की असंतुलन कमी होऊ शकते, असेही आजवरच्या अभ्यासांद्वारे दृष्टोत्पत्तीस येते.

यांतील सर्वाधिक लक्षणीय बाब म्हणजे, विशेष करून महिलांमध्ये संप्रेरकाच्या असंतुलनामुळे आधुनिक काळात नवीन समस्या निर्माण होत असल्याचे दिसते आहे. Polycystic Ovary Syndrome (PCOS) आणि Polycystic Syndrome Disease (PCOD) हे दोन्ही आजार सध्या महिलांमध्ये सर्रास दिसून येतात. संप्रेरकांतील असंतुलनामुळे महिलांच्या अंडाशयावर विपरित परिणाम घडून येतो आणि महिलांमध्ये अनेक प्रकारच्या आरोग्यविषयक अन्य समस्याही निर्माण होतात. ब्रिटनमधील National Health Service ने (NHS) या संदर्भात सखोल संशोधन केलेले असून संबंधित अभ्यासानुसार PCOD ची प्रमुख तीन लक्षणे दिसतात. महिलांना अनियमित पाळीचा त्रास सुरू होतो. High Androgen ची वाढ झाल्याने

महिलांच्या चेहऱ्यावर व अंगावर पुरुषांप्रमाणे केस येऊ लागतात. परिणामी, स्त्रियांचे बाह्यरूप बदलू लागल्याने त्यांच्यातील आत्मविश्वास कमी होऊ लागतो आणि त्यातून अनेकदा स्त्रिया नैराश्याच्या गर्तेतही सापडतात. त्यामुळे अशा परिस्थितीमध्ये त्यांच्यावर वैद्यकीय उपचार केले जाऊन त्यांना त्या दु:सह परिस्थितीतून बाहेर काढणे गरजेचे असते.

Polycystic Ovary Syndrome (PCOS) ही व्याधी महिलांच्या दृष्टीने अधिक गंभीर असते. या व्याधीत अंडाशयाचा आकार क्रमाने मोठा होत जाऊन त्यात द्रवाच्या पिशव्या तयार होतात. Water Cysts किंवा Follicles असे त्यांना म्हटले जाते. काही स्त्रियांमध्ये तर अलीकडच्या काळामध्ये अवघ्या विसाव्या वर्षीच PCOD ची लक्षणे दिसू लागली आहेत. लहान वयातच अशी लक्षणे दिसून आल्यास त्याचा परिणाम गर्भधारणेवरसुद्धा संभवतो. अनियमित पाळी, रक्तस्रावात वाढ, गर्भधारणेच्या समस्या, चेहऱ्यावर अति प्रमाणात केस येणे, वजन वाढणे, केस गळणे, मधुमेहाची लक्षणे दिसू लागणे, चेहऱ्यावर फोड येणे, चेहरा अतिशय तेलकट होणे अशा प्रकारच्या अनेक समस्या यातून उद्‌भवतात. अनेकदा याची कारणे आनुवंशिकही असतात असे जाणकारांचे मत आहे. Natinal Health Service मधील अभ्यासकांच्या मते, काही रुग्णांच्या बाबतीत PCOD ची समस्या नसली तरीही संप्रेरकांचे असंतुलन होत राहते.

मासिक पाळीच्या समस्या, केसांची अतिरिक्त वाढ आणि वंध्यत्व यासारख्या गोष्टींसाठी डॉक्टर औषधांद्वारे त्यांचा प्रभाव कमी करण्याचा प्रयत्न करतात. परंतु, अनेकदा व्यंधत्वाची समस्या गंभीर स्वरूप धारण करते अशा वेळी डॉक्टर Laparoscopic Ovarian Drilling (LOD) या शस्त्रक्रियेचाही सल्ला देतात. अंडाशयातील नको असलेल्या पेशी लेझर तंत्रशास्त्राच्या मदतीने काढून टाकल्या जातात. त्यामुळे गर्भधारणा होण्याची शक्यता वाढते आणि वंध्यत्वाची समस्या कमी होऊ शकते असे या क्षेत्रातील जाणकारांचे मत आहे. संप्रेरकांतील बदलांमुळे Premenstrual Dysphoric Disorder (PMDD) ही आणखी एक व्याधी महिलांच्याबाबतीत अलीकडच्या काळात दिसून येऊ लागली आहे. मासिक पाळी येण्यापूर्वीही महिलांमध्ये यातील काही लक्षणे दिसू लागतात आणि महिलांना शारीरिक व मानसिक त्रास जाणवू लागतो. वर्तणुकीत अचानक बदल होणे, मनावर चटकन ताण येणे, चिडचिड होणे, थकवा जाणवणे, छातीत दुखणे, पोटाचा आकार अचानक वाढणे, निद्रानाश होणे, सतत डोके दुखणे अशा समस्या दिसून येतात. कधी कधी

या समस्या आणखी गंभीर स्वरूप धारण करतात. त्यालाच वैद्यकीय परिभाषेमध्ये Premenstrual Dysphoric Disorder (PMDD) असे म्हटले जाते. या व्याधीचा सामना करणाऱ्या महिलांच्या मनात आत्महत्येपर्यंतचे टोकाचे विचारही येत राहतात. म्हणूनच अशा समस्यांकडे डोळेझाक न करता त्यावर तातडीने आवश्यक ते योग्य उपचार होणे गरजेचे आहे, असे जाणकार सांगतात.

साधारणत: वयाच्या मध्यावर पोहोचल्यानंतर स्त्रियांची मासिक पाळी बंद होते. त्याला रजोनिवृत्ती असे म्हणतात. वयाच्या ४५ ते ५० या वयामध्ये मासिक पाळी बंद होते. परंतु अलीकडच्या काळात बदलत्या आणि धकाधकीच्या जीवनशैलीमुळे रजोनिवृत्तीचा हा काळही अलीकडे येत चालला असल्याचे संशोधनातून समोर येते आहे. वैद्यकीय क्षेत्रातील सचिंत जाणकारांच्या मते ही आजच्या काळातील एक गंभीर समस्या बनू पाहते आहे. रजोनिवृत्तीच्या प्रारंभी मासिक पाळी अनियमित होऊन हळूहळू ती बंद होते. परंतु, आताशा लहान वयातच ही समस्या उद्‌भवू लागल्याने दीर्घकाळ त्रास होत राहण्याबरोबरच महिलांच्या मनावर व शरीरावर त्याचे विपरित परिणाम होत राहतात.

महिलांच्या संदर्भातील वरील समस्यांचा विचार करता संप्रेरकांच्या असंतुलनाला प्रामुख्याने बदललेली जीवनशैली कारणीभूत आहे, अशा निष्कर्षास येण्यास बऱ्यापैकी आधार व अवकाश आहे. नियमित व्यायाम, संतुलित आहार, आनंदी जीवनदृष्टीचा अंगीकार आपल्या रोजच्या जीवनराहाटीमध्ये केल्यास उपरोक्त व्याधींचे प्रमाण निश्चितपणे लक्षणीयरीत्या कमी होऊ शकते आणि एकंदरीनेच आनंदी जीवनाचा आस्वाद हमखास घेत निरामय जीवन जगण्याचा मार्ग प्रशस्त बनू शकतो, असा दिलासा वैद्यकीय तज्ज्ञ आवर्जून देतात.

# सामाजिक

## शहरांच्या स्वच्छतेला शाप अनास्थेचा

आपले शहर स्वच्छ असावे असे प्रत्येकाला वाटत असले तरी प्रत्यक्षात ते स्वच्छ राखण्यासाठी ज्या जबाबदारीने आणि कर्तव्यभावनेने वागणे अपेक्षित असते ते व्यवहारात मात्र क्वचितच साकारते. आपल्या देशांतील शहरांच्या स्वच्छतेला अनास्थेचा असा शाप बाधत असल्याकारणानेच स्वच्छतेचे अपेक्षित उद्दिष्ट साध्य होत नसल्याचा अनुभव येतो. ही वस्तुस्थिती ध्यानात घेऊनच 'स्वच्छ भारत मिशन २.०' या अलीकडेच प्रवर्तित करण्यात आलेल्या उपक्रमांतर्गत देशभरातील शहरे कचरामुक्त करण्याचे लक्ष्य नजरेसमोर ठेवून त्यासाठी एक स्पर्धात्मक वातावरणही तयार करण्यात आलेले होते. परंतु, सातत्यपूर्ण प्रयत्नांनंतरदेखील शहरे स्वच्छ राखण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यात अपेक्षित यश आलेले नाही, हे खेदकारक वास्तव नाकारता येणारे नाही. वर्षभरात केवळ २९९ शहरांनाच कचरामुक्तीचे प्रमाणपत्र मिळवता आले, ही बाब या संदर्भात कमालीची बोलकी ठरते.

शिक्षणसंस्थांचे गुणमानांकन करण्यासाठी जशी 'नॅक'सारखी व्यवस्था आहे त्याप्रमाणे शहरस्वच्छतेचे मानांकन निश्चित करण्यासाठी केंद्रीय पातळीवर एक खास व्यवस्था निर्माण करण्यात आलेली आहे. या व्यवस्थेद्वारे निर्धारित मानकांची परिपूर्ती साध्य करत शहरांनी गुणमानांकनाबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे अशी अपेक्षा होती व आहे. परंतु, प्रत्यक्षात केवळ ५० टक्के शहरांनीच या उपक्रमात सहभाग नोंदवला. या गुणमानांकनानुसार, पंचतारांकित प्रमाणपत्र प्राप्त करणारी अवघी नऊ शहरे देशभरात आहेत. १४३ शहरे त्रितारांकित आहेत तर १४७ शहरे केवळ एकतारांकित ठरली. म्हणजेच, स्वच्छतेच्याबाबतीत अपेक्षित असणारी तत्परता, संवेदनशीलता अथवा उत्स्फूर्तता शहरप्रशासनाच्या पातळीवर अद्यापी दिसून येत नाही. केंद्र शासन मात्र 'स्वच्छ भारत' या मोहिमेंतर्गत देशाच्या शहरी तसेच ग्रामीण भागात स्वच्छता राखली जाण्याबाबत अतिशय आग्रही आहे. त्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजनही केले जाते आहे.

शहर प्रशासन आणि लोकसहभागातून गावां-शहरांतील कचयाची समस्या दूर होऊन अवघा देश स्वच्छ व्हावा या उद्दिष्टाच्या दिशेने सुरू असलेल्या प्रयत्नांना अजूनही म्हणावा असा प्रतिसाद मिळताना दिसत नाही. त्यासाठी आखून दिलेल्या निकषांची पूर्तता करून कचरामुक्तीचे उद्दिष्ट साध्य करावे म्हणून 'स्टार रेटिंग प्रोटोकॉल ऑफ गार्बेज फ्री सिटी टूल किट २०२२' या प्रणाली अंतर्गत सर्व मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे यात सहभागी होणाया शहरांनी किमान त्रितारांकित प्रमाणपत्र मिळवावे, अशी अपेक्षा आहे. मात्र स्वच्छता आणि कचरा निर्मूलनाच्या प्रत्यक्ष कार्यवाहीत पुरेशी कटिबद्धता दिसून येत नसल्याचे जाणकारांचे निरीक्षण आहे. शहराच्या सर्व भागांमध्ये फिरून घराघरांतून कचरा जमा करून त्याचे वर्गीकरण करणे या बाबींना प्राधान्य देण्यात आले होते. अशी यंत्रणा ज्या शहरांमध्ये प्रभावी रीतीने प्रस्थापित झालेली आहे त्याच शहरांमध्ये कचऱ्याचे व्यवस्थापन उत्तम पद्धतीने होते असे दिसून आले आहे. परंतु, अशा शहरांची संख्या हाताच्या बोटावर मोजावी इतकी कमी आहे. मोकळ्या जागेत, रस्त्याच्या कडेला, नाल्यांमध्ये जर साठलेला कचरा दिसून येत असेल तर कचरा व्यवस्थापन यशस्वी रीतीने होत नाही हे सहजतेने लक्षात येते. भारतात अशा शहरांची संख्या खूप मोठी आहे. छोटा शहरांच्या समस्या आणखीनच वेगळ्या आहेत. परंतु दिल्लीसारख्या राजधानीच्या शहरातदेखील रस्त्यांवर, दुभाजकांवर, पदपथांवर, मोकळ्या जागांमध्ये, सार्वजनिक ठिकाणी बिनदिक्कतपणे कचरा फेकला जात असल्याचे सर्वेक्षणादरम्यान दिसून आले आहे. त्यामुळे अभ्यासकांच्या दृष्टीने हीच सर्वात मोठी चिंतेची बाब आहे.

घराघरांमधून निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे 'ओला कचरा' आणि 'सुका कचरा' असे वर्गीकरण करण्यात आले तरीही शहरात विविध प्रकारचा इतर कचरा मोठ्या प्रमाणावर आढळून येतो आणि तो शहराच्या अस्वच्छतेत भर घालण्याचे काम करीत राहतो. तुटलेल्या काचा, कचरामय चिखल, जुन्या सामानाचे तुटलेले भाग, जीर्ण झालेले कपडे, देवांच्या भग्न झालेल्या मूर्ती, प्लॅस्टिकचे फलक, मोटारगाडांचे सुटे भाग, वेष्टनाचे अनेक प्रकारचे सामान असे अनेकानेक घटक रस्त्यावर ठिकठिकाणी पडलेले असते. या गोष्टी शहराच्या अस्वच्छतेत भर घालत राहतात.

'सेंटर फॉर सायन्स अँड एन्व्हायर्न्मेन्ट' या संस्थेतील अभ्यासकांच्या चमूने भारतातील विविध शहरांमध्ये फिरून आढावात्मक पाहाणी केली. शहरात जिथे जिथे म्हणून कचरा जमा होतो अशा विविध ठिकाणी कचरा संकलन कशा पद्धतीने केले जाते आणि एकूणच कचयाचे व्यवस्थापन कशा पद्धतीने होते याचा एकत्रित

आढावा या चमूने घेतला. या प्रत्यक्ष पहाणीअंती अनेकानेक गोष्टी निदर्शनास आल्या. घराघरांमधून वर्गीकरण केलेल्या कचऱ्याचे संकलन करण्याची व्यवस्था अद्यापही अनेक शहरांमध्ये रुजलेली नाही. काही शहरांतील अनेक विभागांमध्ये घरातील कचऱ्याचे योग्य पद्धतीने वर्गीकरण आणि संकलन होत नसल्याची महत्त्वपूर्ण बाबही या भेटीदरम्यान अधोरेखित झाली. त्याचप्रमाणे, ज्या ठिकाणी कचरापेटा उभ्या केलेल्या आहेत किंवा कचरा संकलनाची व्यवस्था निर्माण केलेली आहे तिथे कचयाचे वर्गीकरण योग्य पद्धतीने केले जात नाही. त्यामुळे त्या परिसरात कोठेही स्वच्छता दिसत नाही. केवळ इतकेच नाही तर, शहरस्वच्छतेबाबत आणि कचऱ्याची विल्हेवाट लावण्याबाबत नागरिकांमध्ये जी जागरुकता अपेक्षित आहे तिचाही अभाव मोठा प्रमाणावर दिसून येतो. त्यांत भरीस भर म्हणून की काय, शहरात कचरा करणाऱ्या किंवा शहराच्या अस्वच्छतेला कारणीभूत असणाया लोकांवर प्रभावकारक अशी दंडात्मक कारवाई करण्यात प्रशासनदेखील अपयशी ठरते आहे, असे या चमूच्या निदर्शनास आले.

ज्या शहराचे प्रशासन स्वच्छतेच्या प्रश्नाबाबत अधिक जागरूक राहते तिथे स्वच्छता चांगल्या रीतीने राखली जाते आणि तेथील स्वच्छता कर्मचारीही जबाबदारीने काम करतात, असे सर्वसाधारण चित्र दिसते. मात्र, जिथे प्रशासकीय यंत्रणा प्रभावी नसते तिथे स्वच्छता कर्मचाऱ्यांची भूमिकाही उदासीन दिसून येते आणि अशा परिस्थितीत संबंधित प्रशासकीय यंत्रणेला नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागते. ही परिस्थिती बदलण्यासाठी काय उपाययोजना करता येऊ शकतात यावरदेखील या चमूने आपले स्पष्ट मत नोंदवलेले आहे. कचरामुक्तीसाठी प्रशासकीय पातळीवरून केल्या जाणाऱ्या प्रभावी अंमलबजावणीला तितक्याच दक्ष व उस्फूर्त अशा व्यापक स्तरावरील लोकसहभागाची जोड प्राप्त झाल्याशिवाय कचरामुक्त शहरांचे उद्दिष्ट साध्य होणार नाही, असे मत चमूने प्रकर्षाने व्यक्त केलेले दिसते.

शहरस्वच्छतेचे आणि कचरामुक्तीचे महत्त्व नागरिकांना पटवून देण्यात शहर प्रशासनास यश येऊन त्या प्रयत्नांत स्थानिकांचा कृतीशील सहभाग मिळतो तेव्हाच शहरपातळीवरील स्वच्छतेच्या प्रयत्नांना यश मिळते, असे या अभ्यासातून लक्षात आले. घराघरांतून कचरा संकलित होण्याची व्यवस्था प्रभावी पद्धतीने कार्यान्वित होणे त्यासाठी सर्वप्रथम गरजेचे आहे. शहरातील निवासी तसेच औद्योगिक आणि सार्वजनिक ठिकाणांवरून जमा होणारा कचरा योग्य रीतीने संकलित होऊन त्याचे वर्गीकरण होणे ही या संदर्भातील एक आवश्यक अशी पूर्वअट ठरते. घराघरांतून

कचऱ्याचे संकलन करण्याची प्रभावी व्यवस्था आणि संकलित कचऱ्याचे वर्गीकरण करण्याची चांगली यंत्रणा असतानादेखील शहराच्या काही भागांमध्ये लोकांकडून कचरा बेदरकारपणे टाकला जातो आहे असे निदर्शनास आल्यास त्या ठिकाणी विशेष जागरुकता निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे अनिवार्य शाबीत होते. त्या उपरदेखील कचरा इतस्तत: फेकून अस्वच्छता निर्माण केली जात असेल तर संबंधितांकडून कठोरपणाने दंड आकारणे व प्रसंगी त्यांना शिक्षेस पात्र ठरवणे आवश्यक ठरते. सांडपाणी वाहून जाण्याची व्यवस्था सुस्थितीत राखणे, नद्या, ओढे, नाले यावर बेकायदेशीर बांधकामे करणाऱ्यांबरोबरच सार्वजनिक जागी कचरा फेकणाऱ्यांवर कठोर कारवाईचा प्रशासकीय बडगा उगारणे, अशा वेळी मग नितांत निकडीचे ठरते. कचरा संकलन, विलगीकरण आणि त्याची विल्हेवाट लावण्यासंदर्भात सक्षम अधिकारी नियुक्त करून त्याद्वारे या संपूर्ण प्रक्रियेवर लक्ष ठेवणे गरजेचे आहे, असे अभ्यासचमूचे प्रतिपादन आहे. कचरा संकलनापासून ते त्याची विल्हेवाट लावण्यापर्यंतची सर्व प्रक्रिया योग्य रीतीने कार्यान्वित होण्यासाठी कार्यक्षम व्यवस्थापनही गरजेचे आहे. शहरातील विविध प्रभागांबरोबरच औद्योगिक परिसरामधील रस्ते व उपरस्ते रात्रीच्या वेळी स्वच्छ करण्याबाबत कटाक्ष राखला जावी अशीही एक महत्त्वाची सूचना अभ्यासचमूने या संदर्भात केलेली आहे.

भारतातील अनेक शहरे या बाबतीत अद्यापही खूप उदासीन आहेत, हे वास्तव नाकारता येत नाही. अनेक शहरांमध्ये यासाठी अगदी सुरुवातीपासून खूप प्रयत्न करावे लागतील असे चित्र दिसून येते. शहरातील अनेक प्रभागांमध्ये चौकाचौकांत साठलेल्या कचऱ्याचे साम्राज्य प्रत्यही दिसून येते. घराघरांतून कचरा संकलित करण्याची व्यवस्था नसल्याने कचरापेटा ओसंडून वाहत असतात. या सगळ्यांपायी परिसरात अनारोग्य आणि रोगराई पसरण्याचीही भीती असते. त्यामुळे सामान्य नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयी जागरुकता कशी निर्माण होईल यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील, असे या क्षेत्रातील जाणकारांचे मत आहे.

या सगळ्या पार्भूमीवर, इंदोर शहराने स्वच्छतेच्या संदर्भात प्राप्त केलेले यश निश्चितच उल्लेखनीय आणि मार्गदर्शक ठरावे असे आहे. एके काळी अस्वच्छता ही मोठी समस्या बनलेले हे शहर आज स्वच्छतेच्याबाबतीत खरोखरीच आदर्श मानले जाते. त्याचे अनुकरण करून इतरही काही शहरांनी अनुरूप पावले उचलण्यास सुरुवात केलेली आहे. इंदोरमध्ये या सगळ्याची सुरुवात स्थानिक प्रशासनाने केली ती शहरातील कचरापेटा दूर करून. शहरात कचरापेटा असल्या की परिसरातील

अस्वच्छतेला आणि अनारोग्याला त्या कचरापेटाच कारणीभूत ठरतात हे लक्षात ठेवून अस्वच्छतेचे तेच मुख्य कारण प्रथमत: दूर करण्याचा प्रयत्न स्थानिक प्रशासनाने केला. घराघरांतून ओला कचरा व सुका कचरा वेगवेगळा संकलित करण्याची एक प्रभावी यंत्रणा प्रारंभी प्रस्थापित करण्यात आली. २०१६ सालापासून शहरातील ८५ प्रभागांमध्ये कचरासंकलनाची सुरुवात या पद्धतीने करण्यात आली.

परंतु, संकलित कचऱ्याचे सुनियोजित व्यवस्थापन करणे हे त्या पुढील खरे मोठे आव्हान लीलया पेलण्यात या शहराला मिळालेले यश स्पृहणीय आहे. कचयाचे वर्गीकरण, विघटन आणि विल्हेवाट याची एक उत्तम यंत्रणा शहरप्रशासनाने प्रस्थापित केलेली आहे. दररोज शहरामध्ये ११०० टनांहून अधिक कचरा तयार होतो. तो स्वतंत्रपणाने संकलित करण्याबरोबरच आठ हजार सफाईमित्रांच्या मदतीने शहर परिसर व रस्ते स्वच्छ ठेवण्यावर लक्ष केंद्रित केले जाते. पदपथ आणि दुभाजकांची स्वच्छता दरदिवशी तर केली जातेच परंतु त्याच्या जोडीला रात्रीच्या वेळी रस्ते रोजच्यारोज धुवून स्वच्छ केले जातात. रस्त्यांवरील धूळ कमी झाल्याने आरोग्यास अपायकारक ठरणाऱ्या सूक्ष्म कणांचेही प्रमाण साहजिकच कमी झालेले आहे. प्लॅस्टिकबंदीची अंमलबजावणी शहरात प्रभावी रीतीने करण्यात आली आणि घराबाहेर पडतेवेळी कापडी पिशव्या आणि/अथवा स्टीलची भांडी जवळ बाळगण्यास नागरिकांना प्रवृत्त करण्यात आले. ती बाब आता अनेक नागरिकांच्या अंगवळणी पडलेली आहे. भाजीमंडईमध्ये शिल्लक उरणाऱ्या भाजीचा कचरा साठून राहण्याऐवजी त्या पासून संपीडीत नैसर्गिक वायू (सीएनजी) बनवण्याचा अभिनव प्रकल्प शहराने हाती घेतला. शहरात जमा होणारे प्लॅस्टिक ग्रामीण भागांतील रस्त्यांच्या बांधकामासाठी वापरण्याचा पर्याय अंगीकारून प्लॅस्टिकच्या कचऱ्याचा प्रश्न कायमचा मार्गी लावला आहे. ओल्या कचऱ्यापासून खत बनवण्यासाठी वस्तीतील घरांना प्रोत्साहित केले जाते आहे. यांसारखे प्रयोग कचरामुक्तीच्या दिशा उजळू शकतात.

लोकसहभाग आणि स्थानिक प्रशासनाची इच्छाशक्ती व नियोजनबद्ध कृतीशीलता यांच्ता बळावर शहरस्वच्छतेचे ध्येय साध्य करता येऊ शकते, हे वास्तव इंदोर शहराच्या उदाहरणावरून लक्षात येते. शहरस्वच्छतेसंदर्भातील सर्वसामान्यांची अनास्था दूर करून त्या बाबतचा उत्स्फूर्त नागरीक सहभाग वाढविण्याच्या दिशेने प्रयत्न होणे त्यासाठी गरजेचे आहे.

■■

# सामाजिक

## आपली अन्नसमस्या

### व्याख्यान– पहिले

आज देशासमोर अन्नधान्याचा जो प्रश्न अुभा आहे तो देशाच्या स्वातंत्र्यापेक्षाही काहीसा जुना आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर हा प्रश्न लवकरच सुटेल अशी अपेक्षा होती. ती दिवसेंदिवस दुरावतच गेली. हा प्रश्न अधिकाधिक बिकट होत चालला आहे आणि गेल्या तीन चार वर्षांत तर त्याने जे स्वरूप धारण केले आहे त्यामुळे देशाचे स्वातंत्र्य धोक्यात येईल की काय अशी भीती निर्माण झाली आहे. गेली २०–२५ वर्षे हा प्रश्न सोडविण्यासाठी सरकार आपल्यापरीने प्रयत्न करीत आहे. त्याकरिता सरकारने वेळोवेळी तज्ज्ञ–समित्या नेमून त्यांचा सल्ला घेतला आहे. या समित्यांनी या प्रश्नाचा उहापोह करून आपापल्या बुद्धीप्रमाणे व धारणेनुसार उपाय सुचविले आहेत. या उपाययोजनांची कमीअधिक प्रमाणात अंमलबजावणी झाली आहे आणि त्याचे अनुभव जमेस आहेत. या सर्व खटाटोपातून अजून प्रश्न सुटला नसला, किंबहुना सुटण्याच्या मार्गावरही नसला तरी या प्रश्नाचे मूळ स्वरूप काय आणि तो सोडविण्याचे पर्यायी मार्ग कोणते हे स्पष्ट झाले आहे. सुरूवातीस इतर सर्वच आर्थिक, सामाजिक प्रश्नांप्रमाणे या प्रश्नाचा विचार करितानासुद्धा तज्ज्ञांमध्ये ही काही राजकीय तत्वनिष्ठा अभिप्रेत असते. परंतु अलीकडे या प्रश्नाचे गांभीर्य जाणून क्षणभर साध्या तत्वनिष्ठा बाजूस ठेवूनही हा प्रश्न सोडविण्याकरिता कोणताही व्यवहार्य आणि परिणामकारक मार्ग सापडत असेल तर तो शोधावा, अशी साहजिक प्रवृत्ती होत आहे. याविषयी सरकारला मार्गदर्शन करणारी अगदी अलीकडील तज्ज्ञ समिती म्हणजे गतवर्षीची अन्नधान्य धोरण समिती (१९६६) ही होय. या समितीने अन्नधोरण विषयक तीन मूळ उद्दिष्टे डोळ्यांसमोर ठेवून एका 'सुसंबद्ध अन्नधोरणाचा' पुरस्कार केला आहे. ही तीन उद्दिष्टे अशी :

१) स्वावलंबन – अर्थात् अन्नधान्याबाबतचे आजचे परावलंबित्व नष्ट करणे.

२) देशातील उपलब्ध अन्नधान्याचे देशाच्या सर्व भागात आणि समाजाच्या सर्व

थरांत नयाय व समान वाटप, आणि ३) अन्नधान्याच्या योग्य किंमती – म्हणजे समाजातील अत्यंत गरीब वर्गास परवडू शकतील अशा किंमती.

अन्नधान्य धोरण समिती ने (१९६६) पुरस्कार केलेल्या सुसंबद्ध अन्नधोरणाने ही तीन उद्दिष्टे कितपत साध्य होतील याचा विचार नियोजित तीन व्याख्यानांत करावा, असा माझा मानस आहे.

**अन्नधोरणातील दोन पर्याय** : सर्वप्रथम व प्रमुख उद्दिष्ट म्हणजे स्वावलंबन– अर्थात् अन्नधान्याबाबतचे आजचे परावलंबित्व नाहीसे करणे. देशाचे स्वातंत्र्य अबाधित ठेवावयाचे तर ही गोष्ट आज अत्यंत महत्त्वाची आणि निकडीची झाली आहे. तेव्हा तिचा प्रथम विचार करू. मी प्रारंभी म्हटल्याप्रमाणे अन्नधान्याचा हा प्रश्न आपणांसमोर गेली २०–२५ वर्षे आहे. त्यामुळे या काळात कोणत्या कारणांनी, कोणत्या मार्गांनी आणि कोणकोणत्या टप्प्यांनी आपण आजच्या परावलंबनाप्रत येऊन पोचलो, याचा थोडक्यात आढावा घेणे उपयुक्त होईल. आपणाला माहीतच आहे की, १९३९ साली दुसरे महायुद्ध सुरू झाल्यानंतर अन्नधान्याचा हा प्रश्न उद्भवला आणि १९४२ साली जपान युद्धात उतरल्यानंतर तो अधिक गंभीर झाला. जुलै १९४२ मध्ये भारत सरकारने पहिली अन्नधान्य धोरण समिती नेमली. ''युद्धकाळामध्ये जास्तीत जास्त अन्नधान्य कसे उपलब्ध होईल, त्याचे समान वाटप कसे होऊ शकेल आणि अन्नधान्यांच्या किंमतींचे योग्य नियंत्रण कसे करावे यासंबंधी धोरण व कारभारविषयक शिफारसी करणे'', हे या समितीचे काम होते. अर्थातच एक तात्पुरता युद्धकालीन प्रश्न असे समजूनच समिती या प्रश्नाचा विचार करीत होती. आपण एका मूलगामी आणि दीर्घकालीन समस्येसंबंधी विचार करीत आहोत अशी त्यावेळी कोणाला शंकादेखील शिवली नाही. या समितीने अशी शिफारस केली की मोठ्या शहरातून ताबडतोब शिधावाटप सुरू करावे आणि मग हळूहळू त्याचा अंमल सर्व नागरी मापांत जारी करावा. 'नागरी भागात जेवढे धान्य लोकांना शिधावाटपात दिले जाते तेवढेच शेतकऱ्याजवळ ठेवून त्याच्याजवळचे बाकीचे सर्व धान्य हस्तगत करणे सरकारला शक्य नाही', या कारणास्तव नागरी भागाप्रमाणेच ग्रामीण भागातही शिधावाटप सुरू करणे समितीला व्यवहार्य वाटले नाही. म्हणून ग्रामीण भागास, विशेषतः तुटीच्या ग्रामीण भागात कायदेशीर शिधावाटप सुरू न करिता अनौपचारिक धान्यवाटपाची सोय करावी, अशी शिफारस समितीने केली. शिधावाटपाची व अनौपचारिक धान्यवाटपाची गरज भागवू शकेल अितक्या धान्याची वसुली योग्य पद्धतीने सरकारने करावी, अशी शिफारसहि या समितीने केली.

सरकारने समितीच्या या शिफारशी स्वीकारल्या, आणि त्यानुसार १९४७च्या अखेरपर्यंत, म्हणजे साडेचार वर्षे, अन्नधान्याचे वाटप चालू राहिले. १९४७ च्या डिसेंबरमध्ये देशात एकूण ५ कोटी ४० लाख लोकांना कायदेशीर शिधावाटपानुसार आणि किमान ९ कोटी लोकांना अन्य प्रकारच्या अनौपचारिक वाटपानुसार अन्नधान्य पुरविण्यात येत होते. एकंदरीने पाहाता अन्नधान्याचे वाटप या काळात समाधानकारकपणे चालू होते, आणि अन्नधोरणाची तात्कालीक उद्दिष्टे साध्य झाली होती. परंतु या धोरणातून अशी एक गंभीर परिस्थिती निर्माण झाली की जिचे दीर्घकालीन परिणाम काय होतील याची नीटशी कल्पना त्यावेळी आली नाही. या काळात अन्नधोरणानुसार धान्यवाटपाचा जसजसा प्रसार होत गेला तसतशी धान्यवाटपाबाबतची सरकारची जबाबदारी वाढत गेली. परंतु ही जबाबदारी पार पाडण्याकरिता आवश्यक तेवढे धान्य वसूल करणे अवघड होऊ लागले. धान्यवाटपाची जबाबदारी वाढली तरी धान्यवसुली मात्र ४० लाख टनाच्या पुढे गेली नाही. त्यामुळे धान्यवाटपाची जबाबदारी पार पाडण्याकरिता परदेशातून धान्य आयात करणे भाग पडले. परदेशातून करावी लागणारी ही आयात सालोसाल वाढतच गेली. या काळातील धान्य आयातीचे आकडे पुढील प्रमाणे आहेत. १९४४ साली १६ लाख टन, १९४५ साली १८ लाख टन, १९४६ साली २६ लाख टन, आणि १९४७ साली २७ लाख टन. या आयात धान्याची किंमत परदेशी चलनात द्यावी लागली. शिवाय आयात धान्यांची किंमत देशी धान्यांच्या किंमतीपेक्षा अधिक असल्याने आयात धान्यांचे वाटप करताना सरकारला नुकसान सोसावे लागले. अशा रीतीने आपणांसमोर आज असलेला अन्नधान्याचा प्रश्न त्याच्या सर्व अंगउपांगांसहित १९४७ साली म्हणजे सुमारे २० वर्षांपूर्वी प्रथम मूर्त स्वरूपात अुभा राहिला. ही परिस्थिती लक्षात घेऊन अन्नधोरणाचा पुनश्च विचार करण्यासाठी सरकारने सप्टेंबर १९४७ मध्ये दुसरी अन्नधान्य धोरण समिती नेमली.

यानंतर पाच वर्षे म्हणजे १९४७ पासून १९५१ पर्यंत या प्रश्नासंबंधी पुष्कळ चर्चा झाली. अन्नधान्यांसंबंधीच्या वाढत्या परावलंबित्वाला आळा कसा घालावा, याचा विचार झाला. अन्नधान्य धोरण समितीने (१९४७) असे मत व्यक्त केले की धान्यनियंत्रणाची त्यावेळी चालू असलेली पद्धतच वाढत्या धान्य-आयातीला जबाबदार होती. समितीने असे स्पष्टपणे सांगितले की, तुटीच्या परिस्थितीत कोणत्याही सरकारने कोणत्याही प्रमाणात धान्यवाटपाची जबाबदारी स्वीकारली तर ती पार पाडण्याकरिता आवश्यक तेवढी धान्य वसुली करणे सरकारला कदापि शक्य होणार नाही. समितीचा

युक्तिवाद असा होता : शेतकऱ्यांकडून त्यांचे सर्वच्या सर्व धान्य हस्तगत करणे अशक्य आहे, आणि ही वस्तुस्थितीच सर्व अडचणींचे मूळ कारण आहे. पहिल्या अन्नधान्य धोरण समितीनेही (१९४२) ही गोष्ट मान्य केली होती. किंबहुना याच कारणामुळे त्या समितीने ग्रामीण भागात केवळ अनौपचारिक धान्यवाटपाचीच व्यवस्था करावी, असे सुचविले होते. याचा अर्थ असा की, ग्रामीण भागात म्हणजेच जेथे धान्य-उत्पादन होते अशा भागात अन्नधान्याचा खुला बाजार चालू राहाणे अपरिहार्य आहे. तुटीच्या परिस्थितीत खुल्या बाजारातील किंमती धान्यवसुलीच्या सरकारी किंमतीपेक्षा साहजिकच वर राहाणार. त्यामुळे धान्यवसुली अधिकाधिक अवघड होते आणि खुल्या बाजाराचे क्षेत्र वाढते. अन्नधान्य धोरण समितीने (१९४७) असे मत व्यक्त केले की, 'अशा प्रकारे एक दुष्टचक्र सुरू झाले आहे. उपलब्ध अन्नधान्यांचे वाढते विषम वाटप, देशाच्या काही भागात असलेल्या तुटीसंबंधी अतिशयोक्त प्रवाद, प्रत्यक्ष धान्यपुरवठ्याच्या परिस्थितीचा विचार करिता पूर्णपणे असमर्थनीय आणि अवास्तव असे निकट भविष्यकाळातील दुष्काळासंबंधीचे विकृत व भयंकर भाकीत, आणि प्राप्त परिस्थितीला तोंड देण्यासाठी सरकारने योजिलेल्या उपायांमुळे समाजातील सर्व वर्गांमध्ये वाढणारा असंतोष हे या दुष्टचक्राचे अपरिहार्य परिणाम आहेत. परदेशातून प्रचंड प्रमाणावर करावी लागणारी धान्याची आयात ही या सर्व अनिष्ट परिणामांतील सर्वांत अधिक गंभीर घटना आहे.' समिती पुढे म्हणते, 'या कारणांमुळे आम्ही या निष्कर्षावर येऊन पोचलो आहोत की, या देशाच्या अन्नधान्य-प्रश्नाकडे अगदी नवीन दृष्टीने पाहाणे अगत्याचे झाले आहे. या दृष्टिकोनातून पाहाता अन्नधोरणाची दोन उद्दिष्टे असावयास हवीत. पहिले असे की, देशाचे धान्यविषयक परावलंबित्व व्यवस्थित व विचारपूर्वक टप्प्यांनी नाहीसे करावे. दुसरे असे की, सरकारने धान्यवाटपाबाबत ज्या जबाबदाऱ्या स्वीकारलेल्या आहेत त्याचेही असेच व्यवस्थित आणि विचारपूर्वक टप्प्यांनी विसर्जन करणे. हे धोरण ताबडतोब अमलात आले नाही, आणि चालू धोरणाच्या विसर्जनास सुरूवात झाली नाही तर सध्याचे अन्नसंकट अनंत काळपर्यंत असेच चालू राहील. ---- या समस्येची खरी सोडवणूक धान्यआयातीने किंवा धान्यवसुली, धान्यवाटप इत्यादी धान्यनियंत्रणांनी होणार नाही. भारताचा अन्न प्रश्न सोडविण्याचा एकमेव मार्ग म्हणजे देशातील अन्नधान्याच्या उत्पादनात शक्य जितक्या लौकर भरीव वाढ करणे हाच होय.'

समितीने सुचविलेल्या धोरणाची अंमलबजावणी करून पाहाण्यात आली, परंतु ते अयशस्वी ठरले, कारण विनियंत्रणामुळे जेव्हा अन्नधान्यांच्या किंमती वाढू लागल्या

तेव्हा त्या धान्यवाढीकडे दुर्लक्ष करणे राजकीय दृष्ट्या शक्य नव्हते. सरकारला काही तरी करणे भाग होते. १९४७ साली अस्तित्वात असलेली नियंत्रणे पुनः पत्करण्याखेरीज गत्यंतर नव्हते. परंतु त्यानेही परिस्थितीत समाधानकारक सुधारणा झाली नाही. नियंत्रणाची मूलभूत समस्या म्हणजे नियंत्रित वाटपासाठी लागणारे धान्य आणि प्रत्यक्ष करिता येणारी धान्यवसुली यांच्यातील अंतर, ही तशीच कायम राहिली. म्हणून सरकारने फेब्रुवारी १९६० मध्ये धान्यवसुलीच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी अन्नधान्य वसुली समिती नेमली. या समितीने असे मत व्यक्त केले की, 'पुनर्नियंत्रण अयशस्वी झाले किंवा होत आहे, याचे कारण ते अमलात आणले आणि सदोष ठरले असे नसून ते प्रामाणिकपणे अमलातच आणले नाही, हे आहे.' धान्यनियंत्रणाच्या अपयशासंबंधी या समितीचे निदान आणि अन्नधान्य धोरण समितीने (१९४७) केलेले निदान ही दोन्ही तंतोतंत एकच होती. शेतकऱ्यांकडून त्यांच्या सर्व जादा उत्पन्नाची वसुली करण्यातील अपयश, त्यामुळे चालू राहाणारा खुला बाजार, धान्यवसुलीच्या नियंत्रित किंमतीपेक्षा वरचढ राहाणाऱ्या खुल्या बाजारातील किंमती आणि त्यायोगे धान्यवसुलीच्या मार्गात निर्माण होणाऱ्या अधिकाधिक अडचणी, हेच मुद्दे या दोन्ही समित्यांनी केलेल्या निदानात होते. अन्नधान्य धोरण समितीने (१९४७) आपल्या निदानापासून असा निष्कर्ष काढला की हे असे होणे अपरिहार्य होते, आणि म्हणून तिने संपूर्ण विनियंत्रणाचा सल्ला दिला. धान्य वसुली समितीला (१९५०) निदान मान्य होते, मात्र तिचा निष्कर्ष नेमका उलटा होता. तिने असा सल्ला दिला की, खुल्या बाजाराला किंचित्‌ही वाव मिळणार नाही, अशा प्रकारे सुसंगत व संपूर्ण अशी नियंत्रण पद्धती अमलात आणावी. खेड्याच्या पातळीवर एकाधिकार धान्यवसुली, खेड्याबाहेर खुल्या बाजाराला व धान्यवाहतुकीला संपूर्ण बंदी आणि सर्वच पूर्णपणे कायदेशीर किंवा जवळजवळ कायदेशीर शिधावाटप, ही या समितीने पुरस्कारिलेल्या धोरणाची प्रमुख अंगे होती.

या धोरणाची अंमलबजावणी केव्हाच झाली नाही, कारण ते राजकीयदृष्ट्या तसेच प्रत्यक्ष कारभारदृष्ट्या अव्यवहार्य आहे, असे समजले गेले. एकीकडे अन्नधान्य परिस्थिती झपाट्याने अधिकाधिक बिघडत होती आणि त्यावेळी विद्यमान असलेली नियंत्रण पद्धती या बिघडत्या परिस्थितीला तोंड देण्यास असमर्थ होती, हे उघड आहे. जून १९५० मध्ये कोरियात युद्ध सुरू झाले आणि साऱ्या जगभर जीवनोपयोगी वस्तूंच्या बाजाराला तेजी आली. भारतात एकामागून एक नैसर्गिक आपत्तींमुळे पिकांचे अतोनात नुकसान झाले आणि भाववाढ जास्तच तीव्रतेने जाणवू लागली.

एप्रिल १९५१ मध्ये भाववाढ कमाल मर्यादेपर्यंत पोचली आणि त्यामुळे साठेबाजी व नफेबाजी फोफावली. धान्यवसुली अधिकाधिक अवघड होऊन धान्यवाटप परावलंबी झाले. तेवढी आयात धान्याची किंमत देणे आपल्या आवाक्याबाहेर गेले, आणि सरकारने परदेशांकडे धान्य मदतीची याचना केली. या याचनेला प्रतिसाद म्हणून अमेरिकन सरकारने ताबडतोब २० लाख टन गहू कर्जाऊ दिला. ५ वर्षांनंतरच्या परावलंबी धोरणाची ही नांदीच होती.

अशा प्रकारे १९४७ ते १९५१ पर्यंत, पाच वर्षे या प्रश्नावर झालेल्या चर्चाविचारातून अन्नधोरणाबाबत दोन स्पष्ट पर्याय उभे राहिले. ते म्हणजे संपूर्ण नियंत्रण आणि संपूर्ण विनियंत्रण. हे दोन्ही पर्याय राजकीयदृष्ट्या व्यवहार्य नाहीत, असेही अनुभवाने ठरले. थोडीफार धान्य-वसुली, थोडेबहुत कायदेशीर शिधावाटप आणि काही थोडे अनौपचारिक धान्य वाटप हेच धोरण राजकीयदृष्ट्या व्यवहार्य होते. हे धोरण अपुरे व निष्प्रभ आहे, याची खात्रीच होती. परंतु प्राप्त परिस्थितीला तोंड देण्यासाठी सरकारने काहीतरी करणेही जरूर होते. जेव्हा अंतर्बाह्य कारणांनी सर्वंच अर्थव्यवस्था कमकुवत होऊन साऱ्याच वस्तूंच्या किमती भरमसाट वाढू लागतात तेव्हा वरील अन्नधोरणाने अन्नधान्यांच्याच तेवढ्या किंमती रोखणे अशक्य आहे, हे कळून चुकले, आणि या धोरणामुळेच अन्नधान्याबाबतचे परावलंबित्व वाढत जाणे व शेवटी सरकारला परदेशाकडे धान्य मदतीसाठी याचना करणे अपरिहार्य आहे, हीही गोष्ट स्पष्ट झाली.

अन्नधान्याबाबतच्या परावलंबित्वामुळे जी अस्वस्थतेची भावना निर्माण झाली त्यामुळे संपूर्ण विनियंत्रणाचा पुनः एकदा प्रयोग करून पाहावयाचे ठरले. त्याला सुलभ अशी संधीही लौकरच मिळाली. कोरियात युद्धबंदी होताच जागतिक बाजारातील तेजी ओसरली. त्यातच १९५२-५३ साली पिके चांगली आली, आणि अन्नधान्यांच्या किंमती घसरल्या. ही संधी साधून सरकारने नियंत्रणे सैल करण्याचे ठरविले. सुदैवाने १९५३-५४ साली पिके जास्तच चांगली होती. त्यामुळे सरकारने सर्व नियंत्रणे काढून टाकून संपूर्ण विनियंत्रणाचे धोरण अमलात आणले. अशा प्रकारे धोरणविषयक ज्या दोन पर्यायांवर अनेक वर्षे चर्चा झाली त्यांपैकी विनियंत्रणाचा पर्याय तेवढी स्वीकारला गेला.

**परावलंबी धोरण :**

संपूर्ण विनियंत्रणाचे हे धोरण सुमारे वर्षभर यशस्वी होत असल्याचा भास होत होता. मे १९५५ मध्ये धान्यांच्या किंमती गेली कित्येक वर्षे उतरल्या नव्हत्या

अितक्या खाली उतरल्या. अर्थात् हा सुयोग असाच कायम राहाणार नाही आणि अन्नधान्याबाबतची मूलभूत समस्या पुनश्च केव्हाना केव्हा तरी उपस्थित होणार याची जाणीव सर्वांनाच होती. हे घडण्यास फार काळ जावा लागला नाही. १९५५ सालीच ज्वारी-बाजरीचे पीक फार कमी आले आणि किंमती पुनः चढू लागल्या. १९५६ साली देखील किंमती वाढतच राहिल्या. अशा स्थितीत संपूर्ण नियंत्रण की संपूर्ण विनियंत्रण यासंबंधी पुनः एकदा चर्चा सुरू होणे साहजिक होते. परंतु आता एकूण परिस्थितीला एक नवीन वळण मिळाले होते, आणि एक नवीन धोरण आकार घेत होते. अमेरिकेमध्ये जादा अन्नधान्याचे अमाप साठे उपलब्ध असल्याचा शोध सरकारला यासुमारास लागला. लगोलग भारत सरकारने ऑगस्ट १९५६ मध्ये अमेरिकन सरकारकडून त्यांच्या पी.एल्. ४८० या कायद्यान्वये एकूण २१ लाख टन गहू आणि सुमारे २ लाख टन तांदूळ पुढील तीन वर्षात आयात करण्याचा करार केला. या आयात धान्याची किंमत परदेशी चलनात न द्यावी लागता ती भारतीय चलनात म्हणजे रूपयात देण्याची सोय असल्यामुळे या आयातीचे स्वरूप निव्वळ व्यापारी नसून ती एक प्रकारची धान्य मदतच होती. आपला अन्नधान्य प्रश्न शेवटी सुटला, हे भारत सरकारच्या अन्नखात्याच्या लक्षात आले. आणि एका नवीन धोरणाचा प्रारंभ झाला. परंतु या धोरणावर एखाद्या स्वतंत्र तज्ज्ञ समितीकडून शिक्कामोर्तब करून मिळाले तर बरे म्हणून जून १९५७ मध्ये सरकारने श्री. अशोक मेहता यांच्या अध्यक्षतेखाली एक अन्नधान्य चौकशी समिती नेमली. येथून आपल्या अन्नधान्य-प्रश्नासंबंधी एक नवीन पर्व सुरू होते. १९५७ पासून १९६६ पर्यंत म्हणजे दहा वर्षे हे पर्व चालू राहिले.

पी.एल्. ४८० या अमेरिकन कायद्याखाली जेवढे मिळेल तेवढे धान्य आयात करणे, हा या नवीन धोरणाचा मुख्य आधार होता. याचा अर्थ व्यापारी पद्धतीने आयात केलेल्या धान्यावरच नव्हे तर अमेरिकेकडून मदत म्हणून मिळणाऱ्या धान्यावर आपले अन्नधोरण आधारले गेले. अशा रीतीने जाणूनबुजून एक परावलंबी धोरण आपण स्वीकारले. मदत म्हणून मिळणारे हे धान्य बाजारात कमीत कमी किंमतीला विक्रीस काढून त्याच्या जोरावर देशातील अन्नधान्यांच्या किंमती शक्य तेवढ्या खाली आणावयाच्या, हे या धोरणाचे सूत्र होते. सरकारने या सूत्राचे प्रतिपादन देशात 'वैपुल्याची भावना' निर्माण करणे, अशा शब्दात केले होते. अमेरिकेतील जादा धान्याच्या साठ्यांचा शोध लागल्यापासून ही विपुलतेची भावना सरकारच्या धान्यखात्यात निर्माण झाली होतीच. तीच जनतेपर्यंत पोचवावी, अशी सरकारची

मनीषा होती, असे दिसते. अशोक मेहता समितीने या धोरणाला संपूर्ण पाठिंबा दिला. आपली अन्नसमस्या दीर्घकालीन आहे, हे स्पष्ट करून समितीने आग्रहपूर्वक असे प्रतिपादिले की, 'काही प्रमाणात अन्नधान्याची आयात सतत होत राहील, अशी निश्चिती असली तरच या पुढील अन्नधोरण यशस्वी होऊ शकेल.' हा मुद्दा महत्त्वाचा आहे. म्हणून यासंबंधीचे समितीचे प्रतिपादन मी तिच्याच शब्दात सविस्तर मांडतो :- 'या संदर्भात आम्ही या गोष्टीवर भर देऊ इच्छितो की पुढील काही वर्षे अन्नधान्यांची भरपूर आयात करण्यात आली नाही तर आपणांस आवश्यक असलेला अन्नधान्यांचा शिलकी साठा उभा करिता येणार नाही. किंवा देशातील गरीब वर्गाच्या अन्नधान्यांच्या गरजाही भागविता येणार नाहीत. ---- पी.एल्.४८० कायद्यान्वये अमेरिककडून सढळ प्रमाणात गहू आणि काही तांदूळ घेणे आपल्या हिताचे ठरेल, असे आम्हांला वाटते. अशा सवलतीच्या अटीवर धान्याची आयात करण्याने परदेशी चलनाची बचत तर होईलच, शिवाय आपल्या विकासकामासाठी वापरता येईल असा रुपयांचा निधी आपणास या बाबत गव्हाच्या विक्रीतून उभा करिता येईल. -
---- परदेशातून अन्नधान्याचा अशा रीतीने खात्रीशीर पुरवठा होत राहिला तर आपल्याला एक निश्चित दीर्घकालीन धोरण अमलांत आणता येईल, हे उघड आहे. किंबहुना यापुढील काही वर्षांसाठी यशस्वी अन्नधोरण आखावयाचे तर ते काही निश्चित प्रमाणात सतत होणाऱ्या अन्नधान्याच्या आयातीवरच आधारावे लागेल.' अशा रीतीने एक ठाम व कायमचे अन्नधोरण अस्तित्वात आले, आणि ते यशस्वी होणार अशी चिन्हे दिसू लागली. राजकीयदृष्ट्या ते सोयिस्कर होते. सरकारला त्यासाठी कोणतीही तोशीस पडणार नव्हती, किंबहुना सरकारच्या अपेक्षेप्रमाणे या व्यवहारात सरकारला काही रुपयांची प्राप्ती होणार होती. अंमलबजावणीच्या दृष्टीने हे धोरण तर फारच सुलभ होते. एका वर्षाच्या अवधीत सरकारने दरवर्षी ४० लाख टन आयात केलेल्या धान्याचे वाटप करू शकेल एवढी दुकानदारी उभारली. जवळ-जवळ १० वर्षे संपूर्ण नियंत्रण की संपूर्ण विनियंत्रण यावर झालेली चर्चा अनावश्यक व निरर्थक ठरली. एकदा साराच भरवंसा धान्य आयातीवर टाकल्यानंतर नियंत्रण-विनियंत्रणाचे पर्याय अर्थातच अनावश्यक ठरले. त्यामुळे आपली अन्नसमस्या या दोन्ही पर्यायांच्या समन्वयाने सुटेल असे चौकशी समितीला (१९६७) वाटले असल्यास नवल नाही. सदर समिती म्हणते, 'गेल्या काही वर्षांतील अनुभवावरून हे स्पष्ट झाले आहे की विद्यमान परिस्थितीत अनिर्बंध खाजगी व्यापार परिणामी अनिष्ट ठरेल. -
---- १९५३ पूर्वी अस्तित्वात होती. त्या पद्धतीची धान्यवसुली व धान्यवाटपा-

बाबतची नियंत्रणेही सद्यःस्थितीत इष्ट वाटत नाहीत. ---- आमच्या मते आपल्या अन्नसमस्येचे उत्तर अनिर्बंध खाजगी व्यापार आणि संपूर्ण नियंत्रण या दोन पर्यायांच्या मध्ये कोठेतरी सापडणार आहे.' नियंत्रणाचे स्वरूप बंधनात्मक न ठेवता ते मार्गदर्शक करिता आले तर संपूर्ण खुला व्यापार आणि संपूर्ण नियंत्रण यांचा योग्य व आवश्यक समन्वय साधता येईल अशी समितीची कल्पना होती. त्या उद्देशाने अन्नधान्याच्या घाऊक व्यापाराचे टप्प्या-टप्प्याने व योजनाबद्ध राष्ट्रीयीकरण करावे असे समितीने सुचविले. त्यातील पहिली पायरी म्हणून समितीने अशी शिफारस केली की एक अन्नधान्य स्थिरीकरण संघटना स्थापावी आणि या संघटनेने 'अन्नधान्यांच्या बाजारात एक व्यापारी संस्था म्हणून भाग घ्यावा.' त्याकरिता या संघटनेने 'खुल्या बाजारात अन्नधान्यांची विक्री तसेच धान्यवसुली आणि धान्यांचे साठे करण्याची निश्चित जबाबदारी' स्वीकारावी, अशी समितीची शिफारस होती. या शिफारसीसंबंधी मी यथावकाश सविस्तर चर्चा करणार आहे. प्रस्तुत विवेचनाच्या दृष्टीने एवढेच सांगणे जरूरीचे आहे की आपले सारेच अन्नधोरण धान्यआयातीवर आधारावयाचे असे ठरविले म्हणजे कोणत्याच बंधनात्मक मार्गदर्शक नियंत्रणांची गरज राहात नाही. अमेरिकेत असलेल्या अन्नधान्यांच्या साठ्यावरच अन्नधोरण उभारले की मग पुनश्च अन्नधान्यांचे साठे भारतात करण्याची गरज ती काय? अमेरिकेत अन्नधान्यांचे साठे आहेत आणि त्यातून हवे तेवढे धान्य वेळोवेळी लागेल तसे मिळते. मग स्थानिक धान्याची खरेदी वा वसुली करण्याची गरज कोठे राहिली? थोडक्यात म्हणजे लागेल तितक्या धान्य आयातीची सोय उपलब्ध झाल्याने स्थानिक धान्याची खरेदी वा वसुली न करिता बाजारात धान्य विकणे सरकारला शक्य झाले. त्यामुळे समितीने केलेल्या इतर शिफारशींची सरकारला गरज भासली नाही. तात्पर्य, संपूर्ण खुला व्यापार आणि संपूर्ण नियंत्रण यांचा समन्वय साधून एका दूरगामी धान्यधोरणाची सुरूवात करावी असे समितीने सुचविले असले तरी प्रत्यक्षात जे सुचविले व जे स्वीकारले गेले ते हे की, अनियंत्रित धान्य आयात करावी आणि देशात संपूर्ण खुला व्यापार चालू ठेवावा.

या धोरणाची दोन सर्वमान्य उद्दिष्टे होती. ती म्हणजे अन्नधान्यांच्या किंमती खाली आणणे आणि वाढत्या किंमतीपासून गरीब वर्गांना संरक्षण देणे. त्यास स्वावलंबनाची चाड नव्हती किंवा परावलंबनाचे दुःख नव्हते. या धोरणाची अंमलबजावणीही फार सोपी होती. पी.एल्. ४८० कायद्याखाली लागेल तेवढे अन्नधान्य अमेरिकेतून आणावे आणि स्वस्त धान्य दुकानांतून कोणासही लागेल

तेवढे ते अत्यंत स्वस्त किंमतीत विकावे. स्थानिक अन्नधान्यांच्या खुल्या बाजारातील किंमतीच्या मानाने स्वस्त धान्य दुकानातून विकल्या जाणाऱ्या आयात धान्यांच्या किंमती इतक्या कमी असत की स्थानिक धान्यांना त्यांची बरोबरी करणे शक्यच नव्हते. अशा रीतीने स्थानिक धान्यांच्या वरचढ किंमतीपासूनच नव्हे तर खुद्द स्थानिक अन्नधान्यांपासूनच देशातील गरीब जनतेचे संरक्षण करण्यात आले. स्वस्त धान्य दुकानातून मिळणाऱ्या गव्हाखेरीज जवळजवळ त्याच प्रमाणात, आयात गव्हाचा आटाही आयत स्वस्त दराने खुल्या बाजारात विक्रीस ठेवण्यात आला. ऑगस्ट १९५६ मध्ये पी.एल्. ४८० कायद्यानुसार पहिला करार झाला आणि हे नवीन धोरण अमलात आले. या करारापुढील तीन वर्षात एकूण ३१ लाख टन गहू आणि सुमारे २ लाख टन तांदूळ अमेरिकेतून आयात करण्याची तरतूद होती. परंतु हे नवे अन्नधोरण अपेक्षेबाहेर यशस्वी झाले, आणि तीन वर्षांत करावयाची धान्य आयात आपण एका वर्षातच संपवून टाकली. त्यामुळे पुढील वर्षी, म्हणजे १९५८ साली धान्य आयात करण्याकरिता नवीन करार करावे लागले. त्यावर्षी असे दोन करार करून ४० लाख टनांहून थोडा अधिक गहू आयात करण्याची सोय केली. पुनः १९५९ साली नवीन करार करून त्यासाठी ४० लाख टन गहू आयात केला. अशा प्रकारे १९५९ च्या अखेरीस दरसाल सुमारे ४० लाख टन आयात धान्याचा फडशा पाडण्याचे तंत्र आपण अवगत केले. हे नवे धोरण आणि नवे तंत्र याविषयी एवढा आत्मविश्वास निर्माण होता की मे १९६० मध्ये आपण लीलया एक करार करून पुढील चार वर्षात १ कोटी ६० लाख टन गहू व १० लाख टन तांदूळ आयात करण्याची व्यवस्था केली. या कराराने साऱ्या जगाचे डोळे दिपले. इतक्या मोठ्या प्रमाणावर सतत ६-७ वर्षे अन्नधान्याची आयात होत राहिल्याने अन्नधान्यांला व विशेषतः गव्हाच्या किंमती जितक वस्तूंच्या किंमतीच्या मानाने कमी व स्थिर राहिल्या. शिवाय अन्नधान्यांच्या किंमती थोड्याबहुत वाढल्या तरी या वाढत्या किंमतींचा उपद्रव गरीब जनतेस होत नव्हता. मुख्य बाजारात अन्नधान्य घेणे ज्या कोणास परवडत नव्हते त्या सर्वांस स्वस्त धान्य दुकानातून मुबलक प्रमाणात धान्य अत्यंत कमी व जवळजवळ स्थिर किंमतीत विकत घेता येत होते.

अशा प्रकारे हे नवे धोरण आणि नवे तंत्र प्रस्थापित झाले. मी वर सांगितल्याप्रमाणे पी.एल्. ४८० कराराखाली मुबलक प्रमाणात धान्य आयात करून त्याच्या आधाराने देशात अन्नधान्यांच्या खुल्या बाजाराचे राज्य चालू ठेवावे हेच या धोरणाचे अंतिम स्वरूप होते, आणि हे धोरण यशस्वी होत आहे असे दिसले. परंतु दुर्दैवाने पुनः

अडचणी निर्माण झाल्या. १९६२-६३ साली आणि पुनः १९६३-६४ साली अन्नधान्यांचे उत्पादन घटले. याखेरीज सर्वसामान्य किंमती वर ढकलणाऱ्या चलनवाढीसारख्या अनेक प्रेरक शक्ती अर्थव्यवस्थेत प्रबळ झाल्या होत्या. या सर्वांचा परिपाक म्हणून ऑगस्ट १९६२ पासून अन्नधान्यांच्या किमती चढू लागल्या आणि केवळ सहा महिन्यांच्या अवधीत त्यांत ३३ टक्क्यांहून अधिक वाढ झाली. साहजिकच स्वस्त धान्य दुकानांतून मिळणाऱ्या धान्याला असणारी मागणी झपाट्याने वाढली, आणि दरसाल आयात होणारे ४० लाख टन धान्यही अन्नधान्यांच्या किंमती खाली आणण्यास किंवा होणाऱ्या भाववाढीपासून गरीब जनतेचे संरक्षण करण्यास असमर्थ ठरले.

आता अन्नधोरणाचा फेरविचार करणे भाग होते, आणि गतानुगतिकपणे आपण पुनश्च परिचित मार्गांचा अवलंब केला. धड संपूर्ण खुला व्यापारही नाही किंवा धड संपूर्ण नियंत्रणही नाही, तर थोडी फार धान्यवसुली, अंशतः कायदेशीर शिधावाटप आणि अंशतः स्वस्त धान्य दुकानांतून धान्य वाटप, हा तो मार्ग होय. यास अनुसरून सरकारी धान्यवाटपाची झपाट्याने वाढ करण्यात आली. १९६२ साली एकूण धान्यवाटप ४१ लाख टन होते ते १९६३ साली ४८ लाख टन, १९६४ साली ८४ लाख टन, १९६५ साली ९८ लाख टन आणि १९६६ साली १ कोटी १४ लाख टन झाले. धान्यवाटपाची जबाबदारी पूर्ण करण्यासाठी आवश्यक म्हणून धान्यवसुली जारी करण्यात आली. ''अन्नधान्य धोरण समितीच्या (१९६६) मते या काळात धान्यवसुली व धान्यवाटप ही धोरणे अमलात आणली नसती तर देशातील बहुसंख्य जनतेला आणि देशाच्या सर्व भागात सुलभ रीतीने धान्य पुरवठा करणे अवघड झाले असते. ---- धान्यवाटपाच्या धोरणामुळेच निरनिराळ्या राज्यात उपलब्ध होणाऱ्या अन्नधान्यांमधील विषमताही पुष्कळ प्रमाणात कमी होऊ शकली.''

हे कदाचित् खरेही असेल, परंतु या संदर्भात अधिक महत्त्वाची गोष्ट निराळीच आहे आणि ती चिंताजनक आहे. समितीच्याच शब्दात सांगावयाचे तर, 'राज्याराज्यातील अन्नधान्य पुरवठ्याबाबत जी सुधारणा झाली ती बहुतांशी १९६४ व १९६५ साली जी प्रचंड धान्य आयात करण्यात आली तिच्यामुळेच होऊ शकली, हे मान्य केले पाहिजे. १९६४ साली सरकारने जे ८७ लाख टन धान्यवाटप केले त्यापैकी ६३ लाख टन म्हणजे ७२ टक्क्यांहून अधिक धान्य परदेशातून आणलेले होते. १९६५ साली केलेल्या धान्यवाटपापैकी ७४ टक्के धान्य आयात केलेले होते. १९६६ साली केलेल्या धान्यवाटपामध्ये आयात धान्याचा वाटा यापेक्षाही अधिक असण्याचा संभव आहे. अन्नधान्याच्या पुरवठ्याबाबतचे हे परावलंबन चिंताजनक आहे.''

हे खरे असेल तर साहजिकच असा प्रश्न उभा राहातो की गेल्या तीन वर्षात अवलंबिलेले धान्यवसुलीचे व धान्यवाटपाचे धोरण प्रस्तुत चिंताजनक धान्य आयातीवरील परावलंबनाशिवाय अंमलात आणणे व चालू ठेवणे शक्य झाले असते काय? यापेक्षाही महत्त्वाचा प्रश्न असा की धान्यआयातीच्या बाबतीतील जे परावलंबन आपण अगतिकपणे पत्करले आहे ते तसेच पुढे चालू ठेवले नाही तर धान्यवसुलीचे व धान्यवाटपाचे आजचे धोरण असेच चालू ठेवणे शक्य होईल काय?

हे प्रश्न महत्त्वाचे तसेच निकडीचे आहेत, कारण गेल्या २-३ वर्षात धान्य आयातीसंबंधीच्या परिस्थितीत मोठा फरक घडून आला आहे. अन्नधान्य धोरण समिती (१९६६) म्हणते, 'यापुढे अन्नधान्याची आयात मुबलक आणि सुलभपणे करिता येणार नाही हे आता स्पष्ट झाले आहे. ---- अमेरिकेतून होणारी धान्य आयात यापुढे नुसती कमीच होईल असे नव्हे तर त्यासाठी द्यावी लागणारी किंमत आपल्याला आजच्याप्रमाणे रुपयात देता येणार नाही, ती डॉलरमध्येच द्यावी लागेल.' किंबहुना हा सौदा आपल्याला यापेक्षाही अधिक महाग पडण्याचा संभव आहे. भविष्यकाळात ही धान्य मदत आपल्या अंतर्गत आर्थिक धोरणावर, तसेच आपल्या परराष्ट्रीय धोरणावर गैर दडपण आणण्यासाठी वापरली जाईल, हे उघड झाले आहे. पी.एल्. ४८० कायद्यान्वये दिल्या जाणाऱ्या अन्नमदतीचे हे एक प्रमुख उद्दिष्टच आहे, आणि अमेरिकन कायद्यामध्ये तशी स्पष्ट तरतूदही आहे. भावी काळात या मदतीचा वापर अधिक कुटिलपणे केला जाईल आणि प्रसंगी आमची राष्ट्रीय मानहानी केली जाईल असे दिसते. अन्नधान्य धोरण समिती (१९६६) म्हणते, 'अतएव, भावी अन्नधोरण ठरवितांना धान्य आयातीबाबतची बदललेली ही परिस्थिती कटाक्षाने लक्षात घ्यावी लागेल. धान्य-आयातीवरील आपले परावलंबित्व हे अनिष्ट होतेच, भावी काळात ते कदाचित् शक्य कोटीतीलही राहाणार नाही. या वस्तुस्थितीचा आपल्या अन्नधोरणावर व त्याच्या अंमलबजावणीवर मूलगामी परिणाम होणे अपरिहार्य आहे. ---- यापुढे धान्य आयातीवरील परावलंबित्व अशक्य आहे. स्वावलंबनाखेरीज आता गत्यंतर नाही.'

१९५६ साली सरकारने निःशंकपणे अंगीकारिलेले व अशोक मेहता समितीने मान्यतेचे शिक्कामोर्तब केलेले हे धोरण की ज्यामुळे अन्नधान्य आयात व अन्नमदत याबाबत सध्याच्या भयावह, लज्जास्पद व दीनवाण्या परावलंबित्वाप्रत आपण येऊन पोचलो आहोत, त्या धोरणाचा आज अशा रीतीने शेवट होत आहे. याचा अर्थ असा की, यापुढे अन्नधान्याची मुळीच आयात करावयाची नाही, असा दृढनिश्चय

आपण केला पाहिजे. कारण आपण दृढपणे वेळीच याला पायबंद घातला नाही तर या केविलवाण्या परावलंबनाचा केव्हाच शेवट होणार नाही. तात्पर्य, यापुढील आपल्या अन्नधोरणाचे उद्दिष्ट आपल्या स्वतःच्या धान्य उत्पादनाचे योग्य वितरण करणे आणि त्याचबरोबर धान्याचे उत्पादन वेगाने वाढविणे हेच असावयास हवे.

**सुसंबद्ध अन्न धोरण :**

या उद्देशाने अन्नधान्य धोरण समितीने (१९६६) राष्ट्रीय अन्नव्यवस्थेची आवश्यकता प्रतिपादिली आहे. याचे स्पष्टीकरण करिताना सदर समिती म्हणते, 'राष्ट्रीय अन्नव्यवस्थेमध्ये अन्नधान्यांचा पुरवठा आणि वाटप यासंबंधीच्या राष्ट्रीय योजनेचा अंतर्भाव होतो, ही योजना म्हणजेच राष्ट्रीय अन्न संकल्प होय.

या योजनेच्या अंमलबजावणीच्या साधनांची चतुःसूत्री अशी आहे.

१) आवश्यक तेवढी धान्यवसुली करणे.

२) धान्य वसुलीचे काम सोपे व्हावे आणि धान्यांच्या किंमती योग्य पातळीवर राहाव्यात यासाठी राज्याराज्यांतील धान्य वाहतुकीवर निमंत्रण ठेवणे.

३) उपलब्ध धान्याचे समप्रमाणात वाटप व्हावे यासाठी आवश्यक अशी धान्यवाटपाची व्यवस्था करणे, आणि

४) टंचाईच्या काळात उपयोगी पडावा म्हणून जादा धान्यसाठा उभारणे.'

समितीने जे एक सुसंबद्ध अन्न धोरण म्हणून सुचविले आहे त्यात ही चार साधने समाविष्ट आहेत.

१९४३ पासून १९४७ पर्यंत, किंबहुना मध्यंतरीचा थोडासा व्यत्यय व खंड सोडला तर १९५२ पर्यंत जे धोरण अमलात होते तेच धोरण आज नव्या नावाने मांडण्यात आले आहे, हे लक्षात येईल. धान्यवाटपासंबंधीची जबाबदारी पार पाडण्याकरिता आवश्यक तेवढे धान्य सरकार वसूल न करू शकल्यामुळे हे धोरण त्यावेळी अयशस्वी ठरले. अन्नधान्याचा खुला बाजार व खुले बाजारभाव चालू राहिल्यामुळेच हे अपयश आले, असे अन्नधान्य वसुली समितीने (१९५०) बजावून सांगितले, आणि म्हणून खुला बाजार पूर्णपणे बंद करावा, असे तिने आवाहन केले. अन्नधान्य धोरण समितीला (१९६६) पूर्वीच्या अपयशाचे हे निदान मान्य नसावे, असे दिसते, कारण तिने धान्यवसुली व धान्यवाटप यांचा पुरस्कार केला खरा, परंतु अन्नधान्य वसुली समितीने (१९५०) सुचविल्याप्रमाणे वसुली व वाटप ही सार्वत्रिक व सर्वकष असावयास हवीत हे मात्र मान्य केले नाही. तिला अभिप्रेत असलेली धान्यवसुली ही केवळ आंशिक आहे. अशा धान्यवसुलीबरोबरच अन्नधान्यांचा

खुला व्यापार आणि खुले बाजारभाव चालू असणे तिला अनिष्ट वाटत नाही, किंबहुना ती त्यांना मान्यताच देते. म्हणून साहजिक असा प्रश्न उपस्थित होतो की खुल्या बाजाराच्या अस्तित्वामुळे पूर्वी ज्या अडचणी निर्माण झाल्या त्याच आज पुन्हा निर्माण होणार नाहीत आणि धान्य वाटपासाठी लागणारे धान्य सरकार वसूल करू शकेल याचा काय भरवसा? हा मुद्दा महत्त्वाचा आहे. कारण धान्य आयातीच्या बाबतचे परावलंबित्व नष्ट करावयाचे तर आपण कटाक्षाने हे पाहिले पाहिजे की धान्य वाटपासाठी लागणारे सर्व धान्य सरकार वसूल करू शकेल, किंवा धान्य वसुलीतून जमा होऊ शकेल त्यापेक्षा अधिक धान्याच्या वाटपाची जबाबदारी निर्माण होणार नाही.

पूर्वी सांगितल्याप्रमाणे अन्नधान्य धोरण समिती (१९४७) व अन्नधान्य वसुली समिती (१९५०) या दोन्ही समित्यांनी धान्यवसुली व धान्यवाटप यांच्या जोडीने धान्याचा मुख्य बाजार चालू ठेवला तर काय अनिष्ट परिणाम होतील ते बजावून सांगितले होते. तरी देखील अन्नधान्य धोरण समितीने (१९६६) या बाबीकडे दुर्लक्ष केलेले दिसते. राष्ट्रीय धान्य धोरणात सरकारी वसुली व वाटप आणि खुला बाजार यांचे कार्यभाग काय असावेत यासंबंधी समितीने जो दृष्टिकोन मांडला आहे तो 'निव्वळ व्यावहारिक असून घाऊक व्यापाराचे राष्ट्रीयीकरण करावे इत्यादी तात्विक किंवा राजकीय उद्दिष्टांवर आधारित नाही' हा दृष्टिकोन थोडक्यात असा आहे, 'आम्ही असे समजतो की खाजगी व्यापार केवळ स्वतंत्रपणेच नव्हे तर पुष्कळ वेळा राज्यसरकारांमार्फत दलाल म्हणूनसुद्धा राज्यांतर्गत धान्य व्यवहारात यापुढे महत्त्वाची भूमिका बजावीत राहील. अर्थात् जी गोष्ट राज्यांतर्गत धान्य व्यवहाराला लागू आहे ती राज्या राज्यातील व्यवहारांना मात्र लागू होऊ शकणार नाही. कारण आज ज्याप्रमाणे प्रत्येक राज्य विधिनिर्माण व प्रशासन याबाबत स्वतंत्र घटक म्हणून अस्तित्वात आहे, त्याचप्रमाणे ते राष्ट्रीय अन्नव्यवस्थेतही एक स्वतंत्र घटक म्हणून राहाणे युक्त होईल असे आम्ही मानतो. त्यामुळे राज्यांतर्गत अन्नधान्य व्यवहारात सरकारी अन्नव्यवस्था आणि खासगी व्यापार ही दोन्ही एकत्र नांदू शकतात, परंतु राज्यां-राज्यातील अन्नधान्य व्यवहारात मात्र हे शक्य होत नाही.' हा निव्वळ व्यवहारवाद आहे हे उघड आहे. विद्यमान परिस्थितीतील दोन वस्तुस्थिती आहेत तशा पत्करणे एवढाच त्याचा अर्थ आहे. पहिली वस्तुस्थिती अशी की अन्नधान्य प्रश्नासंबंधी गेली वीस वर्षे जी चर्चा, जो विचारविनिमय झाला त्यावरून अन्नधान्यांचा खासगी व्यापार पूर्णपणे बंद करणे हे राजकीयदृष्ट्या शक्य कोटीतील नाही हे स्पष्ट

झाले आहे. त्यामुळे अन्नधान्य व्यवहारात यापुढेही खासगी व्यापाराला महत्त्वाचे स्थान देणे हे व्यावहारिकदृष्ट्या शहाणपणाचेच आहे. दुसरी वस्तुस्थिती अशी की, विधिनिर्माण आणि प्रशासन याबाबत स्वतंत्र घटक असलेली राज्ये राज्या-राज्यांमधील अन्नधान्यांच्या व इतर जीवनोपयोगी वस्तूंच्या वाहतुकीवर बंधने घालू शकतात. हे अलीकडील अनुभवावरून सिद्ध झाले आहे. आपल्या शिलकीच्या व तुटीच्या शेजारी राज्यांमध्ये अन्न धान्यांची खुली व अनिर्बंध वाहतूक चालू राहावी, या हेतूने जे धान्यविभाग पाडण्यात आले होते त्यांच्या बाबतीतील अनुभवासंबंधी आपले विचार व्यक्त करितांना समिती म्हणते, 'परंतु अनुभव असा की धान्य विभागातील राज्ये केवळ सुखाचे सोबती असतात. दुष्काळ किंवा तुटवडा भासताच हे धान्य विभाग औपचारिक किंवा अनौपचारिकरीत्या फुटू लागतात. मग प्रत्येक राज्य हा धान्यव्यवस्थेत एक स्वतंत्र धान्य विभागच असतो. असे झाले म्हणजे नित्याच्या तुटीच्या राज्यांना आवश्यक धान्य पुरविण्याची काहीच व्यवस्था शिल्लक राहत नाही.' म्हणून समितीचा व्यावहारिक सल्ला असा की प्रत्येक राज्य हा स्वतंत्र धान्य विभाग समजावा, आणि राज्या-राज्यांतील धान्यव्यवहाराबाबत राज्यसरकारांना एकाधिकार असावा. अशा व्यवस्थेत शिलकीच्या राज्याकडून तुटीच्या राज्यांना दरसाल निश्चित प्रमाणात धान्य उपलब्ध करून देण्यासाठी काहीतरी करणे आवश्यक आहे. याच उद्देशाने समितीने दरसाल राष्ट्रीय अन्न संकल्प तयार करून त्याची चोख अंमलबजावणी करावी असे सुचविले आहे.

अलीकडे राज्यसरकारांनी राज्याराज्यातील धान्य व इतर जीवनोपयोगी वस्तू यांच्या ने-आणीला प्रतिबंध करण्याची जी प्रवृत्ती व क्षमता दाखविली आहे ती सद्यःस्थितीत एक नवीन व गंभीर घटना आहे. त्यामुळे निरनिराळ्या राज्यांमध्ये उपलब्ध अन्नधान्यांचे योग्य वाटप कसे होऊ शकेल हा आज एक चिंतेचा विषय झालेला आहे. ही गोष्ट राष्ट्रीय अन्नसंकल्पाच्या द्वारे साध्य होऊ शकेल अशी आशा अन्नधान्य धोरण समितीला (१९६६) वाटते. सबब, हा राष्ट्रीय अन्नसंकल्प कितपत यशस्वी होईल याचा विचार करणे अगत्याचे आहे. शिवाय धान्य आयातीबाबतचे आपले परावलंबन नष्ट व्हावयाचे असेल तर राष्ट्रीय अन्न संकल्पात तुटीच्या राज्यांची तूट शिलकी राज्यांच्या शिलकीतून भरून निघाली पाहिजे. राष्ट्रीय अन्न संकल्पात हा समतोल साधता आला नाही तर केंद्रीय सरकारला पूर्ववत् अन्न सहाय्यासाठी परदेशांकडे याचना करावी लागेल. आणि अशी याचना करण्याकरिता केंद्रसरकारला भाग पाडणे एवढेच राष्ट्रीय अन्नसंकल्पाचे इतिकर्तव्य ठरेल.

अन्नधान्यांच्या व इतर जीवनोपयोगी राज्यसरकारच्या वस्तूंच्या राज्याराज्यांतील ने-आणीला प्रतिबंध करण्याचा राज्यसरकारांचा अधिकार प्रस्थापित झाला तर त्याचे अनेक दूरगामी परिणाम होतील. यातून राष्ट्रीय एकात्मतेला जो संभाव्य धोका आहे त्याच्याकडे आपण क्षणभर दुर्लक्ष केले तरी देशातील शेतमालाच्या एकूण बाजार- व्यवहारावर त्याचे काय परिणाम होतील हे काळजीपूर्वक पाहिले पाहिजे. आपली अन्नसमस्या निदान पाच किंवा दहा वर्षे संपणार नाही, असे जे समितीला वाटते ते रास्तच आहे. इतक्या दीर्घकालपर्यंत अन्नधान्यांच्या व इतर जीवनोपयोगी वस्तूंच्या राज्याराज्यांतील ने-आणीवर प्रतिबंध चालू राहिले तर त्याचे अनेक अनिष्ट परिणाम शेतमालाच्या बाजारावर आणि अंती शेतमालाच्या उत्पादनावर झाल्याखेरीज राहाणार नाहीत.

अन्नधान्य धोरण समितीने (१९६६) सुचविलेल्या अन्नधोरणाचे आणखीही काही दूरगामी परिणाम संभवनीय आहेत. त्यांचाही विचार करणे आवश्यक आहे. समितीने सुचविलेल्या अन्नधोरणात एक अंतर्भूत मूल्यधोरण आहे. उपलब्ध अन्नधान्यांचे न्याय्य वाटप आणि अन्नधान्यांच्या योग्य किमती ही आपल्या अन्नधोरणाची दोन मूलभूत उद्दिष्टे असली पाहिजेत या गोष्टीवर समितीने भर दिला आहे. एका अर्थाने ही दोन्ही उद्दिष्टे स्वयंसिद्ध आणि सर्वमान्य आहेत. अन्नाचा उपलब्ध पुरवठा एकूण गरजेच्या मानाने कमी असल्यामुळे त्याचे न्याय्य वाटप झाले पाहिजे. याचे एक प्रमुख साधन म्हणजे वाजवी किमती हे होय. वाजवी किमती याचा अर्थ गरीब वर्गालाही त्याच्या वाट्याचे अन्नधान्य बाजारात किंमत देऊन विकत घेता आले पाहिजे. अन्नधान्यांच्या किमती गरीब वर्गाला परवडण्यासारख्या नसल्या तर त्याकरिता पुरेसे द्रव्यसहाय्य किंवा किमतीत सूट देऊन गरीब वर्गाला त्याच्या वाट्याचे धान्य उपलब्ध करून देणे अशक्य नाही. परंतु अशा प्रकारचे द्रव्यसहाय्य किंवा किंमतीत सूट देणे देशाला आर्थिकदृष्ट्या शक्य नाही, या मुद्यावर ही सूचना ग्राह्य झालेली नाही. सबब ज्या किंमतीला गरीब वर्गांना आवश्यक ते धान्य बाजारभावाने विकत घेता येईल अशी वाजवी किंमत टिकवून धरणे हाच योग्य वाटप करण्याचा मुख्य मार्ग उरतो. अन्नधान्यांच्या किंमती एका स्थिर पातळीवर का धरून ठेवल्या पाहिजेत, याचे आणखी एक कारण आहे. अन्नधान्य धोरण समितीने (१९६६) निर्देशिल्याप्रमाणे ही काही एखाद-दुसऱ्या वाईट मोसमातून उद्भवलेली समस्या नाही. ती एक जुनाट व देशाच्या अर्थव्यवहारात ठाण मांडून बसलेली समस्या आहे, आणि ती यापुढे अनेक वर्षे, निदान पाच किंवा कदाचित् दहा वर्षेही आपल्याला भेडासावीत राहाणार

आहे. समिती म्हणते, 'अन्नधान्यातील या तुटीमुळे अन्नधान्यांच्या किंमती स्वभावतः सतत वाढत राहाणार, हे उघड आहे. परंतु अन्नधान्यांची मागणी त्यांच्या किंमतीतील चढउतारानुसार फार कमीअधिक होऊ शकत नसल्याने अगदी थोडा तुटवडा पडला तरी अन्नधान्यांच्या किंमतीत खूप मोठी वाढ होऊ शकते. ही वाढ प्रमाणाबाहेर गेली म्हणजे मजुरांचे वेतन वाढविणे भाग पडते. ते वाढविले की उत्पादखर्च वाढतात. त्याबरोबर इतर मालांच्या किंमती वाढू लागतात आणि एक वाढते दुष्टचक्र सुरू होऊन अनवस्था प्रसंग ओढवतो. म्हणून अन्नधान्यांतील तुटीमुळे त्याच्या किंमती प्रमाणाबाहेर वाढणार नाहीत याची काळजी घेणे हे अन्नधोरणाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.' अशा प्रकारे उपलब्ध अन्नधान्यांचे न्याय्य वाटप आणि अन्नधान्यांच्या वाजवी किंमती ही अन्नधोरणाची दोन मूलभूत उद्दिष्टे ठरतात.

ही दोन्ही उद्दिष्टे अर्थातच तात्कालिक आहेत. अन्नधान्य धोरण समिती (१९६६) म्हणते, 'व्यापक दृष्टीने बघावयाचे तर अन्नधोरणाने अन्नवाटप व अन्नधान्य किंमती यांच्याप्रमाणेच अन्नधान्य उत्पादनाकडेही लक्ष पुरविणे आवश्यक आहे. ---- केवळ न्याय्य वाटप आणि वाजवी किमती या तात्कालिक उद्दिष्टांकडे लक्ष देऊन अन्नधोरणाने उत्पादनवाढीच्या दीर्घकालीन उद्दिष्टाकडे दुर्लक्ष करता कामा नये.' ही भूमिका योग्यच आहे. कारण उत्पादनातील तूट हेच या समस्येचे मूळ आहे. उत्पादन वाढवून ही तूट भरून काढली नाही तर ही समस्या कधीच संपणार नाही.

अन्नधोरणाच्या तात्कालिक आणि दीर्घकालीन उद्दिष्टांचा समन्वय कसा साधावयाचा हा प्रश्न महत्त्वाचा आहे. 'तात्कालिक उद्दिष्टांच्या मागे लागून उत्पादनवाढीच्या दीर्घकालीन उद्दिष्टाकडे दुर्लक्ष होता कामा नये' हे विधान म्हणजे या प्रश्नाच्या वास्तविक स्वरूपाकडे डोळेझाक करणे होय. हा केवळ दीर्घकालीन उद्दिष्टांकडे दुर्लक्ष न करण्याचा प्रश्न नसून तो मूलतः तात्कालिक व दीर्घकालीन उद्दिष्टांमधील संघर्ष टाळून त्यांत समन्वय साधण्याचा प्रयत्न आहे. या दोन उदिष्टांमधील विरोधाची कारणे स्पष्ट आहेत. गरीब वर्गालाही पोटापुरते अन्न विकत घेता येईल अशा किमती ग्राहकांच्या दृष्टीने वाजवी असल्या तरी सद्यः परिस्थितीत उत्पादकांच्या दृष्टीने त्या वाजवी ठरत नाहीत. अन्नधोरणाच्या तात्कालिक व दीर्घकालीन उद्दिष्टांमधील संघर्षाचे हे बीज आहे. ते ओळखून उत्पादनवाढीचे दीर्घकालीन उद्दिष्ट साध्य करावयाचे असेल तर हा संघर्ष टाळला पाहिजे.

गेली वीस वर्षे अन्नधान्याच्या प्रश्नासंबंधी पुष्कळ चर्चा झाली, परंतु त्यातून प्रस्तुत संघर्षाचे स्वरूप अजूनही स्पष्ट झालेले दिसत नाही. हा संघर्ष अवास्तव

समजून उत्पादक आणि उत्पादनवाढीचे दीर्घकालीन उद्दिष्ट यांच्याकडे दुर्लक्ष करण्याकडेच एकूण प्रवृत्ती आहे. उदाहरणार्थ असे म्हटले जाते की अन्नधान्यांची किंमत ग्राहकाच्या दृष्टीने वाजवी व उत्पादकाच्या दृष्टीने पुरेशी असावी. प्रत्यक्ष व्यवहारात, विशेषकरून अंमलबजावणीच्या दृष्टीने 'पुरेशी' किंमत म्हणजे काय, हे ठरविणे अवघड असल्याचे आढळून आले आहे. परिणामतः, किमतीचा विचार करितांना ग्राहकाच्या दृष्टिनेच विचार होत राहातो. याबाबत गोंधळ निर्माण करण्याचा आणखी एक प्रयत्न म्हणजे उत्पादनाच्या दृष्टीने 'हमी असलेल्या किमान आधार-किमती'चे महत्त्व प्रतिपादणे. ही बाब महत्त्वाची असली तरी सार्वत्रिक तुटवड्याच्या व वाढत्या किंमतीच्या आजच्या परिस्थितीत ती गैरलागू आहे. शेवटी असेही सांगितले जाते की, 'उत्पादनवाढ मुख्यतः उत्पादनसाधनांची उपलब्धता आणि त्यांचा दक्षतापूर्वक वापर यावरच अवलंबून असते. उत्पादनसाधनांचाच तुटवडा असला तर किमान आधार किमती उत्पादनवाढ करू शकणार नाहीत.' तात्पर्य, उत्पादनवाढीच्या दृष्टीने धान्यांच्या किमतीचे फारसे महत्त्व नाही. ही सर्व विधाने म्हणजे अन्नधोरणाच्या तात्कालिक व दीर्घकालीन उद्दिष्टांमधील मूलभूत संघर्षाचे अस्तित्व नाकारण्याचे किंवा त्याचे महत्त्व कमी लावण्याचे अप्रमाणिक प्रयत्न आहेत. अन्नधोरण हे ग्राहकाभिमुख असणे हेच सद्यःस्थितीत राजकीयदृष्ट्या आवश्यक आहे, असे वाटत असल्यास तसे स्पष्टपणे म्हणणे हेच अधिक प्रामाणिकपणाचे होईल.

अन्नधान्यांच्या उत्पादकांच्या दृष्टीने आज हा प्रश्न गंभीर स्वरूपाचा आहे, कारण इतर सर्व वस्तूंच्या किमती स्थिर आहेत असे नाही, त्याही वाढत आहेत. सर्वसामान्य भाववाढीची परिस्थिती आज अर्थव्यवस्थेत निर्माण झालेली आहे हे सर्वमान्य आहे. अन्नधान्य चौकशी समितीनेही (१९५७) ही गोष्ट मान्य करून असे म्हटले होते की, 'चलनविषयक, करविषयक तसेच सर्वंकष आर्थिक धोरणानेच भाववाढीला आळा घालणे शक्य आहे.' आज दहा वर्षानंतर अन्नधान्य धोरण समितीने (१९६६) हेच मत पुढील शब्दांत व्यक्त केले आहे :- 'आज विशेष ध्यानात घेण्याची गोष्ट म्हणजे चलनवाढ. गेल्या तीन वर्षात किमती झपाट्याने वाढत आहेत. ही प्रवृत्ती अत्यंत चिंताजनक आहे. या चलनवाढीला परिणामकारकपणे आळा घातला नाही तर त्याचे गंभीर परिणाम होतील, अशा परिस्थितीत सध्याचे अन्नधोरण आखण्यात येत आहे. चलनवाढीला आळा घालणे हे चलनविषयक व करविषयक योग्य धोरणामुळेच शक्य होतील ----- म्हणून आम्ही असे गृहीत धरतो की यापुढील काळात सर्वसामान्य किमती वाजवी प्रमाणात स्थिर राहाण्यास ज्यायोगे मदत होईल अशीच आपली चलनविषयक व करविषयक धोरणे राहातील.'

असे असूनही अन्नधान्यांच्या किमतीकडे विशेष व निराळे लक्ष देणे आवश्यक आहे, असे मानले जाते, कारण एक तर अन्नधान्यांच्या किमती ठरविण्याऱ्या मागणी-पुरवठ्याच्या प्रेरकशक्तीचे स्वरूप काहीसे निराळे आहे, आणि दुसरे म्हणजे अन्नधान्यांच्या किमतीत एकदा वाढ सुरू झाली की त्यामागोमाग इतर साऱ्याच वस्तूंची भाववाढ सुरू होते. अन्नधान्यांच्या वाढत्या किमती याच एकूण भाववाढीस कारणीभूत आहेत हा एक प्रस्थापित सिद्धांत मानला गेला आहे. गेल्या वीस वर्षांतील अनुभव या दृष्टीने तपासून बघण्याची मात्र कोणास गरजही भासली नाही. त्यामुळे अन्नधान्यांच्या भाववाढीला आळा घालणे हेच अन्नधोरणाचे मूलभूत आणि प्रमुख उद्दिष्ट असावयास हवे, अशी सर्वसामान्य समजूत आहे. अर्थात् अर्थव्यवस्थेतील इतर बाबींकडेही लक्ष द्यावयास हवे असे वारंवार सांगितले जाते. अन्नधान्यधोरण समिती (१९६६) या बाबतीत म्हणते :- 'अन्नधोरणाला योग्य चलनविषयक आणि करविषयक धोरणांची जोड मिळाली तरच अन्नधोरणाचे उद्दिष्ट साध्य होऊ शकेल, हे आवर्जून सांगितले पाहिजे. ही धोरणे न अवलंबिता केवळ अन्नधान्यांच्याच किमती खालच्या पातळीवर ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला तर दोन गोष्टी घडतील व त्या दोन्हीही धान्योत्पादनाला मारक ठरतील. पहिली अशी की शेतकरी अन्नधान्यांऐवजी दुसरी पिके काढू लागतील, आणि दुसरी अशी की शेतीमध्ये पैसा गुंतविणे कोणासही परवडणार नाही.' आजपावेतो हेच घडत आले आहे, आणि चालू चलनवाढ व भाववाढ यांस अन्नधान्यांच्या किमतीच जबाबदार आहेत असे आपण यापुढेही समजून चाललो तर ते तसेच घडत राहील. म्हणून अन्नधोरणाशी संबद्ध असलेल्या किमतीविषयक धोरणाचा अन्नधान्य उत्पादनाच्या हिताच्या दृष्टीने दीर्घकालीन दृष्टिकोनातून पुनर्विचार झाला पाहिजे.

# पुरवणी

## आपली अन्नसमस्या

### व्याख्यान : दुसरे

अन्नधान्य धोरण समितीने (१९६६) सुचविलेल्या अन्नधोरणाशी संबद्ध असलेल्या तीन महत्त्वाच्या समस्यांची रूपरेषा काल मी आपणांसमोर मांडली, त्या समस्या अशा :

१) समितीस अभिप्रेत असलेल्या धान्यवाटपाच्या गरजा समितीने सुचविलेल्या धान्यवसुलीतून भागू शकतील काय?

२) राष्ट्रीय अन्नसंकल्पात तुटीच्या राज्यांतील तूट आणि शिलकी राज्यातील शिल्लक यांचा समतोल साधेल काय?

३) समितीने सुचविलेल्या अन्नधोरणास आधारभूत असलेल्या किमतीविषयक धोरणाचे दीर्घकालीन परिणाम काय होतील?

या तीन प्रश्नांचा आता आपण क्रमशः विचार करू.

**धान्यवाटप व धान्यवसुली** : प्रथम धान्यवाटपास आवश्यक एवढे धान्य धान्य वसुलीतून गोळा करणे शक्य आहे किंवा नाही, याचा विचार करू. समितीने सुचविलेल्या धान्यवाटपात १० लाख किंवा त्याहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहरात, तसेच औद्योगिक कामगारांची विशेष संख्या असलेल्या काही लहान शहरी भागात शिधावाटप करण्याची योजना आहे. अशा शहरांची आणि शहरी भागांची लोकसंख्या सुमारे २ कोटी आहे, आणि तेथे कायदेशीर शिधावाटप करावयाचे तर दरसाल सुमारे २० लाख टन धान्य लागेल, असा अंदाज आहे. एक लाखाहून अधिक लोकसंख्या असलेल्या सर्व शहरांत कायदेशीर शिधावाटप सुरू केले तर आपली २० लाख टन धान्य लागेल आणखी. ही जादा जबाबदारी कदाचित् पार पाडणे अवघड होईल, म्हणूनच मुख्यतः या शहरांतून शिधावाटप सुरू करण्याची शिफारस समिती करीत नाही. समितीची अशी सूचना आहे की अशा सर्व शहरात, तसेच इतर सर्व नागरी व ग्रामीण विभागांत, विशेषतः तुटीच्या जिल्ह्यांमध्ये स्वस्त धान्य दुकानांच्याद्वारे धान्यवाटपाची सोय करावी.

मी पूर्वी सांगितल्याप्रमाणे आजही देशात सरकारने अनेक स्वस्त धान्य दुकाने प्रस्थापित केलेली आहेत. गेल्या तीन-चार वर्षांत त्यांची संख्या कशी वाढत गेली आणि आज त्यांचा व्याप केवढा आहे हे बघणे उपयुक्त ठरेल. या दुकानातून अन्नधान्यांचे झालेले वाटप १९६२ साली ४१ लाख टन, १९६३ साली ४८ लाख टन, १९६४ साली ८४ लाख टन आणि १९६५ साली ९८ लाख टन होते. १९६६ साली झालेले धान्यवाटप १ कोटी २० लाख टनाच्या जवळपास असावे. अन्नधान्य धोरण समितीने (१९६६) सुचविल्याप्रमाणे ही यंत्रणा आणखी वाढविली तर धान्यवाटपाचे प्रमाण दीड कोटी टनांपर्यंत जाऊन पोहोचेल, असे वाटते.

अशा धान्यवाटपाबाबत सरकारच्या जबाबदारीचे स्वरूप काय ते आता आपण पाहू. शिधावाटपाची जबाबदारी कायदेशीर असल्यामुळे त्यास लागणाऱ्या ३० लाख टन धान्याबाबतची जबाबदारी निश्चित व अटळ आहे. शिवाय केरळ राज्यात चालू असलेले अनौपचारिक शिधावाटप जवळजवळ कायदेशीर शिधावाटपासारखेच असल्यामुळे त्याबाबतची जबाबदारीही अटळ आहे. त्याकरिता सुमारे १५ लाख टन धान्याची गरज आहे. तात्पर्य, धान्यवाटपाबाबत एकूण ४५ लाख टन धान्याची जबाबदारी ही निश्चित व अटळ आहे. त्यामुळे एवढे धान्य येनकेनप्रकारेण वसूल झालेच पाहिजे.

स्वस्त धान्य दुकानातून होणाऱ्या धान्यवाटपाबाबतच्या जबाबदारीचे स्वरूप काहीसे वेगळे आहे. स्वस्त धान्य दुकानांच्या बरोबरीने खुला बाजार चालू असल्याने स्वस्त धान्य दुकानातून होणारे वाटप निश्चित नसते. स्वस्त धान्य दुकानातील किमती आणि खुल्या बाजारातील किमती यांमधील फरकावर स्वस्त धान्य दुकानातून होणाऱ्या वाटपाचे प्रमाण अवलंबून राहाते. हा फरक ज्या मानाने मोठा असेल त्यामानाने स्वस्त धान्य दुकानातून धान्याचे वाटप अधिक प्रमाणात होते. स्वस्त धान्य दुकानासंबंधीच्या अभ्यासपटाच्या (१९६६) अहवालात या मुद्याचे सविस्तर विवेचन आलेले आहे. ते मी उद्धृत करतो :-

स्वस्त धान्य दुकानातून होणाऱ्या अन्नधान्यवाटपाचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे :- स्वस्त धान्य दुकानात काही धान्ये विवक्षित आणि सामान्यतः ठराविक दराने व दरडोई ठरलेल्या प्रमाणात मिळू शकतात. ---- परंतु स्वस्त धान्य दुकानात उपलब्ध असलेल्या धान्यांचे भाव त्याच प्रकारच्या धान्यांच्या खुल्या बाजारातील भावांपर्यंत बरेच कमी असले तरीही सर्वच माणसे स्वस्त धान्य दुकानातील धान्ये विकत घेत नाहीत. एक तर काही लोकांना स्वस्त धान्य दुकानात मिळणाऱ्या

धान्यांचा दर्जा पसंत पडत नाही. खुल्या बाजारात मिळणारी धान्ये थोडी महाग पडली तरी दर्जाच्या दृष्टीने ते तीच पसंत करतात. शिवाय स्वस्त धान्य दुकानांतून धान्य घ्यावयाचे तर काही सोयी-गैरसोयी असतात. त्या सर्वच लोकांना मानवत नाहीत. या कारणांमुळे स्वस्त धान्य दुकाने असली आणि खुल्या बाजारापेक्षा तेथे कमी भावाने धान्य मिळत असले तरीसुद्धा कित्येक लोक अंशतः किंवा पूर्णतः खुल्या बाजारातून धान्य घेणेच पसंत करतात. स्वस्त धान्य दुकानातील भाव आणि खुल्या बाजारातील भाव यांमधील फरक जसा कमी-अधिक होईल त्याप्रमाणे खुल्या बाजारात जाणारा हा वर्ग कमी-अधिक होतो. अशा प्रकारे स्वस्त धान्य दुकानातून होणाऱ्या धान्यवाटपाचे प्रमाण या दुकानांतील भाव व खुल्या बाजारातील भाव यांतील फरकावर अवलंबून राहाते. या दोन भावांमध्ये अमुक फरक असला तर स्वस्त धान्य दुकानांतून अमुक प्रमाणात धान्यवाटप होईल असे म्हणता येते. खुल्या बाजारातील किंवा स्वस्त धान्य दुकानातील भावांत बदल होऊन या दोन भावांतील फरक कमी अधिक झाल्याखेरीज स्वस्त धान्य दुकानांतून होणाऱ्या धान्यवाटपाच्या प्रमाणात सहसा बदल होत नाही.

'ज्यावेळी स्वस्त धान्य दुकानातील व मुख्य बाजारातील भावातील फरक वाढतो - जसे खुल्या बाजारातील भाव वाढल्यामुळे - त्यावेळी स्वस्त धान्य दुकानांचा आश्रय घेणारा वर्ग वाढतो, आणि या दुकानांवरील असलेले त्याचे अवलंबनही वाढते. परिणामतः स्वस्त धान्य दुकानातून होणारे धान्यवाटप वाढत जाऊन एका नवीन प्रमाणावर येऊन स्थिर होते. या नवीन परिस्थितीत हे लक्षात घेण्याजोगे आहे की स्वस्त धान्य दुकानातून होणाऱ्या धान्यवाटपाचे प्रमाण पूर्वीपेक्षा वाढलेले असले तरी स्वस्त धान्य दुकानातील भाव आणि खुल्या बाजारातील भाव यांमधील फरकही पूर्वीपेक्षा अधिक असतो. किंबहुना हा फरक अधिक असतो म्हणूनच स्वस्त धान्य दुकानातून जास्त धान्यवाटप होत असते.

'याचप्रमाणे खुल्या बाजारातील भाव उतरल्यामुळे त्या भावांतील आणि स्वस्त धान्य दुकानांच्या भावांतील अंतर जेव्हा कमी होते तेव्हा कित्येक लोक स्वस्त धान्य दुकाने सोडून खुल्या बाजाराकडे वळतात. त्यामुळे या दुकानांतून होणारे धान्यवाटप कमी होऊन ते एका नवीन प्रमाणावर स्थिर होते. या नवीन परिस्थितीत स्वस्त धान्य दुकानांतून होणारे वाटप कमी असले तरी स्वस्त धान्य दुकानांतील आणि खुल्या बाजारातील भावांमधील अंतरही कमी असते. किंबहुना हे अंतर कमी असते म्हणूनच स्वस्त धान्य दुकानातून होणारे धान्यवाटप कमी झालेले असते.'

अशा प्रकारे स्वस्त धान्य दुकानातून होणाऱ्या अन्नवाटपाचे प्रमाण निश्चित नसते. स्वस्त धान्य दुकानांतील व खुल्या बाजारातील भावांमधील फरकावर ते अवलंबून असते, आणि खुल्या बाजारातील भाव जसे खाली-वर होतील तसे ते प्रमाणही खालीवर होते. या धान्यवाटपाबाबत सरकारवर निश्चित कायदेशीर जबाबदारीही नसते. स्वस्त धान्य दुकानांतून लोकांची सर्व मागणी पूर्ण होऊ शकली नाही तर शेजारीच असलेल्या खुल्या बाजाराकडे सरकार बोट दाखवू शकते. कायद्याच्या दृष्टीने हे खरे आहे, म्हणूनच स्वस्त धान्य दुकानांच्या जबाबदाऱ्या कमी बंधनकारक समजल्या जातात आणि कायदेशीर शिधावाटपापेक्षा स्वस्त धान्य दुकानांतून करावयाचे धान्यवाटपच सरकार पसंत करते.

असे असले तरी प्रत्यक्ष व्यवहारात, विशेषतः जेव्हा किंमती चढत असतात आणि स्वस्त धान्य दुकानांवर लोकांची रीघ लागते तेव्हा कायदेशीर शिधावाटप आणि स्वस्त धान्य दुकाने याबाबतच्या जबाबदाऱ्यांमध्ये वास्तविक काही फरक उरत नाही. एकदा स्वस्त धान्य दुकान उघडले की दुकानावर आलेल्या लोकांना रिकामे परत पाठविणे अशक्य असते. किंबहुना 'माल शिल्लक नाही' अशी पाटी स्वस्त धान्य दुकानावर लावणे अनर्थकारक ठरते. तात्पर्य, एकदा स्वस्त धान्य दुकान उघडले की त्यावर येणाऱ्या लोकांची मागणी पुरी करणे क्रमप्राप्त होते. ही मागणी निश्चित नसते आणि खुल्या बाजारातील भावांत होणाऱ्या बदलाप्रमाणे ती कमी-अधिक होते. हे खरे असले तरी ती पुरी करणे अपरिहार्य असते. गेल्या चारपाच वर्षात स्वस्त धान्य दुकानांतून होणारे धान्यवाटप दोनअडीच पटींनी वाढले आहे. ही वाढ कायदेशीरदृष्ट्या अपरिहार्य नव्हती, परंतु एकदा स्वस्त धान्य दुकाने उघडल्यानंतर निर्माण होणाऱ्या व्यावहारिक व नैतिक जबाबदारीच्या पोटी ती अटळ ठरली.

तात्पर्य, कायदेशीर किंवा जवळजवळ कायदेशीर शिधावाटपाच्या निश्चित व अटळ जबाबदाऱ्या, तसेच स्वस्त धान्य दुकानांच्याद्वारे येऊन पडणाऱ्या बदलत्या परंतु तितक्याच अपरिहार्य जबाबदाऱ्या पूर्ण करण्याकरिता लागणारे धान्य धान्यवसुलीतून गोळा होणे आवश्यक आहे. खुल्या बाजारातील धान्यांचे भाव स्वस्त धान्य दुकानातील भावांपेक्षा फार वर नसतील तर स्वस्त धान्य दुकानातून होणारे वाटप अगदी थोडे राहील. कदाचित् ते १० लाख टनांपेक्षांही कमी असेल. उलटपक्षी आजच्याप्रमाणे खुल्या बाजारातील भाव स्वस्त धान्य दुकानांच्या भावांपेक्षा फारच वर असतील तर स्वस्त धान्य दुकानातून होणाऱ्या धान्यवाटपाकरिता १ कोटी टनांपेक्षाही अधिक धान्याची गरज लागेल. यामध्ये कायदेशीर व जवळजवळ कायदेशीर शिधावाटपासाठी

लागणारे धान्य मिळविले तर असे दिसून येईल की धान्यवाटपाची एकूण जबाबदारी ५० लाख टनांपासून दीड कोटी टनांपर्यंत कमी-जास्त होत राहील. ती जी असेल ती धान्यवसुलीने पुरी केली पाहिजे.

आता असा प्रश्न उपस्थित होतो की अन्नधान्य धोरण समितीने (१९६६) सुचविलेली धान्यवसुलीची योजना धान्यवाटपाच्या या साऱ्या गरजा पुऱ्या करू शकेल काय? येथे हे नमूद केले पाहिजे की आपण गेल्या तीनचार वर्षात किंवा २० वर्षांपूर्वीही जेव्हा सार्वत्रिक धान्यवसुलीची पद्धत अमलात होती त्यावेळी कोणत्याही वर्षी आपण ५० लाख टनांहून अधिक धान्य वसूल करू शकलो नाही. म्हणून या प्रश्नाचा अधिक काळजीपूर्वक विचार करावयास हवा. आपण आत्ताच पाहिल्याप्रमाणे धान्यवाटपाच्या एकूण गरजा बव्हंशी खुल्या बाजारातील भावांमधील चढउतारावर अवलंबून असतात. खुल्या बाजारातील भाव स्वस्त धान्य दुकानांतील भावांच्या जवळपासच राहिले तर स्वस्त धान्य दुकानांवरील मागणी पुष्कळच कमी असते. अशा वेळी स्वस्त धान्य दुकानांच्या, तसेच कायदेशीर शिधावाटपाच्या गरजा धान्यवसुलीतून कदाचित् पूर्ण करिता येतील. उलट, खुल्या बाजारातील भाव स्वस्त धान्य दुकानातील भावांपेक्षा खूपच वर राहिले तर धान्यवाटपाच्या गरजा धान्यवसुलीच्या आवाक्याबाहेर जातील. याचा अर्थ असा की धान्यवसुलीतून धान्यवाटपाच्या गरजा भागू शकतील किंवा नाही ही गोष्ट धान्यवसुली व धान्यवाटप यांच्याद्वारे खुल्या बाजारातील किमती खाली आणून त्या स्वस्त धान्य दुकानांतील किमतीच्या जवळपास राखता येतील किंवा नाही यावर अवलंबून आहे.

धान्यवसुली व धान्यवाटप या साधनांनी खुल्या बाजारातील धान्यांचे भाव खाली आणता येतात अशी अनेकांची समजूत आहे. याला पुरावा म्हणून ते या बाबतीतील पूर्वीच्या व अगदी अलीकडील अनुभवाकडे बोट दाखवितात. खुद्द अन्नधान्य धोरण समिती ही (१९६६) गेल्या तीन वर्षातील धान्यधोरण व धान्यपरिस्थिती या संबंधी चर्चा करिताना असे म्हणते की, 'या काळात धान्यवसुली व धान्यवाटप यासंबंधी जी धोरणे अवलंबिली गेली ती जर अवलंबिली नसती तर देशातील बहुसंख्य जनतेला आणि देशाच्या अनेक भागांना धान्यपुरवठा करणे अत्यंत अवघड झाले असते.' त्यानंतर समिती हे मान्य करते की गेल्या तीनचार वर्षात झालेले धान्यवाटप हे बहुतांशी-जवळजवळ ७५ टक्के - धान्यवसुलीतून नव्हे तर आयात धान्यातून झालेले होते. हे जर खरे, तर गेल्या तीनचार वर्षातील धान्यधोरणाचे जे इष्ट परिणाम दिसतात त्यांचे श्रेय धान्यवसुली व धान्यवाटपाच्या धोरणाला न देता

देशामध्ये वसूल न करिताच फार मोठ्या प्रमाणात वाटप झालेल्या धान्यास द्यावयास हवे. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे तर या इष्ट परिणामांचे श्रेय देशात धान्यवसुली न करिता लागेल तेवढे धान्य आयात करून त्याचे वाटप करण्याच्या सरकारी धोरणालाच दिले पाहिजे. दहा वर्षांपूर्वी अन्नधान्य चौकशी समितीने (१९५७) नेमक्या ह्याच धोरणाचा पुरस्कार केला होता. धान्यवसुली करून होणारे धान्यवाटप आणि धान्यवसुली न करिता करिता येणारे धान्यवाटप यातील फरक या समितीला स्पष्टपणे माहीत होता. तिने असे म्हटले होते की, 'अन्न प्रशासनाच्या दृष्टीने धान्यवसुलीपेक्षा धान्यआयात विशेष सोयीची आहे. आयात केलेले सर्व धान्य सरकारच्या हातात येते आणि हे धान्य वाटपासाठी उपलब्ध होते. याउलट देशात वसूल केलेले धान्य हा देशातील उत्पादनाचाच एक अल्पसा भाग असतो.' तात्पर्य, लागेल तेवढे धान्य आयात करून त्याचे वाटप करण्याच्या धोरणानेच परिस्थितीवर ताबडतोब इष्ट ते परिणाम घडवून आणता येतात. १९६४-१९६६ या तीन वर्षात मुख्यतः याच धोरणाची आपण कास धरलेली होती. धान्यवसुली व धान्यवाटप असे या धोरणाचे वर्णन करणे अवास्तव आहे.

हे धोरण असेच जास्त काळ चालू ठेवता येणार नाही असे अन्नधान्य धोरण समितीने (१९६६) आग्रहपूर्वक म्हटले आहे. समिती म्हणते, 'आम्ही असे गृहीत धरले आहे की पुढील चार-पाच वर्षात सालोसाल धान्य आयात कमी-कमी होत जाईल एवढेच नव्हे तर चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस धान्यआयात पूर्णपणे बंद होईल. आपली धान्यआयात ही इतर देश त्यांच्या धोरणानुसार थांबवितील किंवा ती थांबविण्याचे धोरण आपणांस पत्करावे लागेल.' समितीने असाही इशारा दिला आहे की, 'मध्यंतरीच्या काळात जे धान्य आयात होईल ते मुख्यतः धान्यसाठा उभारण्यासाठीच वापरले पाहिजे.'

हे धोरण पत्करावयाचे तर त्याचा गर्भितार्थ समजावून घेतला पाहिजे, आणि निःसंदिग्ध शब्दात स्पष्ट केला पाहिजे. धान्यवाटपाच्या गरजा आता पूर्णपणे धान्यवसुलीतून भागवल्या पाहिजेत आणि हे ताबडतोब सुरू झाले पाहिजे, हा या धोरणाचा स्वच्छ अर्थ आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर धान्यवसुलीतून जेवढे धान्य उपलब्ध होईल तेवढ्याच धान्याचे आपणास यापुढे वाटप करिता येईल. धान्यवाटपाकरिता परदेशी जादा धान्य उपलब्ध होणार नाही. म्हणजे यापुढील अन्नधोरणानुसार केवळ आपल्याच उत्पादनापैकी काही धान्य वसूल करून ते समाजातील काही विशिष्ट वर्गांना व काहीसा कमी किमतीने देणे एवढेच करिता येईल.

मग प्रश्न असा उपस्थित होतो की अशा या धान्यवसुली व धान्यवाटपाच्या धोरणाने, की ज्यात जादा आयात धान्य जमेस धरता येत नाही, खुल्या बाजारातील भाव खाली आणून ते स्वस्त धान्य दुकानातील भावांच्या जवळपास ठेवणे साधू शकेल काय? 'नाही', हेच या प्रश्नाचे स्पष्ट उत्तर आहे. हे एक अर्थशास्त्रीय प्रमेय आहे आणि या-ना-त्या स्वरूपात सर्व तज्ज्ञ समित्यांनी ते मान्य केले आहे. सुमारे वीस वर्षांपूर्वी अन्नधान्य धोरण समिती (१९४७) व अन्नधान्य वसुली समिती (१९५०) या दोन्ही समित्यांनी धान्यवसुली व धान्यवाटपाचे नियंत्रित भाव व खुल्या बाजारातील भाव यांच्यातील पडत जाणाऱ्या तफावतीसंबंधी सविस्तर चर्चा केल्याचे मी पूर्वी सांगितलेच आहे. त्यानंतर सुमारे दहा वर्षांनी अन्नधान्य चौकशी समितीनेही (१९५७) हे प्रमेय मान्य केले आहे. ही समिती म्हणते, 'सरकारी धान्यवसुलीमुळे बाजारभाव वाढू लागतात, आणि वसूल केलेले धान्य विक्रीस काढले तरी एकदा वर गेलेले भाव पूर्वस्थळी येत नाहीत.' अलीकडेच शेतमाल भावविषयक महामंडळाने आपल्या १९६५-६६ सालच्या खरीप धान्यांच्या मूल्य धोरणविषयक अहवालातही सक्तीच्या आंशिक धान्यवसुलीची शिफारस करितांना हे प्रमेय गृहीत धरले आहे. महामंडळ म्हणते, 'सक्तीच्या आंशिक धान्यवसुलीच्या पद्धतीमुळे आपल्या उत्पादनाचा काही भाग बाजारभावापेक्षा कमी भावाने वसूल करून घेतला जात आहे अशी असंतोषाची भावना शेतकऱ्यात निर्माण होईल, यात शंका नाही. परंतु सक्तीच्या धान्यवसुलीचे भाव अवास्तविक नसतील आणि स्वतःजवळील जादा धान्य बाजारभावाने विकण्याची मुभा शेतकऱ्याला असेल तर सक्तीच्या धान्यवसुलीला असणारा त्याचा विरोध पुष्कळ कमी होईल.' थोडक्यात सांगावयाचे तर महामंडळाने असे स्पष्ट सुचविले आहे की सक्तीच्या धान्यवसुलीमुळे शेतकऱ्याला जो तोटा होईल तो त्याने उरलेले जादा धान्य खुल्या बाजारात वरचढ भावाने विकून भरून काढावा. अगदी अलीकडील धान्य धोरण समितीने (१९६६) तर अशी शिफारस केली आहे की, 'सरकारने धान्यवसुलीकरिता निश्चित भाव ठरवून द्यावेत, परंतु खुल्या बाजारातील भावावर कमाल मर्यादा घालण्याच्या भानगडीत पडू नये. ---- कारण आजपर्यंतच्या अनुभवावरून हे स्पष्ट झाले आहे की सरकारजवळ भरपूर धान्यसाठा नसेल तर अशा कमाल भावांची अंमलबजावणी करणे त्यास अशक्य होते.' धान्य आयात थांबवावयाची तर हे जादा धान्यसाठे सरकारजवळ कोठून येणार?

अशा प्रकारे नियंत्रित भाव व खुल्या बाजारातील भाव यांतील तफावत ही एक अनुभवसिद्ध गोष्ट झाली आहे. या तफावतीचा अर्थशास्त्रीय प्रमेय म्हणून खुलासा

स्वस्त धान्य दुकानांसंबधीच्या अभ्यासगटाने (१९६६) आपल्या अहवालात केला आहे तो असा ः- 'ज्यावेळी बाहेरून जादा धान्य पुरवठा होऊ शकत नाही त्यावेळी स्वस्त धान्य दुकानातून धान्यवाटप करावयाचे तर त्याचा अर्थ असा होतो की बाजारात अेकूण उपलब्ध असलेल्या धान्यापैकी काही धान्य हस्तगत करवून ते खुल्या बाजारात चालू असलेल्या भावापेक्षा कमी दराने विकावयाचे. या उलाढालीने धान्याच्या एकूण पुरवठ्यात भर पडत नाही किंवा पडू शकत नाही, हे उघड आहे. याउलट, काही माल कमी दराने विक्रीस निघाल्यामुळे मागणी मात्र वाढते. आता या सर्वांचा उर्वरित खुल्या बाजारावर काय परिणाम होतो ते पाहू. ---- स्वस्त भावाने धान्यवाटप केल्याने बाजारातील एकूण धान्य पुरवठ्यात काही वाढ होत नाही, ही गोष्ट एकदा समजावून घेतली म्हणजे हे स्पष्ट होते की, स्वस्त धान्य दुकानांबरोबर चालू असलेल्या उर्वरित खुल्या बाजारातील भाव हे स्वस्त धान्य दुकाने नसती तर एकूण खुल्या बाजारात जे भाव राहिले असते त्यांच्यापेक्षा वर राहातात. मागणी-पुरवठाविषयक अर्थशास्त्रीय सिद्धांत लक्षात घेतले म्हणजे हे ओघानेच येते. एवढेच नव्हे तर स्वस्त धान्य दुकानांतील भाव ज्या मानाने खाली ठेवावे त्यामानाने अुर्वरित खुल्या बाजारातील भाव वर राहातातच, असेही आकडेवारीने दाखविणे शक्य आहे.'

हे विश्लेषण मान्य केले तर धान्यवाटपाच्या गरजा धान्यवसुलीतून भागू शकतील ही कल्पना मुळातच सोडून निघते. मी वर सांगितल्याप्रमाणे अन्नधान्य धोरण समितीला (१९६६) अभिप्रेत असलेल्या धान्यवाटपाकरिता ५० लाख टनांपासून दीड कोटी टनांपर्यंत केवढेही धान्य लागू शकेल. स्वस्त धान्य दुकानांतील भावांपेक्षा खुल्या बाजारातील भाव किती वर राहातील यावर ही गरज अवलंबून राहील. खुले बाजारभाव जितके वर राहातील तितक्या प्रमाणात धान्यवाटपाकरिता अधिक धान्याची गरज लागेल. याउलट, धान्यवसुलीकरिता कोणतीही पद्धत स्वीकारली तरी मुख्य बाजारातील भाव नियंत्रित भावांच्या मानाने जितके वर असतील त्याप्रमाणात नियंत्रित भावांत ठरलेली धान्यवसुली करणे अवघड होते. याचा अर्थ असा की स्वस्त धान्य दुकानांतील भावांपेक्षा मुख्य बाजारातील भाव फार वर असतील तर एकीकडे धान्यवाटपाच्या गरजा वाढतात आणि दुसरीकडे धान्यवसुली अवघड होऊन बसते. उलट ज्यावेळी खुल्या बाजारातील भाव स्वस्त धान्य दुकानांतील भावांच्या जवळपास राहातात त्यावेळी धान्यवाटपाची गरज कमी होते पण धान्यवसुली मात्र अधिक सुलभ होते. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे तर धान्यवसुलीची जेव्हा निकड असते त्याचवेळी ती अवघड बनते. तात्पर्य, स्वस्त धान्य दुकानांतील भाव खुल्या बाजारातील

भावांपेक्षा फार खाली ठेवले तर धान्यवाटपाची गरज धान्यवसुलीतून भागविणे अशक्य होते. शिवाय, अन्नधान्यांच्या उत्पादनात घट झाल्यामुळे म्हणा किंवा अर्थव्यवस्थेत उद्भवलेल्या भाववाढीच्या प्रेरणांमुळे म्हणा, जेव्हा खुल्या बाजारातील अन्नधान्यांचे भाव वाढू शकतात त्यावेळी अन्नवाटपाची गरज वाढते, धान्यवसुली अवघड होते आणि अंती धान्यवसुलीतून धान्यवाटपाची गरज भागविणे आवाक्याबाहेर जाते.

धान्य आयातीवरील आपले परावलंबित्व नष्ट करण्याचा आपला मानस आहे, म्हणून आजपावेतो आणि विशेषतः गेल्या तीन-चार वर्षांत आपल्या अन्नधोरणात धान्यआयातीचे काय स्थान होते ते समजावून घेणे अगत्याचे आहे. मी वर सांगितल्याप्रमाणे आपली धान्यआयात १९६४ साली ६३ लाख टन, १९६५ साली ७५ लाख टन आणि १९६६ साली सुमारे १ कोटी १० लाख टन होती. धान्यवाटपाची सुमारे ३/४ गरज या धान्यआयातीने भागविली होती. धान्यआयातीवरील हे परावलंबित्व आपल्याला संपुष्टात आणावयाचे असेल तर हे आयात धान्य आपणांस उपलब्ध होणार नाही हे उघड आहे. परंतु ही गोष्ट एवढ्यावरच थांबत नाही. आपल्या आजपावेतोच्या अन्नधोरणात आयात धान्याने आणखी एक कामगिरी बजाविली होती. ती अशी की आयात धान्याचा जादा पुरवठा बाजारात सतत होत राहिला म्हणूनच आपण खुल्या बाजारातील धान्यांच्या किमती खाली आणू शकलो किंवा निदान काबूत ठेवू शकलो, आणि हे झाले म्हणूनच झाली तेवढी धान्यवसुली होऊ शकली. आयात धान्याचा हा जादा पुरवठा बंद झाला म्हणजे मी वर विशद केल्याप्रमाणे केवळ धान्यवसुली व धान्यवाटप यांच्याद्वारे खुल्या बाजारातील किमती खाली ठेवणे आपणांस अशक्य होईल, आणि धान्यवसुली करणे गेल्या तीन वर्षांच्या मानाने यापुढे किती तरी अवघड होईल. याचा अर्थ असा की, धान्यआयातीवरील परावलंबित्व संपुष्टात आणावयाचे तर आयात धान्य उपलब्ध होणार नाहीच शिवाय देशातील धान्यवसुलीही पूर्वी अितकी सुलभ राहाणार नाही.

सारांश, धान्यआयातीवरील परावलंबित्व नष्ट करावयाचे असेल तर आपले अन्नधोरण पूर्वीप्रमाणेच चालू ठेवून भागणार नाही. धान्यआयातीच्या अभावी अन्नधोरणास दोन मार्गांपैकी एक स्वीकारावा लागेल. ठराविक भावाने धान्य वसूल करवून त्याचे ठराविक भावाने वाटप करावयाचे असेल, धान्यवाटपाची गरज पूर्णपणे धान्यवसुलीनेच भागवावयाची असेल आणि धान्यवसुली व धान्यवाटपाचा हा खटाटोप उपयुक्त ठरेल एवढ्या प्रमाणात करावयाचा असेल तर त्याकरिता आपल्याला धान्यवसुलीचे अधिकाधिक सक्तीचे मार्ग अवलंबावे लागतील, खाजगी व्यापाराला

पूर्णपणे बंदी घालावी लागेल आणि देशात असलेली अन्नधान्याची तूट सर्वत्र समानपणे वाटली जाईल अशी कडक व जागरूक शिधावाटपपद्धती अंगीकारावी लागेल. हे करावयाचे नसेल किंवा हे करणे अशक्य वाटत असेल तर दुसरा मार्ग म्हणजे आपल्याला आपल्या अन्नधान्यांच्या भावविषयक धोरणाचा पुनश्च विचार करावा लागेल. धान्यवसुली अधिक मोठ्या प्रमाणावर व सुलभ होऊ शकेल असे भाव उत्पादकांना बांधून द्यावे लागतील आणि धान्यवाटपाचे भाव असे ठेवावे लागतील की ज्यायोगे धान्यवाटपाची गरज धान्यवसुलीतून होणाऱ्या पुरवठ्यापेक्षा अधिक असणार नाही. यांपैकी पहिला मार्ग राजकीयदृष्ट्या शक्य कोटीतील नाही, असा आपला गेल्या वीस-पंचवीस वर्षांचा अनुभव आहे. म्हणून दुसऱ्या मार्गांचा विचार करणे अपरिहार्य ठरते.

**राष्ट्रीय अन्नसंकल्प** : अन्नधान्य धोरण समितीने (१९६६) या प्रश्नांकडे द्यावयास हवे तसे लक्ष दिलेले नाही. आपण सुचविलेल्या धोरणानुसार एकूण किती धान्यवाटप करावे लागेल याचा स्पष्ट उल्लेख तिने कोठेही केलेला नाही, किंवा या धान्यवाटपाची गरज धान्यवसुलीने पूर्णपणे भागू शकेल असा भरवंसा तिला कां वाटतो हेही तिने स्पष्ट केलेले नाही. याचे कारण धान्यवाटपासंबंधीचा दुसरा एक अधिक गंभीर व निकडीचा प्रश्न समितीसमोर होता, हे असावे असे दिसते. हा प्रश्न म्हणजे उपलब्ध अन्नधान्यांचे देशातील निरनिराळ्या राज्यांमध्ये समानपणे वाटप कसे करावयाचे हा होय. राज्ये ही विधिनिर्माणाचे व प्रशासनाचे घटक आहेत. एका राज्यातून दुसऱ्या राज्यात होणाऱ्या धान्यवाहतुकीवर ती निर्बंध घालू शकतात हे गेल्या तीन-चार वर्षात सिद्ध झाले आहे. देशाच्या अन्नधान्य परिस्थितीतील ही एक नवीन घटना असून तिची दखल घेणे अर्थातच आवश्यक आहे. प्राप्त परिस्थिती म्हणून समितीची शिफारस अशी की, राज्ये ही अन्नव्यवस्थेतील नैसर्गिक घटक असावीत, आपल्या राज्यातील जनतेला अन्न पुरविण्याची जबाबदारी मुलतः राज्यसरकारांवर असावी आणि म्हणून राज्या-राज्यांत होणाऱ्या धान्यव्यापारात हस्तक्षेप करण्याचा त्यांना अधिकार असावा. अेवढे मान्य केल्यानंतर राज्यांच्या मुख्यमंत्र्यावरच सारी मदार ठेवणे, देशहिताच्या बुद्धीने 'एका समान उद्दिष्टात ते सहभागी होतील' अशी आशा बाळगणे आणि केंद्रसरकार 'अधिकाराने, आग्रहाने अथवा युक्तिवादाने एक राष्ट्रीय अन्नधोरण व्यवहारात आणू शकेल' अशी अपेक्षा करणे एवढेच उरते.

म्हणून या समितीने असे सुचविले आहे की, राज्यांचे मुख्यमंत्री, पंतप्रधान, केंद्रीय अन्नमंत्री व नियोजनमंत्री यांच्या राष्ट्रीय अन्न महामंडळाने दरवर्षी किती धान्य

वसूल करावे व किती वाटप करावे, तसेच कोणी किती वसूल करावे व कोणी किती वाटप करावे, याचा निर्णय घ्यावा. या निर्णयांचा आराखडा म्हणजेच समितीने सुचविलेला राष्ट्रीय अन्नसंकल्प होय. समिती धान्यवसुलीच्या पद्धतीच्या तपशीलात जात नाही. तिच्या मते धान्यवसुलीची पद्धत राज्याराज्यात वेगवेगळी असण्यास हरकत नाही. त्याबाबत दोन अपेक्षा पूर्ण झाल्या म्हणजे झाले :– '१) शिलकी राज्यांच्याबाबतीत राष्ट्रीय अन्नसंकल्पाने निश्चित केलेली धान्यवसुलीची उद्दिष्टे त्या राज्यांनी साध्य करावीत, आणि २) तुटीच्या राज्यांनी त्यांच्याबाबत राष्ट्रीय अन्नसंकल्पाने निश्चित केलेल्या केंद्रीय पुरवठ्यापेक्षा अधिक धान्याची मागणी केंद्राकडे करू नये.'

सारांश, एक राष्ट्रीय अन्नसंकल्प असावा, त्यानुसार शिलकी राज्यांनी आपापल्या राज्यांत नेमून दिलेली धान्यवसुली करण्याची जबाबदारी स्वीकारावी. हे धान्य त्यांनी तुटीच्या राज्यांना उपलब्ध करून द्यावे आणि तुटीच्या राज्यांनी केंद्र सरकारकडे यापेक्षा अधिक धान्य मागू नये. हाच या बाबत विशेष महत्त्वाचा मुद्दा आहे. धान्यआयातीवरील आपले परावलंबित्व नष्ट करावयाचे असेल तर अन्नसंकल्पातून हे घडले पाहिजे, म्हणून राष्ट्रीय अन्नसंकल्प कसा तयार करावा याबाबतची समितीची कल्पना आणि हा संकल्प वर म्हटल्याप्रमाणे समतोल होण्याची कितपत शक्यता आहे यांचा आता विचार करू.

उपलब्ध अन्नधान्याची देशभर समान विभागणी व्हावी या हेतूने शिलकीच्या राज्यातून तुटीच्या राज्यांना शिलकी धान्य मिळवून देणे हा राष्ट्रीय अन्नसंकल्पाचा उद्देश आहे. याकरिता शिलकी राज्यांची शिल्लक आणि तुटीच्या राज्यांची तूट किती आहे हे सालोसाल निश्चित करावे लागेल. शिल्लक किंवा तूट ठरविण्यासाठी आपल्याला दोन गोष्टींची माहिती हवी :– अन्नधान्यांच्या उत्पादनाचा अंदाज आणि धान्यविषयक गरजांचा अंदाज. उत्पादन साहजिकच दरवर्षी निरनिराळे राहील. धान्यविषयक गरजा मात्र दरवर्षी फारशा बदलणार नाहीत. म्हणून निरनिराळ्या राज्यांच्या अन्नविषयक गरजा कशा निश्चित करिता येतील हे आपण प्रथम पाहू. यासाठी समितीचे म्हणणे असे की, न्याय्य किंवा समान वाटप याचा अर्थ प्रत्येक व्यक्तीला मोजून सारखेच अन्न देणे हा नसून लोकांची आर्थिक परिस्थिती आणि आहारविषयक परंपरा लक्षात घेऊन योग्य धान्यवाटप करणे, हा असावयास हवा. या दृष्टीने १९६१–६३ हा काळ आधारभूत मानावा अशी समितीची सूचना आहे. या काळामध्ये आंतरराज्य धान्यवाहतुकीवर बंधने नव्हती. त्यामुळे राज्या–राज्यांमध्ये धान्याचा खुला व्यापार चालू होता. या खुल्या व्यापाराने होणारी अन्नधान्यांची वाहतूक निरनिराळ्या राज्यांतील

आर्थिक क्षमता व त्यांच्या आहारविषयक परंपरा लक्षात घेऊनच होत असली पाहिजे, असे ही समिती गृहीत धरते. म्हणूनच यापुढील अन्नसंकल्पानुसार करावयाच्या धान्यवसुलीकरिता हा काळ आधारभूत किंवा मार्गदर्शक समजावा, असे ती सुचवते. यावर कोणी असा प्रश्न करील की राज्या-राज्यातील धान्यवाहतूक खुल्या व्यापारामार्फतच का करू नये? यावर समितीचे म्हणणे असे की, 'आंतरराज्यीय व्यापारावर काही नियंत्रण न ठेवल्यास शिलकी राज्यातील धान्य दुसऱ्या अधिक गरजू राज्यांत जाण्याऐवजी ज्यांची क्रयशक्ती अधिक आहे अशा ठिकाणांकडे जाईल.' म्हणून आंतरराज्यीय व्यापारावर पूर्ण नियंत्रण ठेवले पाहिजे, असा समितीचा आग्रह आहे. १९६१-६३ हा काळ या पुढील अन्नधोरणाकरिता आधारभूत धरण्याची समितीची सूचना या धोरणाशी उघडच विसंगत आहे.

असो. १९६१-६३ या काळात वेगवेगळ्या राज्यांमध्ये दरमाणशी दर दिवशी किती अन्नधान्य उपलब्ध होते यासंबंधी समितीने काही आकडेवारी दिली आहे. त्यावरून राज्यांच्या धान्यगरजांमध्ये खूपच तफावत असल्याचे आढळून येते. एका टोकाला मध्यप्रदेश व ओरिसा ही राज्ये आहेत. तेथे दर माणशी दरदिवशी धान्याचे प्रमाण १७.६ औंस होते. दुसऱ्या टोकाला गुजरात व केरळ राज्ये आहेत, जेथे हे प्रमाण अनुक्रमे ११.२ औंस व ९.२ औस होते. निरनिराळ्या राज्यातील हे प्रमाण पुढील प्रमाणे आहे : ओरिसा (१७.६), मध्यप्रदेश (१७.६), पंजाब (१६.४), राजस्थान (१५.५), पश्चिम बंगाल (१५.५), महाराष्ट्र (१४.९), मद्रास (१४.०), आंध्रप्रदेश (१३.९), म्हैसूर (१३.८), आसाम (१३.६), उत्तर प्रदेश (१२.३), बिहार (११.९), गुजरात (११.३), केरळ (९.२). निरनिराळ्या राज्यांतील धान्यांच्या या गरजा परंपरागत समजावयाच्या तर त्यांत एवढी तफावत असण्याचे कारण काय, याचा खुलासा करिताना समिती म्हणते, 'राज्य जितके गरीब असेल त्यामानाने तेथील आहारात धान्यांचा अधिक समावेश असतो. त्यामुळे गरीब राज्यांत बहुधा दर माणशी खर्ची पडणाऱ्या धान्याचे प्रमाण जास्त आढळते.' धान्याखेरीज इतर अन्नपदार्थ-उदाहरणार्थ केरळमध्ये टापिओका किंवा बिहारमध्ये डाळी अित्यादी. जमेस धरले तरी अुद्धृत केलेले आकडे समितीने सुचविलेल्या नियमाला फारशी पुष्टी देत नाहीत. परंतु प्रस्तुत विवेचनात हा मुद्दा फारसा महत्त्वाचा नाही. अधिक महत्त्वाचा मुद्दा असा की १९६१-६३ या काळामध्ये निरनिराळ्या राज्यात दरमाणशी दरदिवशी खर्ची पडणाऱ्या धान्यांचे हे आकडे समितीच्या समजुतीप्रमाणे वस्तुस्थितीचे निदर्शक आहेत, तसेच हा काळ वर सांगितलेल्या कारणामुळे या पुढील धान्यवाटपाच्या

दृष्टीने आधारभूत समजावा असे समिती मानते. आणि म्हणून वेगवेगळ्या राज्यांच्या धान्यगरजा निश्चित करिताना वरील आकडे प्रमाणभूत नव्हे तरी मार्गदर्शक मानावेत, अशी समितीची सूचना आहे.

आता प्रत्यक्ष व्यवहार कसा होअील ते पाहू. अशी कल्पना करू की वेगवेगळ्या राज्यांचे मुख्यमंत्री किंवा त्यांचे अन्नअधिकारी अथवा नागरी पुरवठ्याचे संचालक यांची अेक बैठक चालू आहे. आणि अन्नधान्य धोरण समितीने सुचविलेल्या पद्धतीने ते निरनिराळ्या राज्यांच्या धान्यविषयक गरजा निश्चित करीत आहेत. या बैठकीत कोणते युक्तिवाद होतील याची कल्पना करणे अवघड नाही. अुदाहरणार्थ, समितीने सुचविलेल्या आकड्यांनुसार ओरिसा, मध्यप्रदेश व पंजाब या तीन राज्यांत दर माणशी दर दिवशी लागणाऱ्या धान्याचे प्रमाण सर्वात अधिक आहे. याची कारणे काहीही असली तरी ही तीन्ही राज्ये अन्नधान्यांबाबत सधन म्हणून शिलकी राज्ये आहेत, हे सर्वांच्याच लक्षात येअील. तसेच बिहार, गुजरात व केरळ या तीन राज्यात समितीच्या आकड्यांनुसार धान्यांची दर माणशी गरज सर्वात कमी आहे. ही तीन्ही राज्ये तुटीची राज्ये आहेत, हेही लक्षात येण्यास फार वेळ लागणार नाही. समितीने दिलेली धान्यविषयक गरजांसंबंधीची आकडेवारी मान्य केली तर त्याचा अर्थ असा होअील की ओरिसा, मध्यप्रदेश व पंजाब या शिलकी राज्यात दर माणशी धान्य गरजा बिहार, गुजरात व केरळ या तुटीच्या राज्यांच्या धान्यगरजांपेक्षा ५० ते ७५ टक्के जास्त आहेत. दुसरे अेक अुदाहरण म्हणून ओरिसा व मध्यप्रदेश या शिलकी राज्यांची आंध्रप्रदेश या आणखी अेका शिलकी राज्याशी तुलना करू. समितीने दिलेली आकडेवारी आधारभूत धरावयाची तर आंध्रप्रदेशाने तुटीच्या राज्यांना मदत करण्याची तयारी दर्शवितांना ओरिसा व मध्यप्रदेश यांच्या दर माणशी धान्यगरजा खुद्द आंध्रप्रदेशच्या गरजांपेक्षा २५ टक्के जास्त आहेत असे कबूल केले पाहिजे. किंवा महाराष्ट्र आणि गुजरात या दोन तुटीच्या प्रदेशांची तुलना करू. समितीची आकडेवारी मानावयाची तर महाराष्ट्राची दर माणशी धान्यगरज गुजरातच्या धान्यगरजेपेक्षा जवळजवळ अेकतृतीयांशाने जास्त आहे, असे गुजरातने मान्य केले पाहिजे. या व असल्या सूचना पटण्याजोग्या आहेत असे मला वाटत नाही, आणि वेगवेगळ्या राज्यांचे मुख्यमंत्री त्या मान्य करतील असा सुतराम् संभव दिसत नाही.

या ठिकाणी अेक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे. समितीने जी आकडेवारी दिली आहे ती १९६१-६३ या काळात वेगवेगळ्या राज्यांतील प्रत्यक्ष धान्यगरजांना कितपत धरून आहे हा प्रश्न येथे प्रस्तुत नाही. किंवा १९६१-६३ हा काळ कोणत्याही

अर्थाने या पुढील धोरणाकरिता आधारभूत धरावा किंवा नाही हाही प्रश्न महत्वाचा नाही. मुख्य मुद्दा असा की आपण कोणतीही वर्षे आधारभूत मानली आणि त्या काळातील प्रत्यक्ष धान्यविषयक गरजांचे निदर्शक म्हणून कोणतेही आकडे पुढे मांडले तरी समितीने सादर केलेल्या आकड्यांमध्ये जेवढी तफावत दिसून येते तेवढी तफावत आपल्या आकड्यांमध्ये असेल तर त्या आधारावर वेगवेगळ्या राज्यांमध्ये समझोता घडवून आणणे असंभवनीय आहे. धान्याचे न्याय्य वाटप याचा अर्थ सर्वत्र मोजून सारखे वाटप, असाच करण्याचे कारण नाही. परंतु सर्वांच्या संमतीने अेक राष्ट्रीय अन्नसंकल्प तयार करावयाचा असेल आणि त्याची यशस्वी कार्यवाही करावयाची असेल तर आपणाला सर्वत्र समान वाटपाच्या धोरणापासून फार दूर जाता येणार नाही, हे अुघड आहे.

या संदर्भात या प्रश्नाच्याबाबत अगदी पहिल्या अन्नधान्य धोरण समितीने (१९४२) जी भूमिका घेतली होती तिचा अुल्लेख करणे अुपयुक्त होअील. त्या समितीने असे म्हटले होते की, 'अधिकाधिक समानता हीच धान्यवाटपाबाबत न्याय्य भूमिका असू शकते.' आणि 'भावी काळात अखिल भारतीय पातळीवर धान्यवाटप करावयाचे तर आमच्या मते सर्वत्र शिधावाटप हाच अेकमेव मार्ग ठरतो.' तात्पर्य पहिल्या अन्नधान्य धोरण समितीने (१९४२) असे नमूद केले होते की समान किंवा जवळजवळ समान वाटप हेच न्याय्य तत्त्व असून अुपलब्ध धान्याचे अखिल भारतीय पातळीवर वाटप करण्याकरिता हेच तत्त्व व्यावहारिक व सयुक्तिक ठरेल. गतवर्षीच्या अन्नधान्य धोरण समितीची हे तत्त्व पूर्णतः डावलण्याची कल्पना ग्राह्य होण्याजोगी नाही. ती अमलात आणणे तर मुळीच शक्य नाही. राष्ट्रीय अुद्दिष्टे आणि ती साधण्याकरिता राष्ट्रीय शिस्त यांचे महत्त्व समितीने आग्रहपूर्वक प्रतिपादिले आहे. अन्नधान्यांचे अधिकाधिक समान वाटप हे अेक राष्ट्रीय अुद्दिष्ट होअू शकते आणि ते साधण्याकरिता राष्ट्रीय शिस्तीस आवाहन करिता येते. अुलटपक्षी, धान्याचे विषम वाटप परंपरागत आहे म्हणून, किंवा समाजातील आर्थिक विषमतेचेच ते अेक अंग आहे म्हणून धान्याचा खुला खासगी व्यापार चालू असतांना ज्या तऱ्हेचे विषम वाटप होते तसे विषम वाटप हे राष्ट्रीय अुद्दिष्ट होअू शकत नाही किंवा ते साधण्याकरिता राष्ट्रीय शिस्तीस आवाहनही करिता येत नाही. अशा विषम वाटपावर आधारित राष्ट्रीय अन्नसंकल्प तयार करण्याचा प्रयत्न केला तर त्यातून अनंत व निष्फळ वादंगांखेरीज दुसरे काहीही निष्पन्न होणार नाही. असे असूनही अन्नधान्यांचे वाटप खुल्या खासगी व्यापारात जसे विषम होते त्याच प्रमाणात विषम होअू द्यावे, त्यास हरकत नसावी,

या भूमिकेवरूनच राष्ट्रीय अन्नसंकल्प तयार करावा असे समिती सांगते. याचे कारण बहुधा हे असावे की ही विषमता कमी करण्याचा प्रयत्न केला आणि धान्याचे जास्तीत जास्त समान वाटप हे अुद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवले तर राष्ट्रीय शिस्तीअैवजी राजकीय अडचणी मात्र वाढतील अशी भीती तिला वाटत असावी.

समान वाटपाचे अुद्दिष्ट अेकदा बाजूस ठेवले की निरनिराळ्या राज्यांच्या धान्यविषयक गरजा निश्चित करतांना अशा तऱ्हेच्या अडचणी अुत्पन्न होणे अपरिहार्य ठरते. निरनिराळ्या राज्यातील धान्यांचे अुत्पादन निश्चित करिताना तर यापेक्षाही अधिक अडचणी अुपस्थित होतील. धान्याचे अुत्पादन साहजिकच दरवर्षी बदलते राहील आणि त्यात होणारे बदलही पुष्कळदा फार मोठे असू शकतील. साहजिकच दरवर्षी बदलते राहील आणि त्यात होणारे बदलही पुष्कळदा फार मोठे असू शकतील. अशा परिस्थितीत निरनिराळ्या राज्यांतील अुत्पादनांचे अंदाज ठरवितांना दोन प्रमुख अडचणी दिसतात त्या अशा : अेक तर अुत्पादनाचे अंदाज धान्यवसुलीचा हंगाम सुरू होण्यापूर्वी किंवा त्यानंतर शक्य तितक्या लौकर हातात असावयास हवेत. दुसरे म्हणजे केलेले अंदाज विश्वसनीय आणि सर्वांनुमते स्वीकारार्ह असले पाहिजेत. अन्नधान्य धोरण समितीने पहिल्या अडचणीचा अुल्लेख केलेला आहे. समिती म्हणते, 'पीक पाहाणीवर आधारलेले अुत्पादन अंदाज धान्यवसुलीचा हंगाम पुष्कळसा निघून गेल्यानंतरच हाती येतात. अुलट राष्ट्रीय अन्नसंकल्प हंगामाच्या सुरूवातीलाच तयार असावा लागतो.' ही अडचण मान्य करून समिती असे सुचविते की हंगामाच्या सुरूवातीस पिकांच्या परिस्थितीसंबंधी जी माहिती अुपलब्ध असेल तिच्या आधारे अेक कच्चा अन्नसंकल्प तयार करावा आणि पिकांसंबंधी जसजशी अधिक माहिती अुपलब्ध होअील तसतसा दर महिन्याच्या अन्नसंकल्पाचा फेरविचार करावा. या अेकूण व्यवहाराचे वर्णन समिती पुढील शब्दात करते :- 'राष्ट्रीय अन्नसंकल्प धान्यवसुलीच्या हंगामाच्या सुरूवातीसच तयार करण्याचा मुख्य हेतू हा की, धान्यवसुलीचे काम सुलभ व्हावे. या दृष्टीने आम्हांला असे वाटते की शिलकी राज्यातून अितर राज्यांना पुरवठा करण्याच्या हेतूने धान्यवसुली करण्याकरिता काही किमान अुद्दिष्टे ठरवून देणे सोयीचे होअील. ही अुद्दिष्टे १९६१-६३ च्या काळात त्या राज्यांतून बाहेर गेलेल्या अेकूण धान्यावर आधारलेली असावीत. सुरूवातीस ही अुद्दिष्टे १९६१-६३ या काळात सरासरीने राज्याबाहेर गेलेल्या अेकूण धान्याच्या ७५ टक्के ठरवावीत किंवा पिकांच्या परिस्थितीसंबंधी जसजशी माहिती अुपलब्ध होअील तसतसा त्यांत फेरबदल करावा. अखेर जेव्हा अुत्पादनाबाबत पूर्ण अंदाज

अुपलब्ध होतील तेव्हा अितर गोष्टींप्रमाणेच राष्ट्रीय सहभागित्वाच्या तत्त्वाचाही विचार करून अन्नसंकल्पास अंतिम रूप द्यावे.'

राष्ट्रीय अन्नसंकल्पाची ही आखणी, फेरतपासणी, दुरूस्ती आणि अंमलबजावणी अित्यादी सारी कामे अेका राष्ट्रीय अन्नमहामंडळाने करावीत, या महामंडळाचे अध्यक्ष पंतप्रधान असावेत. आणि त्यात सर्व राज्यांचे मुख्यमंत्री, केंद्रीय अन्नमंत्री व नियोजन मंत्री यांचा समावेश असावा असे समितीने सुचविले आहे. या महामंडळात कोणत्या तऱ्हेचे संघर्ष निर्माण होतील आणि धुमसत राहातील याची कल्पना करणे अवघड नाही. या संघर्षातील राजकारणाचा भाग बाजूस ठेवला तरी राष्ट्रीय अन्नसंकल्पाच्या अंमलबजावणीची जबाबदारी प्रामुख्याने ज्यांच्यावर पडणार आहे त्या शिलकी राज्यांच्या मुख्यमंत्र्यांसमोर येणाऱ्या वास्तविक अडचणी लक्षात घेतल्या पाहिजेत. पहिली अडचण म्हणजे सालोसाल बदलते धान्यांचे अुत्पादन, आणि त्यासंबंधी निश्चित अंदाज हाती येण्याकरिता लागणारा विलंब. त्यामुळे पिकांसंबंधी जसजशी अधिक माहिती हाती येअील तसतसे अुत्पादनाचे अंदाज दुरूस्त होत राहाणे अपरिहार्य आहे. चालू वर्षाच्या अुत्पादनासंबंधी ज्यावेळी संपूर्ण माहिती हाती येअील त्यावेळी पुढील हंगामाविषयीची अनिश्चितता प्रामुख्याने नजरेसमोर येणे हेही अपरिहार्य आहे. अशा परिस्थितीत शिलकी राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना राष्ट्रीय अन्नसंकल्पानुसार धान्यपुरवठ्याचे वायदे करावे लागतील. त्यामुळे असे वायदे करतांना त्यांनी हात आखडता ठेवला तर त्यात नवल वाटण्याचे कारण नाही. याअुलट 'तुम्हांला दहा हवे असतील तर वीस मागा' या व्यावहारिक नियमाने तुटीच्या राज्यांचे मुख्यमंत्री आपल्या गरजा फुगवून सांगतील, हेही साहजिक आहे. अशा रीतीने शिलकीच्या व तुटीच्या अशा दोन्ही राज्यांमधील अुत्पादनाचे अंदाज कमी सांगण्याची अेकूण प्रवृत्ती राहील. पिकांचे अंदाज करण्याचे काम राज्यांकडे सोपविल्यास ते आपले अंदाज हात आखडून जाहीर करतील. अुलट अुत्पादनाचे अंदाज केंद्रसरकारने किंवा अेखाद्या केंद्रीय संघटनेने करावयाचे ठरले तर असे अंदाज वादग्रस्त होअून सर्वमान्य होणार नाहीत. या साऱ्याचा परिणाम म्हणजे राष्ट्रीय अन्नसंकल्पात दाखविलेली तुटीच्या राज्यांची तुट शिलकी राज्यांनी दाखविलेल्या शिलकीतून भरून निघणार नाही. तात्पर्य, राष्ट्रीय अन्नसंकल्प अपरिहार्यपणे तुटीचा संकल्प होअील, आणि राष्ट्रीय धान्यतूट अतिशयोक्त व अवास्तव दिसू लागेल.

अुत्पादनाचे अंदाज अशा रीतीने कमी सांगण्याची प्रवृत्ती आणि त्यातून भासणारी अतिशयोक्त तूट यांचा धोका आपण क्षणभर बाजूस ठेवू. क्षणभर अशी कल्पना करू

की, अुत्पादनाचे अंदाज पूर्णपणे वस्तुनिष्ठ आणि सर्वमान्य असतील. आपण अशीही कल्पना करू की वेगवेगळ्या राज्यांच्या धान्यविषयक गरजाही वादंग न माजता अन्नधान्य धोरण समितीने सुचविलेल्या तत्वांनुसार निश्चित केल्या जातील. आता लक्षात घेण्यासारखी महत्वाची गोष्ट अशी की, अशा परिस्थितीतही राष्ट्रीय अन्नसंकल्प तुटीचाच संकल्प राहील. त्याचे कारण असे की देशात आज धान्याचा मूलभूत तुटवडा आहे, आणि समितीच्या अंदाजाप्रमाणे हा तुटवडा पुढील अनेक वर्षे राहाण्याचा संभव आहे. अुदाहरणार्थ, आपण १९६१-६३ हा काळ घेअू. निरनिराळ्या राज्यांच्या धान्यविषयक गरजा निश्चित करण्यासाठी आणि राज्या-राज्यात कराव्या लागणाऱ्या धान्यवाहतुकीकरिता मार्गदर्शक म्हणून अन्नधान्य धोरण समितीने हा काळ आधारभूत मानलेला आहे. या तीन वर्षांत धान्याच्या वट्ट अुत्पादनाचे अंदाज, बी-बियाणे अित्यादी खर्च वजा जाता, पुढील प्रमाणे होते :- १९६१ साली ६.०६ कोटी, १९६२ साली ६.२१ कोटी व १९६३ साली ५.८६ कोटी टन. हे अुत्पादन गरज भागविण्यास पुरेसे नसल्याने या तीन वर्षात अनुक्रमे ३४.९ लाख, ३६.४ लाख आणि ४५.५ लाख टन धान्य आयात करावे लागले. खेरीज, या तीनहि वर्षांत सरकारच्या धान्यवाटपातून थोडेफार धान्य काढावे लागले. तात्पर्य, १९६१-६३ हा जो काळ समितीने आधारभूत मानलेला आहे त्या काळातसुद्धा दरसाल सरासरीने ४० लाख टनांची तूट होती. ही तूट यापुढेही अशीच धान्यआयातीने भागवावी असे समिती म्हणत नाही. हे जर खरे तर अशा परिस्थितीतही राष्ट्रीय अन्नसंकल्पात तूट येअू द्यावयाची नसेल तर १९६१-६३ या काळात झालेले अुपलब्ध धान्य आणि राज्या-राज्यांत त्या काळात झालेली वाहतूक ही आधारभूत धरून चालणार नाही. देशात आज मूलभूत तूट आहे, आणि धान्यआयात थांबवावयाची तर पुढील काही वर्षे ही तूट वाढतच जाण्याचा संभव आहे. अशा परिस्थितीत या मूलभूत तुटीचे सबंध देशात सर्वत्र समान वाटप कसे करावे, हा मुख्य प्रश्न आहे. या प्रश्नाचा खुलासा अन्नधान्य धोरण समिती करीत नाही.

शिवाय हा काही केवळ अेका ठराविक किंवा ठराविक रीतीने वाढत जाणाऱ्या तुटीचे समान वाटप करण्याचाच प्रश्न नाही. राष्ट्रीय अन्नसंकल्पाला जो खरा प्रश्न सोडवावा लागेल तो हा आहे की, बऱ्यावाअीट हंगामामुळे निर्माण होणाऱ्या असाधारण व अनपेक्षित तुटीचे वाटप कसे करावयाचे? आणि ज्या वर्षी पीक चांगले असेल त्यावर्षीच्या अुत्पादनातून किती धान्य शिलकी साठ्यात जमा करावयाचे? अन्नधान्य धोरण समितीने (१९६६) वेगवेगळ्या राज्यांच्या धान्यगरजा व राज्या-राज्यात

करावयाची धान्यवाहतूक ही निश्चत करण्याकरिता १९६१-६३ या काळातील परिस्थिती मार्गदर्शक मानली आहे. यावरून हे स्पष्ट होते की समितीने जरी अन्नाबाबत पूर्णतः स्वावलंबनाचा पुरस्कार केलेला असला तरी ते प्रत्यक्षात आणण्याकरिता काय अुपाययोजना करावयास हवी, याची तिला कल्पना तरी नसावी किंवा त्याकडे तिने जाणूनबुजून डोळेझाक तरी केली असावी.

तात्पर्य, समितीने सुचविलेल्या पद्धतीने राष्ट्रीय अन्नसंकल्प तयार केला तर तो बहुधा नेहमीच तुटीचा संकल्प राहील आणि केंद्र सरकारला ही तूट भरून काढण्याकरिता अुपाय शोधावे लागतील. आजपर्यंत याकरिता सरकार धान्यआयातीवर अवलंबून राहिलेले आहे. समितीच्या मते यापुढे हा पर्याय अुपलब्ध होणार नाही. आपणही तशी आशा करू या. परंतु समितीने आपला अहवाल सादर केल्यापासून गेल्या तीन-चार महिन्यात ज्या घटना घडल्या आहेत त्यावरून ही आशा अस्थानीच ठरेल असे वाटते. कारण काहीही झाले तरी धान्यआयात बंद होअील असे दिसत नाही. या आयात धान्याकरिता द्यावी लागणारी किंमत कदाचित् रूपयांत द्यावी लागेल किंवा कदाचित् परराष्ट्रीय चलनात द्यावी लागेल. या धान्यआयातीच्या पायी आपल्या आर्थिक व परराष्ट्रीय धोरणांना परराष्ट्रांच्या दडपणाखाली मुरड घालावी लागेल किंवा राष्ट्रीय अपमान गिळावा लागेल. पण काही झाले तरी धान्यआयात होत राहील. अशी धान्यआयात चालू राहिली की राष्ट्रीय अन्नसंकल्प तयार करण्याची गरजच राहाणार नाही. मी वर सांगितल्याप्रमाणे सर्वसामान्य परिस्थितीतही राष्ट्रीय अन्नसंकल्प तुटीचा राहील आणि त्यात दिसणारी तूट ही बहुधा अतिशयोक्त व अवास्तव असेल. अेकदा अशी तूट धान्यआयातीने भरून काढता येते हे लक्षात आले की ही तूट शक्य तितकी कमी कशी होअील असा प्रयत्न करण्याची जबाबदारीही कोणाला वाटेनाशी होअील. १९६०-६१ ते १९६३-६४ या काळातील धान्यपरिस्थितीचे वर्णन करितांना समिती म्हणते, 'या काळात अधिक अुत्पादन किंवा अधिक धान्यवसुली करण्याची राजकीय निकडच भासली नाही. कारण मूलतः गंभीर असलेल्या परिस्थितीवर धान्यआयातीने पांघरूण घातले होते.' असे असूनही भावी काळात राष्ट्रीय अन्नसंकल्प तयार करण्याकरिता नेमका हाच काळ आधारभूत धरावा, अशी समितीने शिफारस केली आहे. अशा परिस्थितीत अितिहासाची पुनरावृत्ती झाल्यास नवल नाही. राष्ट्रीय अन्नसंकल्पातील तूट सालोसाल धान्यआयातीने भरून काढली जाअील आणि आपल्या मूलतः तर्कविसंगत अन्नधोरणावर धान्यआयातीचे पांघरूण पडेल.

तात्पर्य, अन्नधान्य धोरण समितीने (१९६६) राष्ट्रीय अन्नसंकल्पाचा वरवर पाठपुरावा केलेला असला तरी त्याच्या आवरणाखाली अन्नधान्याबाबत स्वावलंबी कसे व्हावे,

धान्यआयात संपुष्टात कशी आणावी, हा अन्नधोरणविषयक मूलभूत व मध्यवर्ती प्रश्न डावलला आहे. किंबहुना असे वाटते की, समितीने राष्ट्रीय अन्नसंकल्पाच्या रूपाने असे अेक निमित्त निर्माण केले आहे ज्यामुळे केंद्रीय सरकारला परदेशांतून धान्य आयात करणे आणि जगभर धान्यमदतीची याचना करणे अपरिहार्य होअील. समितीच्या सर्व शिफारशींत हीच सर्वात धोक्याची बाब आहे. समितीलाही या धोक्याची जाणीव आहे. राष्ट्रीय अुद्दिष्टे आणि ती साधण्याकरिता आवश्यक असणारी राष्ट्रीय शिस्त व राष्ट्रीय अधिसत्ता यांचे महत्त्व प्रतिपादन करून समिती म्हणते, 'आम्ही स्पष्ट सांगू अिच्छितो की, आम्ही केलेल्या शिफारशी या मूलभूत गृहीतावर आधारित आहेत. अशा प्रकारची शिस्त किंवा अधिसत्ता नसेल तर ज्या धोरणांची आम्ही शिफारस करीत आहोत आणि कारभारषिषयक ज्या व्यवस्था सुचवीत आहोत त्या साध्य होअू शकणार नाहीत.' याचा अर्थ अेवढाच की समतोल राष्ट्रीय अन्नसंकल्प तयार होणार नाही आणि आपले अन्नधान्याबाबतचे परावलंबित्व नष्ट होणार नाही, ते का होणार नाही याची कारणमीमांसा करण्याचे पुण्यच तेवढे समितीच्या पदरी राहील!

# पुरवणी

## आपली अन्नसमस्या

### व्याख्यान : तिसरे

अन्नधान्य धोरण समितीने (१९६६) सुचविलेल्या सुसंबद्ध अन्नधोरणासंबंधी दोन प्रश्नांचे विवेचन येथवर झाले. आता तिसऱ्या प्रश्नाकडे वळू. तो असा की, अन्नधोरणाच्या संबंधात अन्नधान्यांच्या किमतीविषयक धोरण काय असावे, हा होय. आपल्या धान्यधोरणाच्या मूलभूत अुद्दिष्टांपैकी अेक अुद्दिष्ट 'वाजवी' किंमत हे आहे. हे अुद्दिष्ट कसे ठरले व त्याचा अर्थ काय हे आपण पाहिले आहे. दीर्घकालीन धोरणाच्या दृष्टीने वाजवी किंमत ही कल्पना फारशी अर्थपूर्ण नाही आणि ज्याकाळात किमती वाढत असतात त्या काळात धान्यांच्याच किंमती तेवढ्या रोखून धरण्याच्या धोरणाने अुत्पादकांनाच धक्का लागण्याचा संबध असतो, हेही आपण पाहिले आहे. तात्कालिक धोरणाच्या दृष्टिकोनातून पाहिल्यास मला असे वाटते की अुत्पादकाला द्यावयाची किंमत आणि गिऱ्हाअिकाला द्यावी लागणारी किंमत या दोन्ही निश्चित करून किंमत स्थिर ठेवणे हे आपले अुद्दिष्ट असेल तर धान्याचा खासगी व्यापार व खुला बाजार पूर्णतः बंद करावा लागेल. अन्नधान्य धोरण समिती म्हणते, राज्य सरकारांद्वारा संचालित अन्नव्यवस्था आणि खासगी व्यापार या दोन्ही गोष्टी अेकत्र नांदणे शक्य आहे.' परंतु याबाबत समितीने सर्व बाजूंनी काळजीपूर्वक विचार केलेला नाही, असे मला वाटते. जोपर्यंत खासगी व्यापार व खुला बाजार अनिर्बंध चालू राहील तोपर्यंत धान्यवसुलीचे भाव व धान्यवाटपाचे भाव निश्चित करून त्यांच्याद्वारे किमती रोखून धरण्याचा प्रयत्न करणारे अन्नधोरण परदेशातून जादा अन्नधान्याचा पुरवठा होत राहिला नाही तर खुल्या बाजारातील किंमती खाली आणण्यात किंवा रोखून धरण्यात यशस्वी होणार नाही. अितकेच नव्हे तर खुल्या बाजारातील वाढत्या किंमतीपुढे या धोरणाचा पाठपुरावा फार काळ करिता येत नाही, व ते मूलतःच कोलमडून पडते, हे आता अनुभवाने सिद्ध झाले आहे. या धोरणामुळे ठरलेल्या भावात पुरेशी धान्यवसुली करिता येत नाही आणि

धान्यवाटपाकरिता ठरविलेल्या किमतीनुसार स्वस्त धान्य दुकानांवर जेवढी मागणी येते तेवढी पुरी करिता येत नाही. परिणामी, अेक तर धान्य आयातीचा आसरा घ्यावा लागतो, नाहींतर मूळ धोरण अशक्य म्हणून सोडून द्यावे लागते.

अशा परिस्थितीत सरकारसमोर अन्नधोरणविषयक चार पर्याय राहातात :

(१) अन्नधान्यांचा खासगी खुला व्यापार पूर्णतः बंद करून संपूर्ण नियंत्रण व सर्वत्र शिधावाटप लागू करणे.

(२) संपूर्ण विनियंत्रण करून सर्वस्वी खासगी खुल्या व्यापाराकडे वळणे.

(३) धान्यवसुली व धान्यवाटपाची गरज यातील अंतर भरून काढण्यासाठी परदेशाकडे धान्यमदतीची याचना करणे, आणि

(४) खुल्या बाजाराबरोबरच सरकारी धान्यवसुली व धान्यवाटप काही प्रमाणात चालू ठेवणे, मात्र धान्यांच्या किमती स्थिर ठेवण्याचा आग्रह कमी करणे– याचा अर्थ असा की, ग्राहकांच्या दृष्टीने वाजवी म्हणून ठरविलेल्या किंमतीचा वेळोवेळी फेरविचार करणे, त्या अधिक वास्तववादी बनविणे म्हणजेच खुल्या बाजारातील किमतींच्या अधिक जवळ आणणे, आणि अशा प्रकारे धान्यवसुली सुलभ करून स्वस्त धान्य दुकानांवरील मागणी कमी करणे.

यापैकी पहिल्या पर्यायाचा आपण विचार करून तो राजकीयदृष्ट्या अशक्य कोटीतील म्हणून बाजूस सारला आहे. दुसऱ्या पर्यायाचा आपण प्रयोग करून पाहिला आहे, आणि तो व्यवहार्य नाही असे आपल्याला आढळून आले आहे. तिसरा पर्याय देशहिताच्या दृष्टीने अिष्ट नाही हे आपणांला कळून चुकले आहे, आणि म्हणून त्यापासून शक्य तितक्या लौकर परावृत्त व्हावयाची आपली मनीषा आहे. तेव्हा आता आपल्यासमोर फक्त चौथाच पर्याय अुरतो. तो असा की वाजवी किंमतीचा वेळोवेळी फेरविचार करून त्या अधिक वास्तववादी, म्हणजेच खुल्या बाजारातील किंमतींना धरून बनविणे. हे जर खरे तर अन्नधान्यांच्या किंमती वाजवी समजल्या गेलेल्या अेका विशिष्ट पातळीवर रोखून धरण्याच्या अुद्दिष्टाअैवजी आपल्या अन्नधोरणात धान्यांच्या किंमतीविषयक दुसरे अधिक सयुक्तिक, व्यवहार्य आणि अुपयुक्त अुद्दिष्ट ठेवता येअील काय, याचा शोध घेणे जरूर आहे.

याकरिता अन्नधान्यांच्या किंमती स्थिर करणे आणि अन्नधान्यांच्या किंमती अेका विशिष्ट पातळीवर कायमच्या रोखून धरणे या दोन कल्पनांतील फरक समजाअून घेतला पाहिजे. ज्यावेळी आपण किंमतींच्या स्थैर्यावर भर देतो त्यावेळी आपणांस अन्नधान्यांच्या किंमतींचे तौलनिक स्थैर्य अभिप्रेत असते. याचा अर्थ असा की,

अितर वस्तूंच्या किंमती ज्या मानाने कमी-अधिक होतील त्या मानाने आणि त्यांच्या अनुरोधाने धान्यांच्या किमतीही कमी-अधिक होणार व व्हाव्यात हे आपण मान्य करतो. परंतु अन्नधान्यांच्या किंमतीत अेका वर्षाच्या अवधीत किंवा वर्षा-वर्षात होणारा अितर वस्तूंच्या किंमतींशी विसंगत आणि धान्याशी संबंधित स्वतंत्र कारणांनी अुद्‌भवणारा फार मोठा चढअुतार कमी करावा ही तौलनिक स्थैर्याची मुख्य कल्पना आहे. अशा चढअुतारांचा अुद्‌भव मुख्यतः घाअुक बाजारात येणाऱ्या धान्यपुरवठ्यातील कमी-अधिकपणात असतो. कोणत्याही धान्याचा घाअुक बाजारात होणारा पुरवठा सुगीनंतर काही महिने मोठ्या प्रमाणावर असतो. पुढे तो कमी होत जाअून दुसऱ्या सुगीपूर्वी काही महिने अगदी रोडावतो. वषोवर्षी बाजारात येणाऱ्या अेकूण मालाचे प्रमाणही त्या-त्या वर्षातील अुत्पादनानुसार कमी-अधिक होते. शिवाय, बाजारात येणारा माल हा अुत्पादकांच्या गरजा भागल्यानंतर अुत्पादनापैकी अुरलेला जादा माल असल्यामुळे बाजारात येणाऱ्या मालाच्या प्रमाणातील चढअुतार प्रत्यक्ष अुत्पादनातील चढअुतारापेक्षा जास्त असतो.

घाअुक बाजारातील गिऱ्हाअीक म्हणजे घाअुक व्यापारी. अुत्पादकाकडून बाजारात कमी-अधिक प्रमाणात येणारा माल विकत घेणे, तो साठविणे आणि अंतिम ग्राहकाची गरज भागविण्याकरिता तो माल किरकोळ व्यापाऱ्यांना सातत्याने पुरविणे हे घाअुक व्यापाराचे काम असते. यामुळे घाअुक व्यापाऱ्याची मागणी ही साठ्याची मागणी असते. मालाच्या भावी किंमतीविषयी त्याचे जे अंदाज असतात त्यांवर ती मागणी अवलंबून असते. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे तर घाअुक व्यापाऱ्याच्या या व्यवहाराला काहीसे सट्ट्याचे स्वरूप असते. भावी किंमतींच्या अंदाजांवर आधारलेली घाअुक व्यापाऱ्याची ही मागणी साहजिकच अस्थिर स्वरूपाची असते. जेव्हा बाजारामध्ये मालाची आयात मोठ्या प्रमाणावर होत असते आणि किंमती स्वाभाविकपणे कमी असतात त्यावेळी किंमती आणखी खाली जातील अशा अंदाजाने घाअुक व्यापारी आपली मागणी आखडती घेतो आणि त्याचा परिणाम म्हणून किंमती खरोखरीच अवास्तव खाली जातात. अुलट ज्यावेळी बाजारात मालाची आवक कमी असते व किंमती चढत्या असतात त्यावेळी त्या अधिक चढतील अशा अंदाजावर व्यापारी मागणी वाढते आणि किंमती खरोखरीच अवास्तव चढतात. अशा प्रकारे बाजारात आवक होणाऱ्या मालाचे कमी-अधिक प्रमाण आणि त्याला अनुसरून परंतु व्यस्त प्रमाणात बदलणारी व्यापारी मागणी यांचा दुहेरी परिणाम म्हणून घाअुक बाजारातील धान्यांच्या किंमतींत अतिशयोक्त व अवास्तव चढअुतार होत असतात.

घाउुक बाजार हे धान्यबाजाराचे अेक टोक. दुसरे टोक म्हणजे ज्या बाजारात किरकोळ व्यापारी किंवा अंतिम ग्राहक खरेदी करतात तो बाजार. या किरकोळ बाजारात धान्याचा पुरवठा होतो तो मुख्यतः घाउुक व्यापाऱ्यांकडून. अंतिम ग्राहकाची गरज ही सामान्यतः अेक ठराविक व स्थिर असल्याने घाउुक व्यापाऱ्याने किरकोळ बाजाराला सतत व समप्रमाणात पुरवठा करावयास हवा. परंतु घाउुक व्यापारी आपल्याजवळील साठा विचारात घेउुन, तसेच पुढील हंगाम व भावी किंमती यासंबंधीच्या त्याच्या अंदाजांनुसार, किरकोळ बाजारात करावयाच्या पुरवठ्याचे प्रमाण कमी–अधिक करतो. अंतिम ग्राहकाची धान्यविषयक गरज निकडीची, तसेच फारशी कमी–अधिक करण्याजोगी नसल्यामुळे बाजारात होणाऱ्या पुरवठ्यात थोडासा जरी फरक पडला तरी परिणामतः धान्यांच्या किंमतीत प्रमाणाबाहेर चढअुतार होतात.

अशा प्रकारे घाउुक व्यापाराच्या व्यवहारामुळे घाउुक व किरकोळ या दोन्ही बाजारांतील किंमतीत अवास्तव चढअुतार होत असतात. या चढअुतारांमागे घाउुक व्यापाऱ्यांचे अेक दुष्ट संगनमत असते असे पुष्कळदा समजले जाते. परंतु तसे समजण्याची गरज नाही. घाउुक व्यापाऱ्यांचे वर सांगितलेले व्यवहार हे खुल्या स्पर्धात्मक बाजाराचे अेक अपरिहार्य अंग आहे आणि ते तसेच समजणे योग्य होअील. अर्थातच किंमतीत अस्थिरता अुत्पन्न करणारी ही साठेबाजी किंवा सट्टेबाजी घाउुक व्यापाऱ्यांपुरतीच मर्यादित असते असे नाही. किंमतींतील चढअुतार अेकदा मर्यादेबाहेर गेले की या सट्टेबाज साठेबाजीत अुत्पादक, घाउुक व्यापारी, किरकोळ व्यापारी आणि अंतिम ग्राहक सारेच आपापल्या कुवतीप्रमाणे सामील होतात. अशा प्रकारे धान्यांच्या किंमतीत होणाऱ्या चढअुतारास हे सारेच वर्ग आपापल्या परीने जबाबदार असतात आणि हातभार लावीत असतात.

अन्नधान्यांच्या किंमतींतील ही अस्थिरता अुत्पादक व ग्राहक या दोघांच्याही दृष्टीने अपायकारक व हानिकारक आहे. किंमतींतील ही अस्थिरता व अनिश्चितता यामुळे अुत्पादक अितका गांगरून जातो की त्यापाशी वाढत्या किमतीसुद्धा, जर त्या अस्थिर व अतिरिक्त असतील तर, त्या अुत्पादनास अुपकारक ठरत नाहीत आणि प्रोत्साहन देअू शकत नाहीत. हीच गोष्ट बहुसंख्य ग्राहकांच्या बाबतीतही खरी आहे. ज्यांना धान्यांच्या किंमती कमी असतांना मोठ्या प्रमाणात धान्य विकत घेअून साठा करण्याचे सामर्थ्य नसते, ज्यांना रोजच्या रोज, आठवड्याच्या आठवड्याला किंवा फारतर महिन्याच्या महिन्याला धान्य खरेदी करावे लागते असे बहुसंख्य ग्राहक धान्यांच्या किमतींतील अस्थिरता, अनिश्चितता आणि त्यांत होणारे भरमसाठ चढअुतार

यांनी गांजून जातात. तात्पर्य, धान्यांच्या किंमतींतील हे अवास्तव चढअुतार कमी करणे आणि त्यांच्यात काही प्रमाणात स्थैर्य निर्माण करणे हे धान्यांच्या किंमतीविषयक धोरणाचे अेक प्रमुख अुद्दिष्ट असावयास हवे. सुदैवाने हे अुद्दिष्ट अुत्पादक व ग्राहक या दोघांच्याही दृष्टीने अुपकारक असल्याने ते त्यांच्या हितसंबंधात संघर्ष निर्माण करीत नाही.

श्री. अशोक मेहता यांच्या अध्यक्षतेखालील अन्नधान्य चौकशी समितीने (१९६७) या अुद्दिष्टावर भर दिलेला होता, आणि हे अुद्दिष्ट ठेवून अन्नधोरण आखावयाचे तर घाअुक व्यापाराशी संघर्ष निर्माण होण्याची शक्यता आहे हे जाणून तिने धान्यांच्या घाअुक व्यापाराचे राष्ट्रीयीकरण करावे, असे सुचविले होते. समितीने असे आग्रहपूर्वक सांगितले की, जोपर्यंत धान्यांच्या घाअुक व्यापारावर राष्ट्रीय नियंत्रण घालण्यात येणार नाही तोपर्यंत अन्नधान्यांच्या किंमतींना स्थैर्य देणे शक्य नाही. म्हणून योजनापूर्वक क्रमाक्रमाने धान्याच्या घाअुक व्यापाराचे राष्ट्रीयीकरण करणे हे आपले धोरण असले पाहिजे.' समितीने ताबडतोबीची म्हणून अशी शिफारस केली की,

(अ) अेक नित्याची योजना म्हणून सरकारने खुल्या बाजारात प्रसंगानुसार धान्यांची खरेदी-विक्री करावी.

(ब) घाअुक व्यापाराचे काही प्रमाणात राष्ट्रीयीकरण करावे, आणि

(क) अुर्वरित बाजारात व्यवहार करू अिच्छिणाऱ्या व्यापाऱ्यांवर परवानापद्धतीच्या द्वारे नियंत्रण ठेवावे.

अेक नित्याचा व्यवहार म्हणून सरकारला मुख्य बाजारात प्रसंगानुसार धान्यांची खरेदी-विक्री करता यावी यासाठी समितीने अेक अन्नधान्य स्थिरीकरण संघटना अुभारण्याची शिफारस केली होती. या संघटनेने अितर गोष्टींबरोबरच अन्नधान्य बाजारात अेक व्यापारी संघटना म्हणून कार्य करावे आणि त्याकरिता महत्वाच्या सर्व बाजारपेठांत, विशेषतः शिलकी प्रदेशांतील व्यापारी केंद्रात, तिच्या शाखा किंवा कार्यालये असावीत आणि तिच्याकडे खुल्या बाजारातील खरेदी-विक्री, धान्यवसुली व धान्य साठे करण्याची निश्चित जबाबदारी सोपविण्यात यावी असे समितीने सुचविले होते. खुल्या बाजारातील व्यवहार म्हणजे जेथे व जेव्हा किंमती खाली असतील तेथे व तेव्हा माल खरेदी करणे आणि जेथे व जेव्हा किंमती चढत्या असतील तेथे व तेव्हा मालाची विक्री करणे हे किंमतींना स्थैर्य देण्याचे मुख्य साधन आहे, असे समितीचे मत होते. परंतु या साधनाचा अवलंब करण्यातील मुख्य अडचण समितीच्या लगेच लक्षात आली आणि तिने असे नमूद करून ठेवले की,

जोपर्यंत चलनवाढ व भाववाढ चालू राहील आणि धान्यांचा तुटवडा कायम असेल तोपर्यंत या संघटनेने खुल्या बाजारात खरेदी सुरू केली तर खुल्या बाजारातील किमती अधिकच वाढतील आणि या संघटनेला आपले कार्य लौकरच थांबविणे भाग पडेल. म्हणून समितीने असे सुचविले की सुरूवातीला तरी या संघटनेला खुल्या बाजारातील खरेदी अैवजी सक्तीच्या धान्यवसुलीचा अुपाय अवलंबावा लागेल. अशा प्रकारे धान्याच्या बाजारात व्यवहार करणारी अेक व्यापारी संघटना म्हणून सुचविलेल्या अन्नधान्य स्थिरीकरण संघटनेची मूळ कल्पनाच नाअिलाजास्तव सोडून द्यावी लागली.

अन्नधान्य चौकशी समितीच्या (१९५७) या शिफारशींनुसार राष्ट्रीय विकास मंडळाने नोव्हेंबर १९५८ मध्ये अन्नधान्याच्या घाअुक व्यापाराचे राष्ट्रीयीकरण करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय प्रत्यक्ष कार्यवाहीत आणण्याच्या दृष्टीने प्रारंभ म्हणून केंद्र सरकारने पुढीलप्रमाणे सूचना केल्या :

(अ) घाअुक व्यापाऱ्यांना व्यापार करण्यासाठी परवाने देण्यात यावेत. अशा व्यापाऱ्यांनी बाजारात धान्य खरेदी करितांना अुत्पादकाला ठरवून दिलेल्या किमान किंमती दिल्या पाहिजेत.

(ब) परवानेदार व्यापाऱ्यांकडून नियंत्रित भावाने त्यांच्याजवळील संपूर्ण धान्य साठा किंवा त्याचा काही भाग विकत घेण्याचा अधिकार सरकारला असावा.

(क) या व्यापाऱ्यांना आपल्याजवळील अुरलेला माल कमाल नियंत्रित नावाने किरकोळ व्यापाऱ्यांना विकण्याची मुभा असावी, आणि

(ड) घाअुक व्यापाऱ्यांनी आपली खरेदी-विक्री व साठे यासंबंधी योग्य हिशेब ठेवले पाहिजेत आणि ते वेळोवेळी सरकारला सादर केले पाहिजेत.

अशा प्रकारे अन्नधान्यांच्या किंमती स्थिर करण्यासाठी सरकारने खुल्या बाजारात अुतरावे आणि त्यासाठी धान्याच्या घाअुक व्यापाराचे राष्ट्रीयीकरण करावे, ही कल्पना मान्य झाली. परंतु प्रत्यक्षात मात्र घाअुक व्यापार खासगी व्यापाऱ्यांच्या हातांतच ठेवून केवळ त्यांच्या खरेदी व विक्रीच्या किंमतींवर किमान व कमाल नियंत्रणे घालण्याची योजना अमलात आली. या योजनेत कायद्याने नियंत्रित किमान किंमती ठरविल्या होत्या. घाअूक व्यापाऱ्यांनी अुत्पादकांना निदान या किमान किंमती दिल्याच पाहिजेत असे त्यांच्यावर बंधन होते. त्याचप्रमाणे, दुसऱ्या बाजूला कायद्याने नियंत्रित कमाल किंमती ठरविल्या होत्या. घाअुक व्यापाऱ्यांनी किरकोळ व्यापाऱ्यांना माल विकतांना या कमाल किंमतीपेक्षा जास्त किंमती घेणे बेकायदा

होते. याखेरीज, या किमान व कमाल किंमतींच्या मध्ये कायद्याने निश्चित केलेल्या सरकारच्या धान्यवसुलीच्या किंमती होत्या. या किंमतीनुसार सरकारला कोणत्याही क्षणी घाउक व्यापाऱ्यांकडून त्यांच्या जवळ असलेला सर्व धान्यसाठा किंवा त्याचा काही भाग विकत घेण्याचा अधिकार होता. हे करणे सरकारला सुलभ व्हावे म्हणून घाऊक व्यापाऱ्यांनी आपल्याजवळील धान्यसाठे वेळोवेळी सरकारला कळविले पाहिजेत अशी सक्ती होती. या साऱ्याचा जो परिणाम व्हावयाचा तोच झाला. १९५८-५९ साली जेव्हा वरील योजनेनुसार अनेक राज्यांत सरकारने धान्यखरेदी सुरू केली तेव्हा मालाची बाजारातील आवक कमी झाली. बाजारभाव कायदेशीर कमाल भावांपेक्षा वर राहू लागले आणि सरकारला पुरेशा प्रमाणात धान्यवसुली करणे अशक्य झाले. निरुपायाने अेका मागून अेक राज्यात सरकारने धान्य- खरेदी बंद केली आणि अेका वर्षाच्या आत सर्व योजना कोलमडून पडली.

जानेवारी १९६५ मध्ये भारत सरकारने धान्यव्यापार करण्याकरिता अन्नमहामंडळाची स्थापना केली. आणि धान्याच्या घाऊक व्यापाराच्या राष्ट्रीयीकरणाच्या कल्पनेस पुनश्च चालना मिळाली. या अन्नमहामंडळाने देशातील अन्नधान्यांची खरेदी, साठा, ने-आण, वाहतूक, वाटप व विक्री करावी अशी अपेक्षा होती. परंतु या सुमारास धान्यपरिस्थिती फार बिघडल्याने सर्वत्र धान्यवसुली जारीने सुरू करण्यात आली व ती सुलभ व्हावी म्हणून राज्या-राज्यातील धान्य-व्यापारावर बंधने घालण्यात आली. अर्थातच अन्नमहामंडळाला या नियमांच्या व नियंत्रणाच्या मर्यादेत राहूनच काम करणे भाग पडले. अशा परिस्थितीत अन्नमहामंडळ काय कार्य करू शकेल याचा अन्नधान्य धोरण समितीने (१९६६) विशेष विचार करून काही शिफारशी केल्या आहेत. अुदाहरणार्थ, समितीने असे सुचविले आहे की, राज्याराज्यांतील अन्नधान्यांचा संपूर्ण व्यापार अन्नमहामंडळाने आपल्या हाती घ्यावा. समितीच्या सुसंबद्ध अन्नधोरणाप्रमाणे राज्याराज्यांतील धान्यांचा व्यापार म्हणजे वाहतूक राष्ट्रीय अन्नसंकल्पानुसार करावायची आहे, हे सांगितलेच आहे. याचा अर्थ असा की, राज्याराज्यांतील अन्नधान्यांचा व्यापार अन्नमहामंडळाकडे सोपविला आणि त्याला व्यापार असे नाव दिले तरी प्रत्यक्षतः राष्ट्रीय अन्नसंकल्पानुसार करावयाच्या वाहतुकीखेरीज त्यात व्यापाराचा भाग फारच थोडा असणार हे स्पष्ट आहे. थोडक्यात सांगावयाचे तर अेकदा राष्ट्रीय अन्नसंकल्पाची अंमलबजावणी सुरू झाली म्हणजे राज्यसरकारमार्फत अन्नधान्यांची राज्याराज्यातील वाहतूक करणारी अेक वाहतूक संस्था अेवढेच अन्नमहामंडळाचे स्वरूप राहाते. याखेरीज प्रत्येक राज्य सरकारच्या

धान्यवसुली धोरणाच्या चौकटीत राहून धान्यवसुली करण्याच्या कामीही अन्नमहामंडळाने मदत करावी अशी अपेक्षा आहे. अुदाहरणार्थ समितीने अशी शिफारस केली आहे की, ज्या राज्यांत अन्नधान्यांचा खासगी व्यापार चालू आहे तेथे अन्नमहामंडळालाही अेक व्यापारी संस्था म्हणून कार्य करण्यास परवानगी असावी. अर्थात् राज्या-राज्यांतील सर्व प्रकारच्या धान्यवाहतुकीवर राज्यसरकारांचे संपूर्ण नियंत्रण राहाणार असल्यामुळे अन्नमहामंडळाला केवळ राज्यांतर्गत व्यापार-व्यवहारच करिता येअील, हे अुघड आहे. समितीने अशीही शिफारस केली आहे की ज्या राज्यात राज्यसरकारने धान्यवसुलीचे काम अनेक संस्थांकडे सोपविले आहे अशा राज्यांत धान्यवसुलीसाठी राज्यसरकारचे प्रतिनिधी म्हणून अन्नमहामंडळाची नेमणूक त्या राज्यसरकारने करावी. अर्थातच अशी धान्यवसुली राज्यसरकारने ठरवून दिलेल्या भावांनुसारच करावी लागेल. ज्या राज्यांमध्ये सहकारी संस्थांमार्फत अेकाधिकार धान्यवसुली होत आहे तेथे अन्नमहामंडळाने अशा सहकारी संस्थांमार्फत कार्य करावे, असेही समितीने सुचविले आहे. त्याचा अर्थ असा की, अन्नमहामंडळाने सहकारी संस्थांना धान्यखरेदी व साठवणीकरिता आवश्यक ते द्रव्यसहाय्य द्यावे. थोडक्यात समितीची अशी सूचना आहे की अन्नमहामंडळाने राज्यसरकारांना त्यांच्या धान्यवसुलीच्या आणि धान्यवाटपाच्या कामात पुरेसे आर्थिक व कारभारविषयक सहाय्य द्यावे आणि अशा प्रकारे राज्यसरकारांची मर्जी संपादन करावी. शेवटी समितीने अशीही शिफारस केली आहे की, शिलकी धान्यसाठ्याच्या व्यवस्थेची जबाबदारी अन्नमहामंडळाकडे असावी. शिलकी साठे चांगल्या अवस्थेत ठेवण्याकरिता अर्थातच सतत जुने धान्य काढून त्याच्या जागी नवे धान्य भरावे लागेल. त्याकरिता अन्नमहामंडळाला दरसाल पुरेशी धान्यखरेदी व धान्यविक्री करावी लागेल. अन्नमहामंडळाची ही खरेदी-विक्रीही राज्यसरकारांच्या अेकूण धान्यवसुली व धान्य वाटपाच्या चौकटीत असली पाहिजे. यातून अनेक प्रश्न व अडचणी निर्माण होतील, याची समितीला कल्पना आहे. परंतु या अडचणींना कसे तोंड द्यावे याचा विचार समितीने न करिता त्याची जबाबदारी तिने सर्वस्वी अन्नमहामंडळ व राज्यसरकारे यांच्यावर सोपविली आहे. पुनश्च अधिकाधिक आर्थिक व कारभारविषयक सहाय्य देअून अन्नमहामंडळाने राज्यसरकारांची मर्जी संपादन करणे अेवढाच अेकमेव मार्ग दिसतो.

या मर्यादेत अन्नमहामंडळ जी काही कामगिरी करणार असेल ती असो. परंतु अन्नधान्यांच्या किंमती स्थिर करण्याकरिता सरकारने खुल्या बाजारात खरेदी-विक्री करावी ही जी मूळ कल्पना, तिला अनुसरून अन्नमहामंडळ कार्य करू शकणार

नाही, हे अुघड आहे. खरेदी-विक्री केव्हा, कोठे व कोणत्या भावाने करावयाची याबाबत निर्णयस्वातंत्र्य असल्याखेरीज खुल्या बाजारातील किंमतींना स्थैर्य देण्यास आवश्यक ती खरेदी-विक्री करणे कोणत्याही संघटनेला अशक्य आहे. त्यामुळे राष्ट्रीय अन्नसंकल्पाच्या चौकटीत काम करणारे आणि राज्यसरकारांच्या धान्यवसुली व धान्यवाटपाच्या धोरणावर व मर्जीवर अवलंबून असणारे अन्नमहामंडळ अन्नधान्यांच्या घाअूक बाजारात स्वतःचे प्रभावी स्थान निर्माण करून किंमतीना स्थैर्य आणण्याकरिता काही करू शकेल असा संभव दिसत नाही.

या सर्व विवेचनावरून हे लक्षात येअील की, कायद्याने अन्नधान्यांचे भाव नियंत्रित करण्याच्या आपल्या कल्पनेमुळे आणि खटपटीमुळे आजपावेतो आपल्याला धान्यव्यापाराच्या राष्ट्रीयीकरणाला प्रारंभ करता आलेला नाही आणि ज्यायोगे सरकारला किंवा अन्नमहामंडळासारख्या सरकारी व्यापारी संस्थेला अन्नधान्यांच्या किंमतीवर प्रभाव पाडता येअील असे बाजारातील हुकुमी स्थानही निर्माण करिता आलेले नाही. या संदर्भात जेव्हा आपण हुकुमी स्थान म्हणतो त्यावेळी सरकारच्या अधिसत्तेमुळे त्यास साहजिक प्राप्त असलेले स्थान आपल्याला अभिप्रेत नसते, तर खुल्या बाजारात व्यापार-व्यवहार करणारी अेक संस्था या नात्याने तिच्या खुल्या बाजारातील स्थानाचा आपण विचार करीत आहोत, हे स्पष्ट केले पाहिजे. या दृष्टीने पाहिल्यास खासगी व्यापाराच्या बरोबरीने धान्य व्यापारात अुतरू अिच्छिणाऱ्या सरकारला किंवा सरकारी व्यापारी संस्थेला जे हुकुमी व प्रभावी स्थान प्राप्त करून घ्यावयास हवे ते कायद्याच्या जोरावर काही धान्य सक्तीने वसूल करून आणि शिधावाटपाच्या किंवा स्वस्त धान्य दुकानांच्याद्वारे ते स्वस्त दरात विकून प्राप्त होण्यासारखे नाही. असे स्थान प्राप्त करून घ्यावयाचे तर बाजारातील खरेदी-विक्रीच्या अुलाढालीपैकी अधिकाधिक अुलाढाल आपल्या हाती घेण्याची खटपट असावयास हवी. सरकारचे खुल्या बाजारातील स्थान हे धान्यवसुलीच्या व धान्यवाटपाच्या नियंत्रित किंमती किती खाली आहेत, यावर अवलंबून नसून बाजारातील अेकून अुलाढालीपैकीं किती भाग सरकारच्या हाती राहातो, यावर अवलंबून राहाणार आहे. किंबहुना आपण पाहिल्याप्रमाणे धान्यवसुलीच्या व धान्य विक्रीच्या किंमती कमी ठेवून, निश्चित करून, त्यांना चिकटून राहाण्याच्या झटपटीमुळेच सरकारच्या सर्व अन्नधोरणावर खुल्या बाजाराचे दडपण येते. सरकारमार्फत करावयाची धान्यवसुली वा धान्यखरेदी यांचे प्रमाण घटत जाते. अेकूण बाजारातील अुलाढालीच्या मानाने सरकारमार्फत होणारी खरेदी विक्री कमी-कमी होत जाते, आणि परिणामतः खुल्या बाजारातील किंमतीना स्थैर्य देण्यात

सरकार निष्प्रभ ठरते. स्वस्त धान्य दुकान विषयक अभ्यास गटाने (१९६६) हा मुद्दा आग्रहपूर्वक मांडलेला आहे, किंबहुना या गटाने केलेल्या शिफारशी या मुद्यावरच आधारित आहेत. या बाबत त्याचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :-

'या पद्धतीने धान्य व्यापारावर जो काही परिणाम घढवून आणण्याची आपली अिच्छा आहे तो आपल्याजवळील धान्यसाठे केवळ कमी किमतीला विकण्याने घडून येणार नसून अेकूण बाजारातील अुलाढालीत आपला हिस्सा अधिकात अधिक केल्यानेच घडून येअु शकेल.' ही गोष्ट साधण्याकरिता प्रस्तुत अभ्यास गटाने धोरणविषयक दोन अुपाय सुचविले आहेत : पहिली गोष्ट अशी की, वाटपासाठी जास्तीत जास्त धान्य अुपलब्ध होअू शकेल अशी परिस्थिती निर्माण केली पाहिजे. दुसरी गोष्ट अशी की, वाटपाकरिता अुपलब्ध असलेला माल लक्षात घेअून आणि बाजारातील मागणी- पुरवठ्याची परिस्थिती अजमावूनच आपल्या जवळील साठ्यापेक्षा आपल्या मालाकरिता मागणी अधिक राहाणार नाही अशा धोरणानेच वाटपाचे भाव ठरविले पाहिजेत. ---- याकरिता 'वाजवी' किंमत म्हणजे ग्राहकाला परवडेल अशी अेक फार निश्चित, केव्हाही न बदलणारी किंमत ही कल्पना आपण सोडून दिली पाहिजे. सरकारी धान्यखरेदी व धान्यविक्री ही खुल्या बाजाराबरोबरीने चालू राहावयाची असेल तर सरकारी खरेदी-विक्रीच्या किंमती ग्राहकाभिमुख असता कामा नयेत किंवा अुत्पादनाभिमुखही असता कामा नये, त्या खुल्या बाजाराच्या नियमाला अनुसरून असावयास हव्यात.

'आमच्या म्हणण्याचा मुख्य भर असा की सरकारमार्फत होणारा धान्याच्या खरेदीविक्रीचा व्यवहार खुल्या बाजाराच्या बरोबरीने चालू राहावयाचा असेल आणि याबाबतची सरकारी यंत्रणा खुल्या बाजाराच्या दडपणाखाली मोडू द्यावयाची नसेल तर तिचे आजचे धर्मादाय किंवा कल्याणकारी स्वरूप सोडून देअून तिला अेका व्यापारी संस्थेचे स्वरूप दिले पाहिजे. धान्यांच्या किंमतीविषयक धोरणाच्या दृष्टीने याचा अर्थ असा होतो की, धान्यांची खरेदी-विक्री करणाऱ्या या सरकारी संस्थेने खुल्या बाजाराचे अेक अविभाज्य अंग असले पाहिजे. ही भूमिका न पत्करता खुल्या बाजारातील मागणी- पुरवठ्याच्या न्यायाने प्रस्थापित होणाऱ्या किंमती व्यतिरिक्त आपली स्वतःची व अधिक वाजवी अशी किंमत प्रस्थापित करण्याचा या यंत्रणेमार्फत प्रयत्न केला तर तिच्यावर खुल्या बाजाराचे दडपण येते व तिचे अस्तित्वच धोक्यात येते. आपले म्हणून वेगळे भाव हे या सरकारी व्यापारी संस्थेचे वैशिष्ट्य असू शकत नाही. बाजारातील व्यवहार सार्वजनिक हिताच्या दृष्टीने करणे, सट्टेबाजीच्या

व साठेबाजीच्या व्यवहारात न पडणे आणि आपल्याजवळील धान्यसाठा नियमित व सतत प्रमाणात किरकोळ बाजारात आणणे, ही तिची वैशिष्ट्ये असावयास हवीत. या पद्धतीने खुल्या बाजारात व्यवहार करणारी सरकारी व्यापारी संस्था या बाजारातील अितर सट्टेबाज व साठेबाज प्रवृत्तींवर निश्चित नियंत्रण ठेअू शकेल. परंतु याबाबतची तिची शक्ती ही ती खुल्या बाजारातील खरेदी-विक्रीच्या अुलाढालीत तेवढ्या प्रमाणात भाग घेअू शकले, यावर अवलंबून राहील. म्हणून बाजारातील अुलाढालीवर अधिकाधिक प्रमाणात आपले अधिपत्य प्रस्थापित करणे हे या सरकारी व्यापारी संस्थेचे प्रमुख अुद्दिष्ट असावयास हवे.

हा प्रश्न महत्वाचा आहे, म्हणून सरकार किंवा अेखादी सरकारी व्यापारी संस्था बाजारातील अुलाढालीत आपला भाग अधिकाधिक वाढवून अेकूण बाजारावर आपले अधिपत्य कसे प्रस्थापित करू शकेल याचा आपण शोध घेतला पाहिजे. सध्याच्या धोरणानुसार सरकारची किंवा सरकारी व्यापारी संस्थेची अडचण अशी आहे की त्यांना अेका अगाअू निश्चित केलेल्या भावानेच बाजारात धान्य खरेदी करिता येते, आणि खुषीने बाजारात पुरेशी धान्य खरेदी होअू शकली नाही तर अेकाधिकार धान्यखरेदी, अुत्पादकाकडून अथवा व्यापाऱ्याकडून करावयाची सक्तीची वसुली अशा सारख्या या-ना-त्या सक्तीच्या अुपायांचा अवलंब करावा लागतो. ज्यावेळी किंमती वाढत असतात त्यावेळी अशा प्रकारच्या अुपायामुळे साहजिकच अुत्पादकांचा विरोध वाढतो आणि त्याचा परिणाम धान्यवसुलीवर होतो. कालांतराने या परिस्थितीचा धान्याच्या अुत्पादनावरही प्रतिकूल परिणाम झाल्याखेरीज राहात नाही. याला पर्याय असा की, सरकारने खुल्या बाजारात बाजारभावाने धान्य खरेदी करावयाचे, अन्नधान्य धोरण समिती (१९६६) हा पर्याय सुचवत नाही. कारण समिती म्हणते त्याप्रमाणे अशी खरेदी केल्याने बाजाराच्या अर्थव्यवस्थेला फारसा धक्का लागणार नाही, हे खरे, परंतु त्यामुळे बाजारभाव गैरवाजवी वाढतील हे लक्षात घेतले पाहिजे. खासगी व्यापाऱ्यांशी स्पर्धा करून सरकार जेव्हा खरेदीदार या नात्याने धान्य बाजारात अुतरते तेव्हा बाजारातील आपले स्थान टिकविण्याकरिता खासगी व्यापारी चढाओढीने धान्यांच्या किंमती वाढवितील, हे अुघड आहे. शिवाय हेही लक्षात घेतले पाहिजे की अनेक लहान-लहान खरेदीदारांअैवजी जेव्हा अेखादा मोठा खरेदीदार माल खरेदी करू लागतो तेव्हा मालाचे भाव वाढण्यास अधिकच जोराची चालना मिळते. तात्पर्य, सरकारने खुल्या बाजारात बाजारभावाने धान्य खरेदी करण्याचे ठरविले तर सरकारला अितक्या चढत्या भावाने धान्य खरेदी करावे

लागेल की धान्यांचे भाव रोखून धरणे किंवा गरीब जनतेसह सर्वांस योग्य प्रमाणात धान्य अुपलब्ध करून देणे ही अन्नधोरणाची दोन्ही अुद्दिष्टे साध्य होअू शकणार नाहीत.' हा मुद्दा अर्थातच सर्वांना मान्य होण्यासारखा आहे.

तथापि, खुद्द बाजाराच्या स्पर्धेत न अुतरताही सरकारला बाजारभावाने धान्य खरेदी करिता येअील अशी अेक पद्धत अुपलब्ध आहे. तिला अग्रक्रमाधिकार खरेदी, म्हणजेच ठरलेल्या बाजारभावाने खरेदीचा अग्रहक्क असे म्हणतात. या पद्धतीचा पंजाबमध्ये यशस्वीपणे वापर करण्यात आला आहे. या पद्धतीत सरकार किंवा सरकारी व्यापारी संस्था बाजारातील स्पर्धेत अुतरत नाहीत, आणि त्यामुळे बाजारातील भाव ठरविण्याच्याबाबतीत प्रत्यक्ष मात्र घेत नाहीत. बाजारभाव ठरतात ते नेहमीप्रमाणे चढाओढीने लिलाव वा सौदे यांच्याद्वारे ठरतात. परंतु अेकदा भाव ठरला आणि अेखादा सौदा निश्चित झाला की ठरलेला भाव योग्य वाटल्यास सरकार खरेदीचा अग्रहक्क वापरून सौद्यात ठरलेला माल ठरलेल्या भावाने खरेदी करू शकते. बाजारभाव ठरताना सरकार किंवा खरेदीदारांची चढाओढ नसल्याने अशा चढाओढीमुळे जी भाववाढ झाली असती ती या पद्धतीत होत नाही आणि चालू बाजारभावाने अुत्पादकाकडून जास्तीत जास्त किंवा निदान आवश्यक तेवढा माल खरेदी करणे सरकारला शक्य होते. अशा रीतीने सरकार किंवा सरकारी व्यापारी संस्था खुल्या बाजारातील अेक सामान्य घटक म्हणून कार्य करू शकतील. सरकारला अेक व्यापारी संस्था म्हणून बाजारात आपले अधिपत्य प्रस्थापित करावयाचे असेल तर आवश्यक अट म्हणून स्वस्त धान्य दुकानांसंबंधीच्या अभ्यासगटाने (१९६६) याच गोष्टीचा अुल्लेख केला होता.

खरेदीच्या या अग्रक्रमाधिकार पद्धतीचा पंजाबात यशस्वी वापर करण्यात आला आहे. ती यशस्वी व्हावयाची तर काही अनिवार्य अटी आहेत. मुख्य म्हणजे संबंधित अन्नधान्यांची बाजारपेठ सुसंघटित आणि सुनियंत्रित असावयास हवी. ही बाजारपेठ अितकी मोठी असली पाहिजे की स्पर्धात्मक लिलावाच्या किंवा सौद्याच्या आधारप्रक्रियेतून सार्वजनिकरीत्या मोठ्या प्रमाणात धान्याचे बाजारभाव निश्चित होतील. पंजाबमधील गव्हाच्या बाजारपेठा अशा तऱ्हेच्या आहेत. अितर बहुतेक राज्यांत व अितर धान्यांच्याबाबतीत बाजारपेठा पुरेशा मोठ्या तरी नाहीत किंवा अितक्या सुसंघटित व सुनियंत्रित तरी नाहीत. भाताचा पुष्कळसा व्यापार सरळ अुत्पादक व भाताच्या गिरण्यांचे मालक यांच्यातच होतो, आणि फारच थोडा व्यवहार संघटित बाजारात सार्वजनिकरीत्या ठरलेल्या किंमतीनुसार होतो. म्हणून

सरकारने अथवा सरकारी व्यापारसंस्थेने बाजारात प्रवेश करून अन्नधान्यांच्या किंमतींना काही स्थैर्य आणण्याची खटपट करावी अशी आपली अिच्छा असेल तर त्या करिता देशातील अन्नधान्यांच्या बाजारपेठांची पुनर्घटना करून त्या सुसंघटित व सुनियंत्रित करणे आवश्यक आहे. या पुनर्घटनेचा अुद्देश हा असावयास हवा की, देशभर स्पर्धात्मक परंतु जाहीर व्यापारप्रक्रियांच्याद्वारे दररोज अन्नधान्यांचे बाजारभाव प्रस्थापित व्हावेत. असे झाले तरच सरकारला किंवा सरकारी व्यापारी संस्थेला बाजारात अुतरून आपल्या अग्रक्रमाधिकाराचा वापर करून बाजारपेठेच्या नेहमीच्या व्यवहारांना गैरवाजवी धक्का न देता ठरलेल्या बाजारभावाने मोठ्या प्रमाणात धान्य खरेदी करिता येअील. अशा प्रकारे आवश्यक तेवढी धान्य खरेदी केल्यानंतर खरेदी केलेले धान्य योग्य पद्धतीने व योग्य वेळी बाजारात विक्रीला काढून सरकार किंवा सरकारी व्यापारी संस्था अन्नधान्यांच्या किंमतींना स्थैर्य देअू शकतील.

वर अुल्लेखिलेल्या अुद्देशाने धान्यांच्या बाजारपेठांची पुनर्घटना करण्यात आली आणि त्याचबरोबर संपूर्ण देशात परिणामकारकपणे अन्नधान्यांचा अेकसूत्री बाजार प्रस्थापित झाला तर देशातील अन्नधान्यांच्या किंमतींत स्थैर्य निर्माण करणे पुष्कळच सोपे जाअील. मी पूर्वी सांगितल्याप्रमाणे धान्यभावांतील अस्थिरतेचे मूळ कारण असे की वर्षभरात व सालोसाल बाजारात होणारी धान्याची आवक सतत बदलत असते. आता हे सहज लक्षात येअील की आपण सर्व धान्ये व संपूर्ण देश यांचा अेकत्रित विचार केला तर बाजारात होणाऱ्या धान्याच्या आवकेत होणारे फरक त्या मानाने कमी राहातील. देशाच्या वेगवेगळ्या भागातील वेगवेगळ्या धान्यांच्या सुगीचे दिवस वर्षामध्ये वेगवेगळे असतात. त्यामुळे सबंध देशाचा विचार करता धान्यांचा बाजारात होणारा पुरवठा अेखाद्या लहानशा प्रदेशातील अेखाद्याला विशिष्ट धान्याच्या पुरवठ्याच्या मानाने वर्षभर खूपच समानपणे विभागलेला असतो. सालोसाल धान्याच्या पुरवठ्यात जो कमी-अधिकपणा होतो त्याही बाबतीत हे खरे आहे. हवामान व पाऊसपाणी यांच्यातील फेरबदलांचा परिणाम सर्व पिकांवर व देशाच्या सर्व भागांवर सारख्याच प्रमाणात होत नाही. त्यामुळे अेखादा लहानशा भागातील अेखाद्या विशिष्ट धान्याच्या अुत्पादनात सालोसाल जे फरक होतात त्यामानाने सबंध देशातील सर्व अन्नधान्यांच्या अेकूण अुत्पादनात कमी फरक होतात. यामुळे सबंध देशाच्या धान्यबाजारात परिणामकारक अेकसूत्रता निर्माण करता आली तर केवळ त्यानेदेखील अन्नधान्यांच्या किंमतीत स्थैर्य निर्माण करण्याच्या कामी पुष्कळच मदत होअील. स्वातंत्र्यपूर्वकाळात देशातील धान्य बाजारात अशी अेकसूत्रता निर्माण होअू शकली

नाही, याचे कारण वाहतूक व दळणवळणाच्या सोयी अपुऱ्या होत्या आणि ठिकठिकाणच्या बाजारपेठांतील परिस्थिती व तेथील चालू बाजारभाव यासंबंधीची माहितीही सर्वत्र तत्परतेने प्रसृत होत नव्हती. स्वातंत्र्यानंतर गेल्या पंधरा-वीस वर्षात बाजारात पुष्कळच सुधारणा झालेली आहे. परंतु याच काळात धान्य विषयक परिस्थिती अधिकाधिक बिकट होत गेल्याने आपणांस बाजार व्यवहारावर नाना प्रकारची बंधने वेळोवेळी व वारंवार घालावी लागली. त्यामुळे अन्नधान्यांच्या बाबतीत संपूर्ण देशभर अेक परिणामकारक, अेकसूत्री बाजारपेठ निर्माण होअू शकली नाही.

हा मुद्दा मान्य असेल तर प्रत्येक राज्यसरकारचा राज्याराज्यांतील धान्यांच्या ने-आणीवर प्रतिबंध घालण्याचा अधिकार आज आपण निरूपायाने, व्यावहारिक शहाणपणा म्हणून मान्य केला तरी त्याचा वाढता वापर चिंताजनकच समजावा लागेल. यात राष्ट्रीय अेकात्मतेला असलेला सुप्त धोका आज आपण नजरेआड केला तरी धान्यबाजारावर होणाऱ्या त्याच्या तात्कालिक व दीर्घकालीन परिणामासंबंधी आपण सावध राहिले पाहिजे. राज्याराज्यांतील धान्यांच्या ने-आणीवरील प्रतिबंधाचा तत्काळ होणारा परिणाम म्हणजे बाजारभावातील वाढती विषमता आणि अस्थिरता हा होय. अन्नधान्य धोरण समितीला याची जाणीव आहे. समिती म्हणते, धान्यांच्या राज्याराज्यांतील वाहतुकीवर १९६४-६५ व १९६५-६६ या काळात राज्यसरकारांनी जे निर्बंध घातले त्याविरुद्ध महत्त्वाचा आक्षेप असा आहे की त्यांमुळे राज्याराज्यांतील धान्य किंमतींमध्ये असलेली विषमता वाढण्यास मदत झाली आहे. तुटीच्या राज्यांत असणाऱ्या बाजाराभावांपेक्षा शिलकी राज्यांतील धान्य भाव खूपच खाली राहिले आहेत. ही गोष्ट शिलकी राज्यांतील अुत्पादक किंवा तुटीच्या राज्यांतील ग्राहक या दोघांच्याही हिताची नाही.' तथापि, समितीला असे वाटत असावे की तिने सुचविलेल्या राष्ट्रीय अन्नसंकल्पानुसार राज्याराज्यांत धान्यवाहतूक होअू लागली तर ही परिस्थिती सुधारेल. राष्ट्रीय अन्नसंकल्प कसा तयार केला जाअील व त्याची अंमलबजावणी कशी होअील याचे वर्णन मी वर केलेच आहे. त्यावरून राज्याराज्यातील धान्यव्यापारावर घालण्यात आलेल्या निर्बंधाची भरपायी राष्ट्रीय अन्नसंकल्पाच्या नियंत्रणाखाली होणाऱ्या धान्यवाहतुकीने होअू शकेल असे वाटत नाही. शिवाय वेळोवेळी राष्ट्रीय अन्नसंकल्पावर ज्या पद्धतीने चर्चा, विचार, फेरविचार अित्यादी होतील त्यायोगे धान्यविषयक परिस्थिती अधिकच अनिश्चित व अस्थिर होअील, आणि प्रत्येक राज्यातील व्यापारी त्याचा गैरफायदा घेतल्याशिवाय राहाणार नाहीत. अन्नधान्यांच्या राज्याराज्यांतील व्यापारावरील निर्बंधाचे हे तात्कालिक परिणाम

आहेत. आपली अन्नसमस्या दीर्घकालीन असल्याने आपले सध्याचे धोरण असेच चालू ठेवले तर हे निर्बंधही बराच काळ चालू राहाणे अपरिहार्य दिसते. असे झाले तर देशातील धान्यांची बाजारपेठ विस्कळित होअील आणि त्यामुळे देशाच्या अेकूण शेतीविकासावर विपरीत परिणाम झाल्याखेरीज राहाणार नाही.

या सर्व विवेचनाचा सारांश असा : अन्नधान्यांच्या किंमतींमध्ये स्थैर्य आणावयाचे असेल तर सबंध देशात अन्नधान्यांची अशी अेक सुसंबद्ध, अेकसूत्री बाजारपेठ प्रस्थापित झाली पाहिजे की जिच्याद्वारे खुल्या स्पर्धात्मक बाजाराच्या व्यवहारानुसार धान्यांचे बाजारभाव रोजच्या रोज ठरतील. या करता अन्नधान्यांच्या बाजाराची पुनर्घटना करावी लागेल. या पुनर्घटनेत धान्य बाजारावर अेक राष्ट्रीय किंवा सामाजिक नियंत्रण प्रस्थापित करावे लागेल. परंतु त्या बरोबर बाजाराच्या व्यापारी तत्त्वाने चालणारा बाजारव्यवहार अबाधित राहिला पाहिजे. याचा अर्थ असा की, धान्य बाजारातील बाजारव्यवहार राष्ट्रीय किंवा सामाजिक नियंत्रणाखाली परंतु त्याचबरोबर अनेक विकेंद्रित व्यापारी संस्थांच्या मार्फत चालला पाहिजे. या संस्था बाजारव्यवहार व त्यासंबंधीचे व्यापारी निर्णय याबाबतीत संपूर्णपणे स्वतंत्र व स्वायत्त असावयास हव्यात. परंतु त्याचबरोबर त्यांची ही स्वायत्ता अबाधित ठेवून काही प्रमाणात त्यांच्यावर राष्ट्रीय अथवा सामाजिक नियंत्रण असावयास हवे. ही अुद्दिष्टे नजरेसमोर ठेवून आता मी देशातील अन्नधान्यांच्या बाजारपेठेची पुनर्घटना करण्याच्या दृष्टीने काही सूचना मांडतो.

वर सांगितल्याप्रमाणे काही प्रमाणात राष्ट्रीय वा सामाजिक नियंत्रण राहू शकेल अशी, परंतु त्याचबरोबर पुरेशी विकेंद्रित आणि व्यापारी व्यवहारात पूर्णपणे स्वायत्त अशी व्यापारी संघटना अन्नधान्यांच्या बाजारपेठेत अुभी करणे हे आपले अुद्दिष्ट असल्याने अशोक मेहता समितीने सुचविल्याप्रमाणे अेखादी केंद्रीय 'अन्नधान्य स्थिरीकरण संघटना' किंवा दोन वर्षापूर्वी प्रस्थापित झालेले 'भारतीय अन्नमहामंडळ' यासारखी अेखादी केंद्रीय व अखिल भारतीय संघटना स्थापन करून या कामास प्रारंभ करणे युक्त होणार नाही. आपल्याला अभिप्रेत असलेल्या संघटनेचा खालपासून विचार करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने जिल्हा हा अेक सोयीचा घटक दिसतो.

या कारणाने अन्नधान्याच्या बाजारपेठेची जी पुनर्घटना करावयाची त्याकरिता जिल्हा हा घटक मानला तर धान्याच्या व्यापाराचे दोन भाग पडतात. पहिला जिल्हांतर्गत म्हणजे जिल्ह्यातल्या जिल्ह्यात होणारा व्यापार व दुसरा जिल्ह्या-जिल्ह्यातील व्यापार. जिल्ह्यातल्या जिल्ह्यात होणाऱ्या धान्याच्या व्यापाराचे स्वरूप बहुतांशी

अुत्पादकांकडून थेट गिऱ्हाअिकांना किंवा अुत्पादकांकडून किरकोळ दुकानदारांमार्फत गिऱ्हाअिकांना होणारी धान्याची विक्री असे असते. अशा प्रकारचा बहुतेक व्यापार खेड्याखेड्यांतून किंवा लहान असंघटित आठवड्याच्या बाजारांतून चालतो. अशा बाजारांतील अधिकांश देव-घेव प्रत्यक्षपणे लहान अुत्पादक व ग्राहक यांच्यात किंवा लहान व्यापारी व ग्राहक यांच्यात होत असते. धान्यांच्या अनेक जाती व प्रती स्थानिक लोकांना ज्ञात व मान्य असतात आणि त्यांची बाजारपेठ साहजिकच स्थानिक स्वरूपाची असते. धान्यांच्या सर्वमान्य जाती व प्रती निश्चित करून अखिल भारतीय बाजारपेठेत त्या प्रस्थापित करणे आणि अशा रीतीने धान्याच्या अखिल भारतीय बाजारपेठेत अेकसूत्रीपणा आणणे, या दृष्टीने वर सांगितलेल्या प्रकारच्या स्थानिक व असंघटित बाजारांत ढवळाढवळ न करणे हेच अिष्ट ठरेल. शिवाय अखिल भारतीय बाजारपेठेची जी पुनर्घटना करावयाची ती सुकर होण्याच्या दृष्टीनेही वर सांगितलेला जिल्हातर्गंत व्यापार आहे असाच, निदान काही काळ तरी, चालू ठेवणे योग्य होअील. म्हणून माझी सूचना अशी की, प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्ह्यातल्या जिल्ह्यात होणारा धान्यांचा व्यापार पूर्णपणे खुला असावा. म्हणजे असे की, जिल्ह्याच्या सीमेत कोणालाही कोणाकडूनही वाटेल तेवढ्या प्रमाणात व वाटेल त्या किमतीला कोणतेही अन्नधान्य खरेदी वा विक्री करण्याची पूर्ण मुभा असावी.

आता जिल्ह्या-जिल्ह्यांतील व्यापाराचा विचार करू. हा धान्य व्यापार मोठ्या प्रमाणात चालणारा आणि साहजिकच संघटित स्वरूपाचा असतो. याचीच प्रथम पुनर्घटना करणे आवश्यक आहे. या व्यापारावर आवश्यक ते राष्ट्रीय वा सामाजिक नियंत्रण प्रस्थापित करण्याच्या हेतून माझी अशी सूचना आहे की आपण प्रत्येक जिल्ह्याकरिता अेका अन्नधान्य खरेदी-विक्री संघाची स्थापना करावी. या संघाला जिल्ह्याजिल्ह्यात होणाऱ्या धान्य व्यापाराबाबत अेकाधिकार असावा. म्हणजेच, दोन जिल्ह्यांत होणारा धान्याचा व्यापार त्या जिल्ह्यांच्या खरेदी-विक्री संघामार्फतच व्हावा. या संबंधी अधिक खुलासा मी नंतर करणार आहे. प्रथम अशा संघाची घटना काय असावी याचा विचार करू. राष्ट्रीय नियंत्रणाच्या दृष्टीने हे संघ म्हणजे कायद्याने प्रस्थापित झालेल्या संस्था असावयास हव्यात, हे अुघडच आहे. शेतीस धरून करावयाच्या ग्रामीण अर्थरचनेच्या अंतिम अुद्दिष्टाच्या दृष्टीने या संस्था जिल्ह्यातील अन्नधान्य अुत्पादकांच्या सहकारी संस्था असाव्यात हेही स्पष्ट आहे. म्हणून ज्या जिल्ह्यांत कार्यक्षम सहकारी खरेदी-विक्री संस्था विद्यमान असतील तेथे अशा सहकारी संस्थानाच जिल्हा अन्नधान्य खरेदी-विक्री संघ म्हणून मान्यता देता येअील.

परंतु आपल्या तात्कालिक अुद्दिष्टाच्या दृष्टीने अशा तऱ्हेच्या सहकारी संस्था अगदी अपरिहार्य नाहीत. म्हणून ज्या जिल्ह्यांत सहकारी खरेदी विक्री संस्था कार्यरत नसतील किंवा अस्तित्वातही नसतील आणि अशा संस्था ताबडतोब स्थापण्याची शक्यता नसेल तेथे जिल्ह्यातील अन्नधान्यांचे व्यापारी, भात गिरण्यांचे मालक अित्यादींचे प्रातिनिधिक असे संघ स्थापन करावेत, आणि त्यांना जिल्हा अन्नधान्य खरेदी–विक्री संघ म्हणून मान्यता द्यावी. जिल्ह्यातील अन्नधान्य अुत्पादकांना अशा संघांचे सभासद होण्याची सोय असावी. म्हणजे यथाकाल जिल्ह्यातील धान्य अुत्पादकांचेही प्रतिनिधित्व या संघांत होअू शकेल. या साऱ्या तपशिलाच्या बाबी आहेत. आणि साहजिकच त्यांचा अधिक काळजीपूर्वक विचार करावा लागेल. मुख्य हेतू हा असावयास हवा की, प्रत्येक जिल्ह्यात कायद्याने प्रस्थापित अेक अन्नधान्य खरेदी–विक्री संघ स्थापन करण्यात यावा, आणि या संघात जिल्ह्यातील अन्नधान्य अुत्पादकांचे किंवा धान्य व्यापारी व अुत्पादक या दोहोंचेही प्रतिनिधित्व असावे.

वर सांगितल्याप्रमाणे खरेदी–विक्रीच्या व्यापारी व्यवहाराबाबत हे संघ पूर्णपणे स्वायत्त व स्वतंत्र असावयास हवेत. परंतु त्याचबरोबर त्यांची ही स्वायतत्ता अबाधित ठेवून त्यांच्या व्यवहारावर प्रत्यताप्रत्यक्ष राष्ट्रीय नियंत्रण ठेवावे लागेल. या हेतूने माझ्या दोन सूचना अशा की, या संघांवर जिल्ह्यातील पंचायत राज्य संस्थांना थोडेसे परंतु योग्य प्रतिनिधित्व देण्यात यावे. आणि या संघांचे मुख्य प्रशासन अधिकारी व मुख्य हिशेबनीस त्या–त्या राज्य सरकारांचे नोकर असावेत. या संघांत पंचायत राज्य संस्थांना प्रतिनिधित्व दिल्याने या संघांचे व्यापार–व्यवहार आणि जिल्ह्यातील शेती–विकासाचा कार्यक्रम यांचा मेळ घालता येअील. संघांचे मुख्य प्रशासन अधिकारी राज्य सरकारांचे नोकर असले तरी ते संघांचे प्रशासन अधिकारी म्हणून काम करीत असताना ते त्या संघांचे चिटणीस म्हणून काम करतील आणि संघांच्या सर्व निर्णयांची परिणामकारकपणे अंमलबजावणी करणे हे त्यांचे कर्तव्य व जबाबदारी राहील. ते राज्य सरकारांचे नोकर असण्याचा अुपयोग अेवढाच की संघ त्यांना नोकरीतून बडतर्फ करू शकणार नाहीत आणि म्हणून त्यांच्यावर अनुचित दडपणही आणू शकणार नाहीत. फार झाले तर अेखाद्या संघाला राज्य सरकारकडे अशी मागणी करिता येअील की त्याने अेका अधिकाऱ्याला परत बोलावून त्याच्या जागी दुसरा अधिकारी द्यावा. हे झाले तरी मुख्य फायदा असा होअील की संघांचे सर्व निर्णय जाहीरपणे व कायदेशीरपणे घेतले जातील, आणि त्यांची जाहीर चर्चा होअू शकेल. त्याचप्रमाणे या संघांचे मुख्य हिशेबनीसही राज्य सरकारांचे नोकर असले म्हणजे

संघांचे हिशेबही अधिक चोख ठेवण्यास मदत होओील. हे संघ म्हणजे कायद्याने प्रस्थापित संस्था असल्यामुळे साहजिकच त्यांचे आर्थिक हिशेब त्या-त्या राज्य सरकारांच्या हिशेब तपासनीसांकडून तपासले जातील. त्यामुळे या संघांवर अेक प्रकारचे सरकारी नियंत्रण राहील. असे नियंत्रण राहाणे आवश्यक आहे. यापेक्षा अधिक नियंत्रण असणे अिष्ट आहे असे मला वाटत नाही.

आता या संघांचे कार्यक्षेत्र व कार्यपद्धती यासंबंधी विचार करू. मी वर सांगितल्याप्रमाणे या संघांना जिल्ह्या-जिल्ह्यामधील अन्नधान्य-व्यापाराबाबत अेकाधिकार राहील. या ठिकाणी हे स्पष्ट केले पाहिजे की आज काही राज्यांत विद्यमान असलेल्या अेकाधिकार खरेदी पद्धतीहून ही कल्पना वेगळी आहे. जिल्हा अन्नधान्य खरेदी-विक्री संघाच्या योजनेत या संघांना त्यांच्या त्यांच्या जिल्ह्यांमध्ये धान्यखरेदीबाबत अेकाधिकार तर नव्हेच परंतु कोणतेही विशेष अधिकार असणार नाहीत. या संघांना आपली धान्य खरेदी खुल्या बाजारात अुत्पादक किंवा व्यापारी यांच्याकडूनच करावी लागेल. संघांना अेकाधिकार राहील तो केवळ जिल्ह्यातून धान्य निर्यात करण्याच्याबाबतीतच राहील. कोणत्याही जिल्ह्यातून धान्य बाहेर पाठविण्याचा अधिकार या संघांनाच असेल. त्याचप्रमाणे जिल्ह्यामध्ये विक्री करण्याबाबतही या संघांना अेकाधिकार किंवा विशेषाधिकार राहाणार नाहीत. हे संघ आपापल्या जिल्ह्यांत किरकोळ व्यापाऱ्यांना किंवा ग्राहकांना अन्नधान्ये विकू शकतील. मात्र अशा तऱ्हेची विक्री त्यांना खुल्या बाजारातच करावी लागेल. संघांना अेकाधिकार राहील तो केवळ बाहेरून जिल्ह्यात अन्नधान्य आणण्याबाबत. फक्त जिल्हा संघच आपल्या जिल्ह्याच्याबाहेर धान्य खरेदी करून ते जिल्ह्यात आणू शकेल. केवळ याच अर्थाने जिल्ह्या-जिल्ह्यातील व्यापाराबाबत जिल्हा अन्नधान्य खरेदीविक्री संघांना अेकाधिकार राहील. हे संघच जिल्ह्यातून धान्य बाहेर पाठवू शकतील किंवा दुसऱ्या जिल्ह्यांतून आपल्या जिल्ह्यांत आणू शकतील.

अशा प्रकारे जिल्ह्याजिल्ह्यांतील धान्य व्यापार देशातील सुमारे ३००-३५० जिल्हा संघांमार्फतच होअू शकेल. जिल्हा संघातील या परस्पर व्यापारावर कोणतेही निर्बंध असणार नाहीत. जिल्हा संघांना आपल्यापैकी कोणालाही कोणतीही धान्ये कितीही प्रमाणात आणि कोणत्याही किमतीला विकता येतील वा कोणाकडूनही विकत घेता येतील. खरेदी-विक्रीचे असे सर्व व्यवहार खुल्या बाजारातील व्यापारी पद्धतीने सौदे ठरवून किंवा आवश्यक ते धान्य पुरविण्यासाठी मोहरबंद टेंडरे मागवून होअू शकतील. जिल्हा संघांमध्ये होणाऱ्या खरेदी-विक्रीच्या अशा सर्व व्यवहारांना

ताबडतोब प्रसिद्धी मिळावी. कोणत्या प्रकारचे, काय प्रतीचे, किती धान्य, कोठे, कोणत्या किमतीला विकण्यात आले अित्यादी सर्व तपशील अशा प्रकटनात असावा. जिल्हा-संघांत होणाऱ्या अशा खुल्या व जाहीर व्यापारी व्यवहारानेच सबंध देशात अेक परिणामकारक, अेकसूत्री धान्यांची व्यापारपेठ निर्माण होअू शकेल आणि खुल्या बाजारातील व्यवहारांनुसार अन्नधान्यांचे बाजारभाव रोजच्या रोज ठरत जातील. हे बाजारभाव रोजच्या रोज जाहीर होतील, आणि या भावांनुसार होणारे व्यवहार पोकळ किंवा बनावट नाहीत हे पाहाण्याकरिता अशा सर्व व्यवहारांवर वर सांगितल्याप्रमाणे काही प्रमाणात सामाजिक नियंत्रण व सरकारी हिशेबतपासणी यांचा अंकुश राहील.

या बाबतीत सुरूवात करण्याच्या दृष्टीने जिल्हानिहाय अन्नधान्य खरेदी-विक्री संघ स्थापन करणे सोयीचे होअील. परंतु असे संघ जिल्हानिहायच स्थापन केले पाहिजेत असे नाही. मोठ्या जिल्ह्यांचे किंवा धान्य व्यापाराच्या दृष्टीने महत्वाच्या जिल्ह्यांचे बाजाराच्या दृष्टीने किंवा अधिक विभाग पाडून अशा प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र अन्नधान्य खरेदीविक्री संघ स्थापन करणेही युक्त होअील. असे केल्यास जिल्ह्या-जिल्ह्यांत व्यापार करू शकतील अशा व्यापारी संघांची संख्या अधिक होअील. परंतु त्यास हरकत नाही. अशा संघांची संख्या हजार किंवा दोन हजार झाली तरीही त्यात वावगे नाही.

जिल्हाजिल्ह्यात होणाऱ्या व्यापाराबाबत जिल्हा संघांना दिलेल्या अेकाधिकाराची अंमलबजावणी आणि विशेषतः जिल्ह्याजिल्ह्यात होणारी अनधिकृत धान्य वाहतूक थांबविण्याचे अुपाय, यासंबंधी येथे थोडा खुलासा करणे आवश्यक आहे. पहिली गोष्ट अशी की जिल्ह्याजिल्ह्यातील सर्व व्यापार नेहमीच्या खुल्या व्यापारी पद्धतीने होणार असल्यामुळे आणि जिल्हा संघांना जिल्ह्यातील अंतर्गत व्यापाराबाबत कोणतेही विशेष अधिकार नसल्यामुळे जिल्ह्याजिल्ह्यात अनधिकृत धान्य वाहतूक करण्याकरिता आर्थिकदृष्ट्या प्रबळ कारण अथवा आकर्षण अुरत नाही. दुसरी गोष्ट अशी की, जिल्हा संघ हे जिल्ह्यातील धान्य व्यापारी व अुत्पादक यांच्या प्रातिनिधिक संघटना असल्यामुळे वैयक्तिक खासगी व्यापाऱ्यांना अशा प्रकारचा अनधिकृत व्यापार चालू ठेवणे अवघड होअील. तिसरी गोष्ट अशी की या सर्व बाबतीत आवश्यक, अतिरेकी काटेकोरपणा पाळण्याची गरज नाही. सामान्यतः शेजारच्या जिल्ह्याशी असंघटित स्वरूपाचा थोडाफार धान्य व्यापार नेहमी चालूच असतो. जिल्ह्यांच्या सरहद्दीवर पोलिस बंदोबस्त ठेवून असा किरकोळ असंघटित व्यापार थांबविण्याची गरज नाही.

अन्नधान्यांच्या व्यापाराची पुनर्घटना करण्याच्या दृष्टीने गरज आहे ती अेवढीच की, अन्नधान्यांच्या संघटित व्यापारावर काही प्रमाणात सामाजिक नियंत्रण ठेवता आले पाहिजे. या दृष्टीने, प्रस्थापित केलेल्या जिल्हा संघांचे अेकाधिकार सुरक्षित ठेवण्याकरिता ट्रक किंवा रेल्वे यांतून होणाऱ्या धान्य वाहतुकीवर निर्बंध ठेवून अनधिकृत वाहतुकीला आळा घातला तरी ते पुरेसे होअील. हे करणे अशक्य आहे, असे मला वाटत नाही.

अन्नधान्यांच्या बाजारपेठेची अशा प्रकारे पुनर्घटना केली तर तिच्यावर योग्य ते नियंत्रण ठेवणे सरकारला शक्य होअील आणि आवश्यक तेव्हा तिच्यात सहभागीही होता येअील. मी वर सांगितल्याप्रमाणे सरकारने हे नियंत्रण व सहकार्य अशा प्रकारे करावयास हवे की ज्यायोगे बाजारपेठेच्या नेहमीच्या कार्यपद्धती आणि विशेषतः बाजारपेठेच्या ज्या व्यवहारांतून बाजाराभाव ठरतात ते व्यवहार अबाधित राहातील. आपण वर पाहिल्याप्रमाणे सरकारने अग्रक्रमाधिकाराने बाजारात धान्य खरेदी केली तर बाजार व्यवहाराला धक्का न लावताही सरकारला आवश्यक तेवढे धान्य हस्तगत करिता येअील. या दृष्टीने मी असे सुचवितो की सरकारने जिल्हा अन्नधान्य खरेदी-विक्री संघांच्या आपसांत म्हणजे जिल्ह्याजिल्ह्यात होणाऱ्या व्यवहारांस अनुसरून आपला अग्रक्रमाधिकार प्रस्थापित करावा. या अधिकाराचा वापर पुढील प्रमाणे करिता येअील : जिल्हा संघ जिल्ह्या-जिल्ह्यातील धान्यांच्या खरेदी-विक्रीसंबंधी आपसांत जे करारमदार करतील ते त्यांनी ताबडतोब त्या-त्या राज्य सरकारांना कळवून अन्नधान्यांच्या आयात- निर्यातीकरिता आवश्यक ते परवाने घेतले पाहिजेत. अुदाहरणार्थ, अेखाद्या जिल्हा संघांने दुसऱ्या अेखाद्या जिल्हा संघाकडून काही धान्य काही भावाने खरेदी करण्याचे ठरविले तर खरेदी करणाऱ्या जिल्हा संघांने आपल्या राज्य सरकारला कराराचा तपशील कळवून धान्य आयातीकरिता परवाना काढावयास हवा. त्याचप्रमाणे धान्य विक्री करणाऱ्या जिल्हा संघाने आपल्या राज्य सरकारला कराराचा तपशील कळवून धान्य निर्यातीचा परवाना काढावयास हवा. जिल्ह्या-जिल्ह्यांत होणारे बाजार व्यवहार खुले व अबाधित राहाण्याच्या दृष्टीने दोन्ही राज्य सरकारांची आवश्यक ते आयात-निर्यातीचे परवाने शक्य तितक्या लौकर दिले पाहिजेत. परंतु याच निमित्ताने खरेदी-विक्रीचा दोन्ही जिल्ह्यांत ठरलेला बाजारभाव योग्य वाटल्यास दोन्ही राज्य सरकारांना या व्यवहारात हस्तक्षेप करून आपला अग्रक्रमाधिकार वापरता येअील. ज्या जिल्ह्यात धान्य आयात होणार असेल त्या राज्य सरकारला बाजारभाव योग्य वाटला तर त्याने जिल्हा संघाला आयातीचा परवाना देताना अशी अट घालावी की त्याने आयात होणाऱ्या धान्यापैकी निम्म्यापेक्षा

अधिक नाही अेवढे धान्य ठरलेल्या बाजारभावानेच सरकारला विकत द्यावे. अशा रीतीने सरकारला काही धान्य द्यावे लागल्यामुळे त्या जिल्हा संघाला योग्य वाटले तर त्याने अधिक धान्य आयातीकरिता पुनश्च व्यवहार करावेत. राज्य सरकारच्या अग्रक्रमाधिकाराखेरीज दुसरे कोणतेही बंधन राहाणार नाही. हीच गोष्ट ज्या जिल्ह्यातून धान्य निर्यात होणार त्या राज्य सरकारची. निर्यातीकरिता ठरलेला बाजारभाव त्या राज्य सरकारला योग्य वाटला तर जिल्हा संघाला निर्यातीचा परवाना देताना राज्य सरकारने अशी अट घालावी की निर्यात होणाऱ्या धान्यापैकी निम्म्यापेक्षा अधिक नाही अेवढे धान्य त्या जिल्हा संघाने ठरलेल्या बाजारभावाने सरकारला विकत द्यावे. या कारणाने शिलकीच्या राज्यांतून, पुरेसे धान्यच निर्यात होअू शकणार नाही, अशी भीती बाळगण्याचे कारण नाही. निर्यात करता येण्याजोग्या जिल्हा संघाला आपल्या जिल्ह्यात केव्हाही अधिक धान्य खरेदी करून ते अन्य जिल्ह्यात निर्यात करिता येअील. राज्यसरकारच्या अग्रक्रमाधिकाराखेरीज त्यावर कोणतेही बंधन राहाणार नाही. निरनिराळ्या जिल्ह्यांतील बाजारभाव धान्यांची जात, प्रत व वाहतूकखर्च लक्षात घेअून सर्वत्र समान होअीपर्यंत जिल्हा संघाना परस्परांतील खरेदी-विक्रीचे व्यवहार फायदेशीर राहातील, आणि म्हणून हे व्यवहार तोपर्यंत चालू राहातील. सर्व जिल्ह्यांतील किंमती समान झाल्या म्हणजे साहजिकच हे व्यवहार बंद होतील. दरम्यानच्या काळात सर्व राज्य सरकारांना प्रत्येक आयात-निर्यातीच्या निमित्ताने आवश्यक तेवढे धान्य बाजारभावाने पण बाजार व्यवहारात धक्का न लावता खरेदी करिता येअील. अशा रीतीने खरेदी केलेल्या धान्याचा अुपयोग कसा करावा यासंबंधी मी थोड्याच वेळात खुलासा करीन.

राज्य सरकारांनी जिल्हा संघांच्या मार्फत होणाऱ्या आयात-निर्यातीच्या निमित्ताने जो अग्रक्रमाधिकार वापरावयाचा त्यासंबंधी ज्या मर्यादा घातल्या आहेत त्या आवश्यकच आहेत. अुदाहरणार्थ, आयात करणाऱ्या जिल्ह्याकडून त्या राज्य सरकारने आयात होणाऱ्या धान्याचा निम्म्याहून अधिक भाग खरेदी करू नये. तसेच निर्यात करणाऱ्या जिल्ह्याकडून निर्यात होणाऱ्या धान्यापेक्षा अधिक धान्याची मागणी त्या राज्य सरकारने करू नये असे म्हटले आहे. याचा अुद्देश असा की जिल्हा संघांच्या कायदेशीर व्यापाराचे काही क्षेत्र तरी सुरक्षित राहावे. असे झाले नाही आणि जिल्हा संघात ठरलेल्या कराराप्रमाणे निर्यात वा आयात होणारे सर्वच धान्य त्या-त्या राज्य सरकारांनी हस्तगत केले तर जिल्हा संघांना व्यापारी क्षेत्रच अुरणार नाही आणि ते व्यापारी करारही करणार नाहीत. देशात सर्वत्र धान्याची अेक सुसूत्र बाजारपेठ

प्रस्थापित करावयाची तर जिल्हा संघांचे व्यापारी क्षेत्र काही अंशी तरी सुरक्षित ठेवले पाहिजे. जिल्हा संघांनी आपसांत वाटाघाटी करून करारमदार केले नाहीत तर बाजारभाव ठरणार नाहीत आणि सरकारला आवश्यक ते धान्य बाजारभावाने हस्तगत करणे अवघड होअील. म्हणून जेव्हा-जेव्हा राज्य सरकार आपला अग्रक्रमाधिकार वापरून जिल्हा संघांनी केलेल्या करारांच्या निमित्ताने त्यांच्याकडून धान्य खरेदी करतील त्या वेळी अशा जिल्हा संघांना त्यांच्या व्यापारी कामगिरीबद्दल योग्य तो मोबदला अथवा अडत देणे हेही योग्यच ठरेल. असे केले तरच जिल्हा अन्नधान्य खरेदी विक्री संघ खऱ्या अर्थाने स्वायत्त व स्वतंत्र व्यापारी संस्था म्हणून प्रस्थापित होतील.

जिल्ह्याजिल्ह्यात करावयाच्या धान्याच्या खरेदी-विक्रीसंबंधी जिल्हा संघांना अेकाधिकार असावेत असे तर म्हटलेच आहे. त्याने काही अनुचित परिणाम होणे शक्य आहे. हे टाळले पाहिजेत. अशा अेकाधिकाराचे दुष्परिणाम विशेषकरून शिलकीच्या जिल्ह्यात-जेथून धान्य निर्यात होअू शकते अशा ठिकाणी- होण्याचा अधिक संभव आहे. धान्य निर्यातीचा अेकाधिकार जिल्हा संघांकडे असल्याने असे जिल्हा संघ जिल्ह्यात धान्य खरेदी करण्याची टाळाटाळ करून धान्याचे भाव बुद्धया खाली आणतील, आणि मग जिल्ह्यात कमी भावाने धान्य खरेदी करून ते बाहेर चढत्या बाजारभावाने विकून अवास्तव नफेबाजी करतील. अशा ठिकाणी धान्य अुत्पादकाला संरक्षण देण्याच्या हेतूने राज्य सरकारांनी प्रत्येक हंगामाच्या प्रारंभी किमान आधार किंमती जाहीर कराव्यात आणि त्या किंमतींना धान्य अुत्पादक ज्या वेळी जेवढे धान्य विकावयास तयार असतील त्या वेळी तेवढे सर्व धान्य स्वतः खरेदी करण्याची जबाबदारी पत्करावी आणि तयारी ठेवावी. असे केल्याने जिल्ह्यातील धान्यांच्या किंमती किमान बाजार किंमतींच्या खाली घसरणार नाहीत. शिवाय अेखादा जिल्हा संघ आपल्या अेकाधिकाराचा दुरूपयोग करून जिल्ह्यातील किंमती प्रयत्नपूर्वक खाली ठेवीत आहे आणि अशा प्रकारे आपल्या निर्यात व्यवहारात नफेबाजी करीत आहे अशी शंका आल्यास राज्य सरकारने त्या जिल्ह्यातील आपल्या किमान आधारभूत किंमती वाढवाव्यात आणि त्या नवीन किंमतींना प्रत्यक्ष अुत्पादकाकडून धान्यखरेदी करावी. अशा रीतीने आधार किंमती वाढविल्या तर त्या वर्षाच्या कालावधीत त्या सामान्यतः कमी करू नयेत. अशा प्रकारे राज्य सरकारांना, विशेषतः शिलकी जिल्ह्यांमध्ये, अधूनमधून खुद्द अुत्पादकांकडून धान्यखरेदी करावे लागेल. त्याकरिता आवश्यक ती सरकारी खरेदी संघटना तयार ठेवली पाहिजे. जिल्ह्यासंघांचे मुख्य प्रशासक व हिशेबनीस राज्य सरकारचे नोकर असल्यामुळे अशा

धान्यखरेदीकरिता, तसेच खरेदी केलेली धान्ये योग्य त्या जिल्ह्यात साठवून ठेवण्याकरिता जिल्हा संघाचीच यंत्रणा राज्य सरकारांना वापरता येअील.

अशी रीतीने राज्य सरकारांना आपला अग्रक्रमाधिकार वापरून जिल्हा संघांकडून किंवा किमान आधार किंमतींना खुद्द अुत्पादकांकडून खरेदी करून आवश्यक तेवढे धान्य हस्तगत करिता येअील. अशा रीतीने हस्तगत झालेल्या धान्याचे मुख्यतः दोन अुपयोग आहेत. अेक म्हणजे हंगामा– हंगामांतील धान्यांच्या किंमतीत पडणारे फरक किंवा किंमतीतील अस्थिरता कमी करणे. ज्या वर्षी हंगाम चांगला असेल त्या वर्षी हस्तगत झालेले धान्य सरकारला आपल्या धान्यसाठ्यासत जमा करिता येअील व ज्या वर्षी हंगाम चांगला नसेल त्या वर्षी आपल्या धान्यसाठ्यातील धान्य बाजारात आणता येअील. अेखाद्या वर्षी हंगाम विशेष वाअीट असेल व पिके पार बुडाली असतील तर त्याला आपल्या धान्यसाठ्यातून निकडीची गरज भागविता येअील. यासाठी धान्यसाठे केले पाहिजेत व ते चांगल्या स्थितीत ठेवले पाहिजेत. त्याकरिता साठ्यातील जुने धान्य काढून त्या जागी सतत नवे धान्य भरले पाहिजे. म्हणजे हंगाम बरा असो अगर वाअीट असो, सरकारला नवीन धान्याची खरेदी व जुन्या धान्याची विक्री ही सतत केलीच पाहिजे. विक्रीकरिता शक्य तर ग्राहकांच्या सहकारी संस्था, सरकारी स्वस्त धान्य दुकाने किंवा खासगी किरकोळ दुकानदार यांचा अुपयोग करावा लागेल. ही धान्यसाठ्याची फिरवाफिरव सुलभपणे व्हावी यासाठी यासाठी सरकारी विक्रीचे भाव सामान्यतः खुल्या बाजारातील चढाओढीच्या भावांपेक्षा किंचित कमी ठेवावे लागतील.

सरकारी धान्याची विक्री स्वाभाविकपणेच ग्रामीण विभागात अधिक अंशाने करावी लागेल. त्या योगे अशा जिल्ह्यांतील अन्नधान्य खरेदी–विक्री संघांना धान्य आयातीबाबत दिलेल्या अेकाधिकाराचे दुरूपयोगही टाळता येतील. सरकार धान्याचा हा दुसरा अुपयोग होय. अुदाहरणार्थ, अेखादा जिल्हा संघ त्याने जिल्ह्यात आयात केलेले धान्य विक्रीस न काढता साठेबाजी करून जिल्ह्यातील धान्याचे भाव कृत्रिमपणे वाढवून नफेबाजी करू लागला तर राज्य सरकारला आपल्या साठ्यातील धान्य अशा जिल्ह्यात स्वस्त धान्य दुकानांमार्फत विक्रीस काढता येअील, आणि जिल्हा संघाच्या संभाव्य साठेबाजीला किंवा नफेबाजीला आळा घालता येअील.

आता कोणी असा प्रश्न विचारील की, धान्याच्या बाजारपेठेची ही जी पुनर्घटना मी सुचविली आहे तिच्यातून काय निष्पन्न होअील? याचे अुत्तर असे की या पुनर्घटनेमुळे राज्य सरकारांना बाजारपेठेच्या व्यापारी व्यवहारांना धक्का न लावता

आवश्यक तेवढे धान्य हस्तगत करून ते योग्य वेळी व योग्य पद्धतीने विक्रीला काढून धान्यांच्या किंमतींतील अस्थिरता कमी करिता येअील. दुसरे असे की अशा पुनर्घटनेमुळे सर्व देशभर धान्यांची अेक विकेंद्रित परंतु अेकसूत्री बाजारपेठ निर्माण होअून देशाच्या निरनिराळ्या भागांतील धान्यांच्या भावांतील तफावत कमी होण्यास मदत होअील. शिवाय अशा पुनर्घटनेने अन्नधान्यांच्या बाजारपेठेवर काही प्रमाणात आवश्यक तेवढे सामाजिक नियंत्रण प्रस्थापित करून या बाजारपेठेत मुलभूत सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने अेक दीर्घकालीन कार्यक्रम हाती घेता येअील. अन्नधान्यांच्या निरनिराळ्या जाती व प्रती निश्चित करून अुत्पादकाला त्याच्या मालाची अधिकाधिक किंमत मिळवून देता येअील. गुदामे, धान्यांची वाहतूक अित्यादींचे शास्त्रशुद्ध आधुनिकीकरण करून सध्या होणारी गळती, नासधूस आणि चोऱ्या कमी करता येतील. अुत्पादक व ग्राहक या दोघांच्याही हिताच्या दृष्टीने हे आवश्यक आहे. शेतीविकासाच्या दृष्टीने सुधारलेल्या आधुनिक बाजारव्यवस्थेचे दीर्घकालीन महत्त्व किती आहे, हे निराळे सांगण्याची गरज नाही.

तथापि, असा प्रश्न विचारणे योग्यच होअील की न्याय्य वाटप आणि वाजवी भाव ही जी धान्य धोरणाची निकडीची अुद्दिष्टे आपणांसमोर आहेत त्याबाबत बाजारपेठेची वर सुचविलेली पुनर्घटना अुपयुक्त ठरू शकेल काय? न्याय्य वाटपासंबंधी विवेचन करिताना अन्नधान्य धोरण समिती म्हणते, 'अन्नधान्यांच्या न्याय्य वाटपाचे अुद्दिष्ट शिलकी अुत्पादक व शिलकी राज्ये यांच्याजवळील शिल्लक धान्य अनुत्पादक ग्राहक व तुटीची राज्ये यांना वाजवी किंमतीत अुपलब्ध करून देणे हे असले पाहिजे. धान्यतुटीच्या अनिष्ट परिणामांपासून गरीब वर्गाला संरक्षण देणे हा अन्नधान्यांच्या न्याय्यवाटपाचा अेक प्रमुख हेतू असावयास हवा.' अशा प्रकारे न्याय्य वाटपाचे तीन पैलू आहेत. (१) शिलकीच्या व तुटीच्या राज्याराज्यांतील न्याय्य वाटप, (२) शिलकी अुत्पादक व अुत्पादन न करणारे ग्राहक यांच्यातील न्याय्य वाटप, आणि (३) गरीब व श्रीमंत वर्गातील न्याय्य वाटप. मी सुचविलेल्या बाजारपेठेच्या पुनर्घटनेने शिलकीच्या व तुटीच्या राज्या-राज्यांमध्ये किंबहुना शिलकीच्या व तुटीच्या जिल्ह्या-जिल्ह्यांमध्ये अन्नधान्यांचे न्याय्य वाटप होअू शकेल. अशा पुनर्घटनेने राज्याराज्यांतील किंवा जिल्ह्याजिल्ह्यांतील धान्यभावांमध्ये अेकसूत्रता व समानता निर्माण होअील. हाच या न्याय्य वाटपाचा पुरावा होय. अन्नधान्य धोरण समिती आंतरप्रादेशिक भाव समान व अेकसूत्री ठेवण्याचे महत्व मान्य करून हेच म्हणते की, 'आमचे असे आग्रहाचे सांगणे आहे की वेगवेगळ्या राज्यांतील किंमतीमधील विषमता नाहीशी

करण्याची समस्या हे मुख्यतः या देशातील अुपलब्ध अन्नधान्यांच्या न्याय्य वाटपाच्या समस्येचेच दुसरे रूप आहे.' तात्पर्य, मी सुचविलेल्या बाजारपेठेच्या पुनर्घटनेने राज्याराज्यांतील व जिल्ह्याजिल्ह्यांतील धान्यांच्या भावांमध्ये अेकसूत्रता व समानता निर्माण होअील आणि अुपलब्ध अन्नधान्यांचे सर्वत्र न्याय्य वाटप होअील. शिवाय हे सर्व कोणत्याही राजनैतिक हस्तक्षेपाशिवाय किंवा राज्य सरकारांमधील राजकीय सौदेबाजीला वाव न मिळता घडून येअील.

दुसरे असे की अुत्पादकाकडून कमी भावाने धान्यवसुली करण्याच्या धोरणामुळे किंवा सक्तीच्या धान्यखरेदीमुळे जे धान्यवाटप होअू शकते त्यापेक्षा वर सुचविलेल्या पुनर्घटनेने शिलकी धान्य अुत्पादक आणि अनुत्पादक ग्राहक यांच्यात अधिक सुलभ व न्याय्य वाटप होअू शकेल. धान्य वसुलीचा भाव कमी असल्यास अुत्पादक साहजिकच धान्याचे साठे दडवून ठेवतो. त्यायोगे धान्याचे साठे सुस्थितीत न राहाता धान्याची नासाडी होते. बाजारभावापेक्षा सक्तीच्या धान्यवसुलीचे भाव कमी असले म्हणजे अन्नधान्यांचे पर्यायी अुपयोग करण्याकडे अुत्पादक प्रवृत्त होतो. अुदाहरणार्थ, अन्नधान्यांचा गुरांच्या चंदीकरिता अुपयोग करणे. गुरांच्या चंदीसाठी नेहमी वापरल्या जाणाऱ्या काही पदार्थांचे भाव नियंत्रित केलेले नसतात आणि अशा पदार्थांचे दुसरे अुपयोग करिता येतात. अुदाहरणार्थ, हरभरा व गळित धान्यांची पेंड. शेतकऱ्याला त्याच्या अन्नधान्यांचे भाव सक्तीच्या धान्यवसुलीत कमी मिळतात असे दिसून येताच तो आपल्या गुरांना हरभरा व पेंड देण्याअैवजी गहू व ज्वारी देअू लागतो. पी.अेल्. ४८० करारानुसार अमेरिकेहून आयात केलेला गहू जेव्हा बाजारात अत्यंत कमी किंमतीला विकण्यात येत होता तेव्हा तो गुरांच्या चंदीकरिताही वापरला जाअू लागला होता, हे सर्वश्रुत आहे. अलीकडे कुक्कुटपालनाची जी झपाट्याने वाढ झालेली आहे तिच्यावरूनही अन्नधान्यांच्या पर्यायी अुपयोगाची आणखी अेक गंभीर शक्यता समोर आली आहे. अन्नधान्यांच्या किंमती पार खाली ठेवण्याचा प्रयत्न झाला आणि अंडी व कोंबड्या यांच्या किंमतींवर कोणतेच नियंत्रण घातले नाही तर कोणाही शेतकऱ्याच्या दृष्टीने त्याच्याजवळील धान्य सरकारला कमी भावाने विकण्यापेक्षा ते कोंबड्यांचे अन्न म्हणून वापरणेच अधिक कायदेशीर ठरेल हे अुघड आहे. अशा प्रकारचे धान्यांचे पर्यायी अुपयोग अेकूण अुपलब्ध धान्यांच्या प्रमाणात फार किरकोळ आहेत असे मानणेही चुकीचे होअील. चार किंवा पांच कोंबड्यांना अेका माणसाचा शिधा लागतो, आणि धंद्याकरिता कोंबड्यांची संख्या वाढविण्याचे ठरविले तर अेका वर्षात त्यांची संख्या दसपट किंवा वीसपटही होअू शकते. तात्पर्य,

अन्नधान्यांच्या किंमती कृत्रिमपणे खाली ठेवण्याची खटपट केली तर माणसांना पुरेसे धान्य मिळण्यापूर्वीच कुक्कुटपालनाचा विकास होओईल. मी सुचविलेल्या पुनर्घटनेने आपल्याजवळील मर्यादित अन्नधान्यांचे असे गैरवापर टळतील.

अशा रीतीने मी सुचविलेल्या धान्यांच्या बाजारपेठेच्या पुनर्घटनेने राज्या-राज्यांत आणि अुत्पादकांत व अनुत्पादक ग्राहकांत अुपलब्ध धान्याचे न्याय्य वाटप होअू शकेल. अर्थात् हे मान्य केले पाहिजे की, अन्नधोरणाचे तिसरे अुद्दिष्ट म्हणजे गरीब व श्रीमंत वर्गामध्ये धान्याचे न्याय्य वाटप हे मात्र मी सुचविलेल्या पुनर्घटनेने साध्य होअू शकणार नाही. बाजारपेठेच्या पुनर्घटनेने होणारे वाटप बाजारपेठेतील व्यवहारांना धरून म्हणजेच गरीब व श्रीमंत वर्गात त्यांच्या-त्यांच्या क्रयशक्तीप्रमाणे होओईल. यापेक्षा अधिक समान वाटप व्हावयाचे असेल तर त्याचा वास्तविक व योग्य मार्ग म्हणजे अर्थव्यवस्थेत क्रयशक्तीचेच समान वाटप घडवून आणणे हा होय. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे गरीब व श्रीमंत वर्गात अुपलब्ध धान्याचे समान वाटप करावयाचे असेल तर या वर्गाच्या अुत्पन्नांमध्ये असलेली आजची विषमता कमी केली पाहिजे. ते करावयाची साधने दोन : अेक अुत्पन्न धोरण व दुसरे रोजगार विषयक धोरण. अुत्पन्न धोरण याचा अर्थ देशातील प्रत्येक व्यक्तीस किमान जीवनावश्यक अुत्पन्नाची हमी देणे. रोजगारविषयक धोरण याचा अर्थ असा की, प्रत्येक व्यक्तीस द्यावयाचे किमान अुत्पन्न शक्यतोंवर अुपयुक्त अर्थोत्पादक नोकरी किंवा अुद्योगव्यवसाय यांच्यामार्फत मिळेल अशी व्यवस्था करणे. अुपयुक्त व अुत्पादक व्यवसायाच्याद्वारे प्रत्येक व्यक्तीला किमान अुत्पन्न प्राप्त करून देणे आज ताबडतोब शक्य नसेल तर ज्यांना आज किमान अुत्पन्नही मिळू शकत नाही अशा वर्गाला आवश्यक ते द्रव्यसाहाय्य (सबसिडी) देअून त्यांची भरपाओई केली पाहिजे. शिलकी धान्यसाठे चांगल्या अवस्थेत राहावेत म्हणून त्यांची सतत फिरवाफिरव केली पाहिजे आणि त्याकरिता राज्य सरकारांनी साठ्यांतील जुने धान्य शक्यतर ग्राहक सहकारी संस्था किंवा स्वस्त धान्य दुकाने यांच्याद्वारे नियमित विक्रीस काढावे असे मी पूर्वी सुचविले आहेच. ते करतांना ज्या वर्गांना अन्नधान्यांचे बाजार भाव परवडणारे नाहीत त्यांच्यापुरताच या दुकानांचा वापर मर्यादित ठेअून आवश्यक तेवढी तूट सरकारने सोसणे योग्यच होओईल. अशा तऱ्हेची तूट भरून काढण्याकरिता जिल्हा अन्नधान्य खरेदी विक्री संघांच्या जिल्ह्या-जिल्ह्यांतील व्यापारी अुलाढालीवर अुलाढालकर बसवून किंवा राज्य सरकारांच्या सर्वसामान्य अुत्पन्नातून तरतूद करावी लागेल. अशा तऱ्हेची तूट सोसणे देशाला शक्य होणार नाही, या कारणाने अन्नधान्य

धोरण समिती तशी शिफारस करू धजत नाही. तुटीचे अथवा द्रव्यसाहय्याचे हे ओझे सुसह्य की असह्य असेल हे अर्थात्च केवढ्या वर्गाला किंवा किती लोकांना कोणत्या प्रमाणात द्रव्यसाहाय्य द्यावे लागेल यावर अवलंबून राहील. बहुसंख्य जनतेला तिने करावयाच्या धान्यखरेदीवर मोठ्या प्रमाणात द्रव्यसाहाय्य देण्याचा प्रयत्न केला तर अर्थातच त्याचे ओझे असह्य होअील व ते अव्यवहार्यही ठरेल. परंतु त्या कारणाने सर्वसामान्य भावपातळी व सर्व जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती विचारात न घेता बाजारभावापेक्षा अवास्तव कमी भावाने सक्तीची धान्यवसुली करून त्यातून धान्यवाटप करणे हा मार्ग न्याय्य ठरत नाही. या योगे वरील वर्गालाच नव्हे तर बहुसंख्य ग्राहकवर्गाला द्रव्यसाहाय्य मिळते व त्याचे ओझे सर्वस्वी अन्नधान्यांच्या अुत्पादकांवर पडते, हे लक्षात घेतले पाहिजे. जे थोडे संबंध देशाला व समाजाला असह्य ठरते हे केवळ अन्नधान्य अुत्पादकांवरच लादणे हे सर्वस्वी अन्यायाचे होय.

सारांश, सरसकट होत असणाऱ्या भाववाढीला अन्नधान्य अुत्पादक कोणत्याही प्रकारे विशेष जबाबदार नसतांना साऱ्या भाववाढीचे खापर केवळ त्याच्याच माथ्यावर फोडून गेली वीस वर्षे आपण त्याला शिक्षा करीत आलो आहोत. अर्थव्यवस्थेत व्यक्तीला प्रोत्साहन देअून तिचा योग्य वापर करणे आणि देशाजवळ असलेल्या साधनसामग्रीचा अुत्पादक दृष्टीने अुपयोग करणे अित्यादी सर्व बाबतीतील आपल्या अपयशावर अशा रीतीने आपण पांघरूण घालीत आलो आहोत. अन्नधान्य धोरण समितीने आपल्या परावलंबित्वाच्या संदर्भात असे म्हटले आहे की, हे अनिष्ट होते आणि भविष्यकाळी तर ते शक्य कोटीतीलही असणार नाही. समितीचे हे विधान चालू संदर्भातही तितकेच लागू पडते. मी वर सांगितल्याप्रमाणे आपल्याला परदेशांतून वेळोवेळी मुबलक धान्यमदत मिळू शकली म्हणूनच अन्नधान्यांच्या किंमती आपल्या अिच्छेप्रमाणे अगदी खालच्या पातळीवर ठेवण्याचे धोरण आपल्याला अवलंबिता आले. किंबहुना केवळ अन्नधान्यांच्या किंमतीचा खास वेगळा विचार करण्याच्या या धोरणामुळेच आपण धान्यआयात व धान्यमदत यांवरील आजच्या लाजिरवाण्या परावलंबित्वाप्रत येअून पोचलो आहोत. आता हे परावलंबित्व शक्य व अिष्ट नाही असे वाटत असेल तर या परावलंबनावर आधारलेली आपली जुनी धोरणे आपण सोडून दिली पाहिजेत. आजपर्यंतचे परावलंबित्व यापुढे अनिष्ट व अशक्य आहे असे सांगून अन्नधान्य धोरण समिती म्हणते, ही अेक अशी घटना आहे की जिचा अन्नधोरण व त्याची अंमलबजावणी यांवर मूलगामी परिणाम होणे अपरिहार्य आहे.

असे असूनही दुर्दैवाने ही समिती जुन्या मळलेल्या चाकोरीतूनच या विषयासंबंधी विचार करीत आहे, असे मला वाटते. त्यापुढे समितीने शिफारस केलेले 'सुसंबद्ध, अेकसूत्री अन्नधोरण' धान्य आयातीवरील आजचे परावलंबित्व नष्ट करू शकेल अशी शक्यता मला दिसत नाही. किंबहुना या परावलंबित्वाला युक्तिवादाचा आधार देअून ते चालू ठेवण्यासच समितीच्या शिफारशींची मदत होअील अशी मला भीती वाटते. या पार्श्वभूमीवरून मी आपल्या अन्नप्रश्नासंबंधी अेक नवीन अुपाययोजना सुचविली आहे. स्वावलंबन हे माझ्या अुपाययोजनेचे आधारभूत तत्व आहे. माझ्या मते अन्नाच्या बाबतीतील स्वावलंबन म्हणजे आपल्या देशातील धान्य अुत्पादकांवरील विश्वास व भरवंसा. या दृष्टीने मी सुचविलेल्या अुपाययोजनेचा मुख्य अुद्देश हा की धान्य अुत्पादक आपली सारी अुत्पादन साधने अधिकाधिक अुत्पादनाच्या कामी लावतील अशी परिस्थिती निर्माण करावी. याकरिता अन्नधान्यांच्या बाजारपेठेची अेकसूत्री पुनर्घटना करणे आवश्यक आहे, असे मला वाटते. अशा पुनर्घटनेने सरकारला असे अेक साधन अुपलब्ध होअील की ज्याच्या साह्याने खासगी खुल्या व्यापारातील अस्थैर्य निर्माण करणाऱ्या सट्टेबाज प्रवृत्ती त्याला काबूत आणता येतील, ग्राहकांच्या परिहार्य गैरसोयी व हालअपेष्टा दूर करिता येतील आणि गरीब वर्गांना वाढत्या किंमतीपासून समाजास झेपेल अितक्या प्रमाणात संरक्षणही देता येअील. या सर्व गोष्टी शक्य कोटीतील आहेत आणि करून पाहाण्याजोग्या आहेत, असे मला वाटते.

■■■

## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथलयाचाही लाभ घेता येईल.

## 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिन या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलाकडे व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## अर्थबोधपत्रिका मासिक
## वर्गणीदारांसाठी विशेष योजना

| | |
|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | **फक्त २००/– रुपये** |
| **द्वैवार्षिक वर्गणी** | **फक्त ३५०/– रुपये** |
| **त्रैवार्षिक वर्गणी** | **फक्त ५००/– रुपये** |
| **पंचवार्षिक वर्गणी** | **फक्त ८००/– रुपये** |

**The Bank details for NEFT are as under :**

- Bank Name : **Vidya Sahakari Bank S.B. Road, Pune 411016.**
- Account Name : **Indian School of Political Economy**
- Bank Account No. : **200403130004208**
- NEFT/RTGS No. : **SVCB0003004**
- IFSC Code : **SVCB0003004**